昭和52年度言語研修
マラーティー語テキスト2

# マラーティー語読本 (テキスト)

内藤雅雄編

東京外国語大学
アジア・アフリカ言語文化研究所
1977

## अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १. | माझ्या या ओटीवर (कविता) : ताराबाई मोडक | १ |
| २. | पोस्ट ऑफिस | २ |
| ३. | थेंबा, थेंबा, येतोस कोठून ? (कविता) | ३ |
| ४. | माझे घर ; मुंबई शहर | ४ |
| ५. | निला कोल्हा | ५ |
| ६. | विनोबाजींचे महात्मा गांधींना पत्र : विनोबा भावे | ६ |
| ७. | जत्रा | ७ |
| ८. | अशी आहे मुंबई : जयवंत दळवी | ९ |
| ९. | मासाहेब, जरा ऐका : रणजित देसाई | १२ |
| १०. | माझ्या गावची स्थिती : गो. गो. गायकवाड | १७ |
| १२. | राष्टीय सभेची वाटचाल | १८ |
| १२. | विदूषक देऊळ (कविता) : मं. पाडगांवकर | २२ |
| १३. | गावरहाटी : वि. म. दांडेकर , म. भा. जगताप | २३ |
| १४. | पूर्वरंग : पु. ल. देशपांडे | २८ |
| १५. | कोंडिबा गायकवाड (कादंबरी) : व्यं. माडगूळकर | ३३ |
| १६. | जातिवाद आणि वर्गवाद : नलिनी पंडित | ३८ |
| १७. | मोठीं माणसं महात्मा गांधी : लो. टिळक | ४४ |
| १८. | दलितांचे बाबा महात्मा आंबेडकर : प्र. के. अत्रे | ५२ |
| १९. | शतपत्रे : लोकहितवादी | ५६ |
| २०. | तर्ण तुर्क म्हातारे अर्क (नाटक) : म. तोरडमल | ५८ |

# १. माझ्या या ओटीवर—

तारावाई मोडक

माझ्या या ओटीवर
कोण कोण येतं—कोण कोण येतं ?
चिमणी येते नी कावळा येतो
टपटप दाणे टिपून जातो—टिपून जातो.
होला येतो नी पारवा येतो
हू हू घू घू करून जातो—करून जातो.
मैना येते नी पोपट येतो
मंजुळ मंजुळ बोलून जातो—बोलून जातो.
मोर येतो नि लांडोर येते
थय थय थुई थुई नाचून जाते—नाचून जाते.

माझ्या या बागेंत
कोण कोण येतं—कोण कोण येतं ?
चिमणी येते नी कावळा येतो
इकडे तिकडे उडून जातो—उडून जातो.
मैना येते नी पोपट येतो.
पेरू डाळिंब खाऊन जातो—खाऊन जातो.
मोर येतो नी लांडोर येते
आंब्याच्या डहाळीवर झुलून जाते—झुलून जाते.
कोकिळ येतो नी बुलबुल येतो
गोड गोड गाणीं गाऊन जातो—गाऊन जातो.

( बाल भारती )

## २. पोस्ट ऑफिस

आपण आपल्या मित्राला किंवा एखाद्या नातेवाइकाला पत्र लिहितों. तें पत्र पोस्टाच्या पेटींत टाकतों. अशा पेट्या ठिकठिकाणीं आढळतात, तेथून पोस्टाचा शिपाई अशीं सर्व पत्रें पोस्टांत नेतो. तेथून तीं निरनिराळ्या गांवीं पाठवतात व दुसऱ्या गांवांहून पोस्टांत आलेलीं पत्रें पोस्टाचे शिपाई लोकांकडे पोंहोचवितात. या पोस्टांची व्यवस्था सरकार करतें. पोस्टांत निरनिराळे लोक वेगवेगळीं कामें करतात. कार्डें-पाकिटें-तिकिटें विकणें, तारा घेणें व पोहोंचवणें, रजिस्टरें करणें इत्यादि कामें तेथें होतात. शिवाय प्रत्येक पोस्टांत बँक पण असते. लोक आपले पैसे तींत ठेवतात. सरकारचें पोस्ट खातें त्या पैशावर आपल्याला व्याज पण देतें. एका गांवांहून दुसऱ्या गांवीं टपाल गाडीनें, मोटारीनें, आगगाडीनें किंवा विमानानें सुद्धां पाठवतात. त्यामुळें दूरच्या ठिकाणीं पत्रें लवकर पोहोंचतात. कांहीं पोस्टांत टेलीफोन सुद्धां असतात. त्यामुळें दूरदूरच्या ठिकाणच्या लोकांशीं लोक सहज व्यवहार करतात. तारेनें सुद्धां जलद बातमी पाठवतात. पोस्ट खातें या सर्व कामासाठीं पैसे घेतें. पण तो पैसा फारच कमी असतो. पांच नव्या पैशांचें कार्ड हिंदुस्थानांत कोठें ही जातें. पंधरा पैशाच्या लिफाफ्यांत अधिक मजकूर जातो. दहा पैशांतहि पत्र पाठवण्याची सोय आहे. लोक मनीऑर्डर करून कोठेंहि पैसे पाठवतात. ल्हान मोठ्या वस्तूंचें पार्सल करतात. अशा रीतीनें पोस्टामुळें आपली फार मोठी सोय होते. हल्लीं प्रत्येक मोठ्या गांवीं पोस्ट आहे. मोठ्या शहरांत तर कित्येक पोस्ट ऑफिसें असतात. हीं पत्रें, मनीऑर्डरी इत्यादीला टपाल किंवा डाक असें म्हणतात. हें टपाल पोहोंचविणाराला टपालवाला किंवा पोस्टमन असें म्हणतात.

(मराठी स्वयं शिक्षक)

## ३. थेंबा, थेंबा, येतोस कोठून ?

"थेंबा, थेंबा, कोठून येतोस ?
कोठे जातोस ? कोठे राहतोस ?"
"बाळ, मी लांबून येतो, उंचावरून येतो
आणि जमिनीच्या पोटात शिरतो."
"थेंबा, थेंबा, खरं खरं सांग—
कोठून येतोस, कोठे जातोस ?"
"मी जमिनीवरून वर जातो;
आकाशातून खाली येतो.
खाली नि वर,
वर नि खाली,
येतो नि जातो,
जातो नि येतो."
"अरे, आकाशातून येतोस,
हे तर खरं आहे;
पण खालून वर जातोस कसा ?"
"उन्हाळ्यात फार ऊन पडतं ना ?
मग आम्ही खूप खूप तापतो.
वाफ होऊन आम्ही वर जातो.
वर जाऊन खूप खेळतो.
इकडून तिकडे, तिकडून इकडे
धावतो, पळतो.
डोलतो, लोळतो.
मग खाली येतो.
आम्ही नसलो तर,
नद्या, नाले आटतील.
तळी, विहिरी आटतील.
शेते सुकतील. बागा सुकतील.
मग खाल काय ? प्याल काय ?"
"खरंच भाऊ, किती तुझा उपयोग !" (बाल भारती)

## ४. माझे घर

हे माझे घर आहे. माझी जागा तीन खोल्यांची आहे. ती स्टेशनपासून फार दूर नाही. तीन वर्षांपूर्वी मी ही जागा भाड्याने घेतली. त्यापूर्वी मी माझ्या भावाकडे राहात होतो. पण भावाची जागा फारच लहान होती.

घरापासून कार्यालयात जाण्यास एक तास लागतो. माझे काही मित्र बसने कार्यालयात जातात व काही सायकलवरून जातात. मी संध्याकाळी सात वाजता घरी पोचतो. सुटीच्या दिवशी नातलग व मित्रमंडळी माझ्या घरी येतात.

माझ्या घराजवळ एक सार्वजनिक बाग आहे. आम्ही तेथे कधीकधी फिरावयास जातो. बागेत खेळणाऱ्यांचीही सोय आहे. तेथे खेळण्याची खूप साधने आहेत. घरापासून बाजार दूर नाही. तेथे सर्व वस्तू माफक दराने मिळतात. मुलांसाठी जवळच शाळा (विद्यालय) आहे. मोठ्या मुलांमुलींकरिता महाविद्यालयसुद्धा जवळच आहे. माझे घर खूप हवेशीर आहे.

माझे घर गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतीत आहे. ही वसाहत फार स्वच्छ आहे. गृहनिर्माण मंडळाने ठिकठिकाणी घरे बांधली आहेत. माझे काही मित्रदेखील गृहनिर्माण मंडळाच्या जागेत राहतात. दिवसेंदिवस शहरातील वस्ती वाढत आहे. त्यामुळे घरांची टंचाई फार आहे. गृहनिर्माण मंडळ ही टंचाई दूर करण्याचा प्रयत्न करीत आहे.

## मुंबई शहर

मुंबई हे भारतातील एक सुंदर व मोठे शहर आहे. मुंबई ही महाराष्ट्र राज्याची राजधानी आहे. येथील वस्ती सुमारे पन्नास लाख आहे. येथे अनेक जातींचे, पंथांचे व धर्मांचे लोक सुखाने राहतात.

मुंबईत आरे दुग्ध वसाहत, जुहू, मलबार टेकडी, भारताचे प्रवेशद्वार, राणीचा बाग, वस्तु-संग्रहालय इत्यादी अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. मोठमोठ्या इमारती आहेत. लोकांची ने-आण करण्याकरिता स्थानिक आगगाड्या सतत धावत असतात. याशिवाय बसगाड्या, खाजगी व भाड्याच्या मोटारी यांची वाहतूक रात्रंदिवस चालू असते. येथील सचिवालयाची इमारत फारच भव्य आहे. राज्यपाल, मंत्री, सचिव वगैरे अधिकारी या शहरातच राहातात.

मुंबईचे हवामान सम आहे. पावसाळ्यात खूप पाऊस पडतो. हिवाळ्यात विशेष थंडी नसते. उन्हाळा फार कडक नसतो. सर्व ऋतूंमध्ये निरनिराळ्या प्रकारची फळे येथे मिळतात. येथे दुधाचा व भाजीपाल्याचा पुरवठा बाहेरून होतो.

येथे निरनिराळ्या प्रकारची महाविद्यालये आहेत. काही महाविद्यालयांत संशोधनकार्य चालू असते. रुग्णालयेही मुंबई शहरात खूप आहेत. बऱ्याचशा रुग्णालयांत गरीब लोकांवर मोफत औषधोपचार केले जातात. येथील मत्स्यालय पाहण्यासारखे आहे. ते पाहण्याकरिता दर रविवारी गर्दी लोटते.

येथील काही इमारतींना दहा मजले आहेत. अशा इमारतीत वर जाण्याकरिता व खाली येण्याकरिता लिफ्ट असते. चौपाटीवर व मलबार टेकडीवर फिरावयास जाण्यास चांगली जागा आहे. निरनिराळ्या धर्मांच्या लोकांकरिता येथे देवालये व प्रार्थना-मंदिरे आहेत. परदेशातील लोक हे शहर पाहण्याकरिता येत असतात.

(राज भाषा)

# ५. निळा कोल्हा

एक होता कोल्हा. रोज संध्याकाळी तो निघे. गुपचूप उसाच्या मळ्यात जाई. पोटभर ऊस खाई. नदीवर जाऊन पाणी पिई.

एकदा तो ऊस खाऊन नदीवर पाणी प्यायला गेला. पण रोजची जागा त्याला सापडेना.

जागा शोधता शोधता तो पडला एका हौदात. त्या हौदात होता निळा रंग. कोल्हा कसाबसा बाहेर निघाला आणि रानात जाऊन निजला.

सकाळ झाली. कोल्हा उठला. पाहातो तो सगळे अंग निळेच निळे. कोल्हा म्हणाला, "हे काय झाले! आता सगळे कोल्हे आपल्याला हसतील! काय करावे बरे?"

त्याला एक युक्ती सुचली. तो म्हणाला, "मी होईन आता जनावरांचा राजा." इतक्यात समोरून एक लांडगा येत होता. तो म्हणाला, "कोण हो तुम्ही निळे निळे?"

कोल्हा म्हणाला. "मी तर तुमचा राजा. वनदेवीने मला निळ्या आभाळातून पाठविले आहे."

लांडगा पळत निघाला. तो सगळीकडे सांगत सुटला की, रानात नवा राजा आला आहे. निळा निळा!

रात्री सगळी जनावरे जमली. मला मोठा दरबार भरला. वाघ, सिंह, कोल्हे, लांडगे सगळे जमले होते. नवा राजा आला. सर्वांना आनंद झाला. कोल्हे आनंदाने ओरडू लागले—

कुई, कुई, कुई.

हे ऐकून निळा कोल्हाही ओरडू लागला—

कुई, कुई, कुई.

सिंह म्हणाला, "अरे हा तर कोल्हा! हा कसला आमचा राजा! मारा याला."

सगळे कोल्हे पळू लागले. निळा कोल्हाही पळू लागला. अशी त्याची फजिती झाली.

 (बाल भारती)

## ६. विनोबाजींचे महात्मा गांधींना पत्र

परमपूज्य बापूजीस,

वर्षापूर्वी प्रकृती सुधारण्यासाठी मी आश्रमातून बाहेर पडलो. वर्ष होत आले, पण माझा काही ठावठिकाणा नाही. आश्रम सोडून मी निघून गेलो की काय अशी कोणाला शंका येईल. दोष माझ्यावरच येईल. कारण पत्र न लिहिण्याची मला खोड आहे.

मी दहा वर्षांचा होतो तेव्हा प्रतिज्ञा केली, "ब्रह्मचर्यव्रताचे पालन करीन व देशसेवा करीन." माध्यमिक विद्यालयात असताना मला गीतेचे वेड लागले. वडिलांच्या आग्रहाखातर दुसरी भाषा म्हणून फ्रेंच घेतले. तरीपण माझे गीतेवरचे प्रेम कमी झाले नाही. घरच्या घरी मी संस्कृतचा अभ्यास सुरू केला. वेदान्त व तत्त्वज्ञान यांचा अभ्यास करण्याचा निश्चय होता.

माझा दुसरा उद्देश होता प्रकृती सुधारणे. प्रकृती सुधारण्यासाठी प्रथम मी रोज दहा-बारा मैल फिरणे सुरू केले. त्यानंतर सहा ते आठ शेर धान्य दळण्यास सुरुवात केली. आता तीनशे सूर्यनमस्कार व हा फिरणे माझा व्यायाम आहे. यामुळे माझी प्रकृती चांगली आहे.

आता आहारासंबंधी. पहिले सहा महिने मीठ खाल्ले. नंतर ते सोडून दिले. मसाले वगैरे बिलकूल खाल्ले नाहीत. आजन्म मीठमसाले न खाण्याचा निश्चय केला. दूध सुरू केले. एक महिना केळी, दूध व लिंबू यांवर काढला.

आता कार्य काय केले? सहा विद्यार्थ्यांना कोठल्याही प्रकारचा मोबदला न घेता अर्थासह सर्व गीता शिकवली. मला जरी उत्तम हिंदी येत नसले तरी विद्यार्थ्यांसाठी हिंदी वर्तमानपत्रे वाचण्याचा उपक्रम चालू केला. रायगड, सिंहगड, तोरणा वगैरे ऐतिहासिक स्थळांची चारशे मैल पायी सफर केली. सर्व प्रसिद्ध किल्ले पाहिले. वाईत विद्यार्थीमंडळ स्थापन केले. एक वाचनालय सुरू केले व मदतीसाठी दळणारांचा वर्ग सुरू केला. त्यात मी आणि इतर विद्यार्थी दळत असू. दळणाचे पैसे वाचनालयाला देत असू.

आता आचरणाबद्दल थोडे लिहितो. अपरिग्रह (दानाचा स्वीकार न करणे), लाकडाची थाळी व वाटी, आश्रमातला लोटा, खादीचे धोतर, घोंगडी एवढे साहित्य जवळ आहे. बंडी, कोट, टोपी वगैरे न वापरण्याचे व्रत घेतले आहे. यामुळे शरीरावरही धोतरच पांघरतो. कपडा हातमागावरचाच वापरतो.

अधिक काय लिहू? जेव्हा स्वप्ने पडतात तेव्हा एकच विचार मनात येतो. देव माझ्याकडून काही सेवा घेईल का?

आपण स्वतः पत्र लिहावे असा विनोबाचा—आपणास पितृतुल्य समजणाऱ्या या आपल्या पुत्राचा—आग्रह आहे.

—विनोबाचे प्रणाम.

(राज भाषा)

# ७. जत्रा

चैत्राचा महिना. झाडांना कोवळी पालवी फुटली होती. पाखरांचा किलबिलाट चालला होता. या दिवसांत शेतकरी रिकामा असतो. गव्हाचा व हरबऱ्याचा हंगाम संपलेला असतो. नांगरटीला अजून अवकाश असतो. शेतकऱ्याच्या हातात पैसे खुळखुळत असतात. या महिन्यात वेगवेगळ्या देवतांच्या जत्रा भरतात.

आज बहिरोबाची जत्रा. मी पहाटे उठलो व आंघोळ केली. आईने दशम्यांचा डबा भरून दिला. कपडे करून मी शाळेत गेलो. माझ्या वर्गातील मुले जमली होती. गुरुजी तयार होते. आम्ही जत्रेला जाण्यासाठी निघालो. बहिरोबाचे देऊळ आमच्या गावापासून फार लांब नव्हते. आम्ही झपाझप चालू लागलो.

दुरून देवळाचा कळस दिसू लागला. सनई-चौघड्याचे सूर कानांवर आले. उन्हाळ्यामुळे नदीचे पाणी उथळ होते. आम्ही हातपाय धुतले व देवळाकडे गेलो.

दरवाजाजवळ लोकांची खूपच गर्दी होती. जो तो आत शिरण्यासाठी धडपडत होता. गुरुजींनी त्यांना विनंती केली. पुरुषांनी एका रांगेत उभे राहावे, असे त्यांनी सांगितले. स्त्रियांची एक वेगळी रांग तयार झाली. आम्ही स्वयंसेवकाचे काम पत्करले. दोन मुले देवाजवळ उभी राहिली. दोघे जण दरवाजाजवळ थांबले. दोघे जण रांगेच्या शेवटी उभे राहिले. सर्वांना व्यवस्थित दर्शन मिळू लागले.

गावोगावचे शेतकरी बैलगाड्या जुंपून आले होते. जत्रा म्हणजे त्यांची सहलच. पुरुष, बायका व मुले यांच्या झुंडी लोटत होत्या. पागोटी, पटके व लुगडी यांमुळे गर्दी रंगीबेरंगी दिसत होती. दुपारी बारा वाजता आरतीचा सोहळा झाला. ढोल, कर्णे, चौघडा व घंटा यांच्या आवाजाने माझ्या कानठळ्या बसल्या.

नंतर आम्ही नदीवर गेलो. सर्वांच्या दशम्या एकत्र करून गुरुजींनी गोपाळकाला केला. हसत, गप्पागोष्टी करीत, आम्ही फराळ केला. पाणी पिऊन आम्ही हिंडायला निघालो.

कापडाची व तयार कपड्यांची दुकाने खूप होती. भांड्यांच्या दुकानांची रांगही मोठी होती. हलवायांची दुकाने तऱ्हेतऱ्हेच्या मिठायांनी गच्च भरलेली होती. फूलवाले व फळवाले पुढ्यात पाट्या घेऊन बसले होते. कासाराच्या दुकानापुढे बायकांची गर्दी जमली होती. फुगे, पिपाण्या

व खेळणी विकणाऱ्या फेरीवाल्याच्या भोवती मुलांची गर्दी दिसत होती. जत्रेच्या दिवसांत हजारो रुपयांची उलाढाल होते, असे गुरुजींनी सांगितले.

या बाजूला एक दरवेशी अस्वलाचा खेळ करून दाखवत होता. त्या बाजूला एक माकडवाला दिसला. त्याची दोन माकडे नाचत होती. कोल्हाट्यांच्या खेळाला खूप गर्दी जमली होती. एका कोल्हाट्याने आपल्या कपाळावर एक उंच बांबू उभा करून ठेवला होता. त्या बांबूवर एक मुलगी कसरतीचे खेळ करीत होती. पलीकडच्या बाजूला एक तंबू होता. जिकडे तिकडे उत्साह व आनंद भरला होता.

एका बाजूला लाकडी घोड्यांचे एक रिंगण फिरत होते. पाचपाच पैसे देऊन आम्ही घोड्यांवर बसून गिरक्या मारल्या. नंतर आम्ही फिरत्या पाळण्यात बसलो. उंचावरून एकदम खाली उतरण्याचा अनुभव आम्ही घेतला. खूप मजा वाटली.

नदीकाठच्या वाळूत कुस्त्यांची दंगल चालली होती. तीनचार कुस्त्या आम्ही पाहिल्या. एक कुस्ती तर अगदी अटीतटीची झाली. ती जिंकणाऱ्या पहिलवानाला चांदीचे कडे व पेला बक्षीस मिळाला.

सूर्य मावळतीच्या डोंगरावर टेकला. आम्ही परत फिरलो. आज खूप खूप पाहायला मिळाले. खूप खूप मजा आली.





(बाल भारती)



## ८. अशी आहे मुंबई

माधव रामराव सेवेकरी,
द्वारा–श्री. वि. बा. सरवटे,
'ईशकृपा' शिवाजी पार्क, मुंबई २८.
दिनांक : २–१०–१९६९.

प्रिय ताई,

मुंबईस सुखरूप येऊन पोचल्याचे पत्र मी पाठवले होते ते मिळाले असेलच.

गेल्या चारपाच दिवसांत मामांच्या बरोबर हिंडून मुंबई पाहात आहे. मुंबई कितीही पाहिली तरी ती पाहून झाली असे वाटत नाही. बोरीबंदर स्टेशन पाहून तर मी थक्कच झालो. एका शेजारी एक अशा दहाबारा गाड्या या स्टेशनामध्ये थांबू शकतात. बोरीबंदर स्टेशनवर उतरल्यानंतर घोडागाडीने मामांच्या घरी गेलो. मुंबईची घोडागाडी सुरेख असते. चार चाकांच्या रथात बसल्यासारखे वाटते. घोडे मात्र थकलेले होते. त्यामुळे ही घोडागाडी डुलत डुलत चालली होती. हिला व्हिक्टोरिया असे नाव आहे. मामा म्हणाले, "फार पूर्वी मुंबईत ही व्हिक्टोरिया गाडी प्रिय होती. लोक याच गाडीतून फिरत असत. पण आता आगगाडी, बस आणि मोटारी यांनी या घोडागाडीला मागे टाकले आहे."

इथली दोनमजली बसगाडी पाहून मौज वाटली. वळण घेताना बसगाडी उलटेल की काय अशी भीती वाटत होती. पण मामांबरोबर बसच्या दुसऱ्या मजल्यावर बसून प्रवास केला. गंमत वाटली. बसमाठी लोक रस्त्याच्या कडेला रांगा करून उभे राहतात. बस थांबली की आत चढतात. प्रत्येक फलाटावरून दर तीनचार मिनिटांनी धावणाऱ्या आगगाड्याही आहेत. लोक उतरतात, झुंडीने चढतात. इथली गर्दी आणि धावपळ पाहिली की चुकायला होईल

या भीतीने जीव गांगरून जातो; म्हणून मामांचा हात धरून फिरतो. पण मामासुद्धा धावतच असतात. इथले लोक शांतपणे चालताना दिसत नाहीत. ते नेहमी घाईतच असतात. त्यांची सारखी धावपळच असते. मामा म्हणतात, नोकरीधंद्याच्या निमित्ताने त्यांना तसे करावे लागते. नोकरीधंद्यासाठी भारताच्या कानाकोपऱ्यातून निरनिराळ्या भाषा बोलणारे तसेच अनेक धर्मांचे लोक येथे आले आहेत.

रस्त्याच्या दुतर्फा उंच उंच इमारती आहेत. काही ठिकाणी तर वीस वीस मजली इमारती दिसतात. त्याहीपेक्षा उंच इमारती बांधण्याचे काम चालूच आहे. रस्त्यावर उभे राहून मजले मोजतासुद्धा येत नाहीत. काल एका उंच इमारतीचे मजले मोजता मोजता माझी टोपी मागल्या मागे खाली पडली.

दोन दिवसांपूर्वी सचिवालय पाहिले. ती टोलेजंग इमारत आहे. तिथे आपल्या मंत्र्यांच्या कचेऱ्या असतात. महाराष्ट्र सरकारचे हे मुख्य कार्यालय. तेथूनच जवळ मुंबई विद्यापीठ आहे. विद्यापीठाच्या आवारात अती उंच असा राजाबाई टॉवर आहे. तो पाहून आम्ही भारताचे प्रवेशद्वार पाहायला गेलो. तेथे जवळच असलेला शिवाजीमहाराजांचा अश्वारूढ पुतळा पाहिला. हे प्रवेशद्वार समुद्रकाठीच बांधलेले आहे. दूरवर पसरलेला समुद्र पाहून आनंद झाला. जवळच गोदीतील मोठमोठी जहाजे, नावा व क्रेन दिसत होते. तेथला वारा कसा छान होता.

काल आरे येथील गवळीवाडा पाहिला. येथे हजारो म्हशी आहेत. येथे दुधाच्या बाटल्या हळूहळू यंत्रानेच पुढे सरकतात. दूध गरम करून थंड करण्याची मोठी यंत्रेही मी पाहिली. यंत्रानेच दुधाच्या बाटल्या धुतल्या जात होत्या व त्यांत दूध भरले जात होते. या बाटल्या रोज सकाळी आणि संध्याकाळी मुंबईकरांना मिळतात.

वीरमाता जिजाबाई भोसले उद्यानसुद्धा पाहिले. याच उद्यानाला पूर्वी 'राणीचा बाग' म्हणत असत. येथे वाघ, सिंह यांसारखी हिंस्र जनावरे आहेत. गेंडा, पाणघोडा, शहामृग, 'तरस, अस्वल अशी कितीतरी मी पूर्वी न पाहिलेली जनावरे या बागेत मला पाहायला मिळाली.

आज सकाळीच मलबारहिलवर गेलो होतो. ही एक छोटीशी टेकडी आहे. येथील नेहरू उद्यान पाहण्यासारखे आहे. येथून मुंबईवर नजर फिरवता येते. बागेतील 'म्हातारीचा बूट' पाहून मोठी मजा वाटली. बुटाच्या आकाराची ही छोटीशी इमारत. या इमारतीत अगदी वर जाता येते. परत येताना चौपाटीवरील लोकमान्य टिळकांचा पुतळा पाहिला. तेथून जवळच असलेले मत्स्यालयही पाहिले.

येथून थोड्याच अंतरावर बाणगंगा आणि वाळकेश्वर ही ठिकाणे आहेत. या दोन ठिकाणांस ही नावे कशी पडली याची गमतीदार हकीगत मामांनी

सांगितली. प्रभू रामचंद्र वनवासात असताना सीतेचा शोध करत येथे आले. तेव्हा येथील ब्राम्हणांनी त्यांना सांगितले, की तुम्ही शंकराची पिंडी करून तिची पूजा करा, म्हणजे सीता परत मिळेल. मग प्रभू रामचंद्रांनी वाळूची पिंडी तयार केली. तिलाच वालुकेश्वर नाव पडले. पण पूजेला पाणी मिळेना, तेव्हा लक्ष्मणाने बाण मारून गंगा उत्पन्न केली आणि पूजेला पाणी आणले. म्हणून 'बाणगंगा' असे नाव पडले. आता तेथे पाण्याचा एक तलाव आहे आणि वालुकेश्वराचे देऊळ आहे. जेथे प्रभू रामचंद्रांना पूजेसाठी पाणी मिळाले नाही, तेथे आम्हांला काय मिळणार असे म्हणून मामा हसले. परंतु मुंबईस पाणी मिळावे म्हणून मुंबईपासून काही अंतरावर नगरपालिकेने पाण्याचे चार मोठे तलाव बांधले आहेत, असे मामा म्हणाले. तेथून नळाने पाणी मुंबईत येते.

मुंबई शहरात आम्हांला कारखानेच कारखाने दिसले. एवढेच काय शहरातदेखील जिकडे तिकडे लहानमोठे कारखाने आहेत. कापडगिरण्या, मोटारी, सायकलींचे कारखाने, विजेची आणि इतर यंत्रे करण्याचे कारखाने, एक ना दोन! येथे अनेक वस्तू तयार होतात. मला तर मुंबई हे कारखान्यांचे शहर वाटले.

मुंबईबद्दल किती लिहू आणि किती नको असे वाटते! पण आता हे पत्र आवरते घेतो. कारण नळ आला आहे. दोन बादल्या भरून पाणी आणतो. तेवढीच मामीला मदत केल्यासारखे होईल. नाहीतर ती म्हणेल, हा भाचा नुसता जेवतो आणि भटकतो.

आणखी दोन दिवसांनी मी परत यायला निघणार.

आईबाबांना नमस्कार सांग.

तुझा,
माधव

—जयवंत दळवी

(बाल भारती)

# ३. मासाहेब, जरा ऐका !

**रणजित देसाई**

### प्रवेश पहिला

(खेड्यातील पाटलाचे घर. ओसरीवर पाटील, कल्याण, आनंद वगैरे बसले आहेत. पाटील त्यांना न्हायला शेंगा देतात.)

**पाटील** : घ्या महाराज !

**कल्याण** : तुमचं नाव काय ?

**पाटील** : रावजी पाटील म्हंत्यात मला.

**एक शिष्य** : तुम्ही पाटील आहात ?

**पाटील** : महाराज, घराण्याची पाटिलकी होती. मोगलाई गेली. आता पाटील हे नाव तेवढं मागं न्हायलंय, पण पोट भरायची पंचाईत.

**आनंद** : ती पाळी जास्त दिवस राहायची नाही.

**पाटील** : ऑं !

**कल्याण** : पाटील, आमचा आनंद भविष्य चांगलं जाणतो. त्याचे बोल खोटे व्हायचे नाहीत.

**पाटील** : (आनंदाचे पाय धरत) आनंदजी, गरिबाचं कल्याण होईल. तुमच्या तोंडात साखर पडो.

(पाटलाची बायको आतून येते व बैराग्यांच्या हातांवर भाजी-भाकरी ठेवते.)

**आनंद** : आई, तुमचं कल्याण होवो !

**पाटलीणबाई** : बाबांनो, हाती घास आला तो आपला गप खावा. राखलं असतं तर दोन गोड घास घातलं असतं. पण त्यो शिवाजी हाय न्हवं ? त्यो गोड घास कसा गिळू देनार ?

**आनंद** : काय केलं शिवाजीनं ?

**पाटलीणबाई** : आता मोगलाईत आमी सापडलो. त्यो काय आमचा गुन्हा व्हय ? शिवाजी राजाचं सरदार त्ये पर्तापराव, आनंदराव, तेलंगराव ! त्यांनी आख्या मोगलाईत धुमाकूळ घातलाय. गावंच्या गावं लुटली. बादशानं पकडलं हुतं म्हनं शिवाजीला. तिथंच त्यो मेला असता, तर बरं झालं असतं ! पण सुटला.

**कल्याण** : काय म्हणता ! शिवाजी सुटला ?

**पाटील** : म्हंजे, तुम्हांला ठावं न्हाई ?

**दुसरा शिष्य** : आम्ही बैरागी ! शिवाजीची चौकशी कशाला करतो ?

**पाटलीण** : अवं, शिवाजी राजा सुटला एवडंच न्हवं तर गडावर पोचला बी ! गडावर तोफा धडाडल्या की !

**आनंद** : असं ! काय पाटील, आई म्हणतात ते खरं का ?

**पाटील** : अवो, तिचं काय ऐकता ! परड्यातलं लाकूड गेलं तरी सा म्हैने कळकळणारी ही बायकांची जात ! आता वाळल्याबरोबर वल्लं बी जरा जळायचचं ! नका ध्यान देऊ तिच्या बोलण्याकडं. निवांत झोपा आता महाराज ! आमी बी जरा पडतो.

## प्रवेश दुसरा

(रस्ता : बैरागी जात आहेत. प्रतापराव व सैनिक घोड्यांवरून येतात.)

**प्रतापराव** : (बैराग्यांना नमस्कार करत) बैरागी ! आपण कोण देशीचे ?

**कल्याण** : आम्ही काशीचे बैरागी !

**प्रतापराव** : मग दक्षिणेत बरे उतरलात ?

**आनंद** : (कुबडीशी चाळा करत) बेटा, बोलून चालून आम्ही बैरागी. परमेश्वराच्या धरतीवर फिरायला बंदी कसली ?

**प्रतापराव** : महाराज, एक संकट आहे. ते टळेल का ? आपण सांगू शकाल ?

**कल्याण** : बेटा, तो योग मला नाही. पण हा आनंद आहे ना, त्याला हा योग आहे. तो भूत-भविष्य जाणतो. तू त्याला विचार.

**प्रतापराव** : (आनंदाला हात जोडीत) महाराज, कृपा व्हावी !

**आनंद** : बेटा ! संकट काय आहे ?

**प्रतापराव** : (जरा साशंक होऊन) महाराज, खरोखरच आपण भूत–भविष्य जाणता ना ?

**आनंद** : अरे, संशय कसला ? आमची परीक्षा करतोस ! मग ऐक तर, सांगू तुझं नाव ? तू ना ? 'प्रतापराव' ही राजानं लावलेली उपाधी ! आज तुझ्या हाताखाली हजार स्वार मला दिसतात. तू सेनापती आहेस. आणि ऐक, तुझा राजा अद्यापि गडावर आलेला नाही. तो गडावर पोहोचला हे साफ

खोटं आहे. तुझा राजा तुला भेटेल का, हे तुला विचारायचं होतं ना?

**प्रतापराव :** धन्य महाराज! (आनंदाच्या पाया पडतो.) महाराज, चूक झाली. क्षमा व्हावी! आमचे राजे अद्याप गडावर आले नाहीत. त्याच चिंतेत आम्ही आहोत.

**आनंद :** बेटा, चिंता करू नकोस! तुझा राजा सुखरूप आहे.

**प्रतापराव :** सुखरूप आहेत! पण भेटतील केव्हा?

**आनंद :** अरे, अगदी नजीकच्या काळात. ह्याच सप्ताहात! ह्याच सप्ताहात तू राजाचे पाय शिवत असलेला मला दिसतो आहेस.

**प्रतापराव :** महाराज, तसं झालं तर स्वर्गाला माझे हात लागतील! (आपल्या हातातल्या सोन्याच्या कड्याकडे पाहात.) महाराज, आपलं भविष्य खरं ठरलं, तर खुद्द राजांनी आपल्या हातांनी या हातांत घातलेलं कडं मी तुमच्या हाती घालीन.

**आनंद :** त्यात आम्हांलाही आनंदच आहे.

**प्रतापराव :** पण महाराज, आपला मुक्काम कुठं?

**आनंद :** (हात उंचावतात) बेटा, चिंता करू नकोस, तुझी राजाशी भेट होईल तेव्हा मी तिथंच असेन. (प्रतापराव व इतर सैनिक बैराग्यांना वंदन करून जातात.)

### प्रवेश तिसरा

(जिजाबाई देवघरात देवपूजा करत आहेत.)

**जिजाबाई :** कोण, मोरोपंत? का आलात बाबा?

**मोरोपंत :** मासाहेब, दारी चार बैरागी आलेत. आपलं दर्शन मागतात.

**जिजाबाई :** जा बाबा, त्यांची समजूत घाल. सारं करून थकले मी. अभिषेक झाले, अनुष्ठानं झाली, दानधर्म झाला, पण माझा शिवबा मला दिसत नाही. मला आता कोणाला भेटायची इच्छा नाही. जा, त्यांना हवी ती भिक्षा घाल. (मोरोपंत हात जोडून जातो. पुन्हा परत येतो.)

**मोरोपंत :** मासाहेब ते भिक्षा स्वीकारायला तयार नाहीत. त्यांना आपलं दर्शन हवं आहे. त्याशिवाय ते जागचे हालत नाहीत.

**जिजाबाई :** (देवाला नमस्कार करत) बैरागीसुद्धा हट्टी बनावेत ना? येते बाबा! आता कुणाचे शाप नकोत मला. (जिजाबाईचा तोल जातो. मोरोपंत त्यांना सावरतात.) आताशा तोल जातो बघ.

**मोरोपंत :** मासाहेब, वय झालं. उपास सोसत नाहीत.

जिजाबाई : मग मरण का रे येत नाही ? (स्वतःशीच) कुठं भटकत असेल पोर ? शिवबा मोठा आहे. सारं सोशील तो. पण जीव तुटतो तो त्या कोवळ्या पोरासाठी.

मोरोपंत : मासाहेब, बैराग्यांना भेटून थोडा वेळ पुढच्या महालात यावं.

जिजाबाई : का रे ?

मोरोपंत : सारे गोळा झालेत. काहीतरी ठरवायला हवं.

जिजाबाई : बरं (मोरोपंत जातात.)

## प्रवेश चौथा

(जिजाबाईंना पाहताच आनंद बैरागी त्यांच्या पायांवर मस्तक ठेवतो.)

जिजाबाई : (मागे सरून) अरे ! आजवर थोडे का अपशकुन झाले ! बैरागी कधी पाया पडतो का ?

शिवाजी : मासाहेब, तुम्ही आम्हांस ओळखत नाही ?

जिजाबाई : (आनंदातिशयाने मिठी मारत) शिवबा !

शिवाजी : मासाहेब बसावं. जरा शांत व्हा. मग खूप बोलू.

जिजाबाई : (डोळ्यांतील आनंदाश्रू पुसत) शिवबा ! शंकराची उपासना करत होते ना ? अगदी त्या रूपात प्रगटलास !

(महाराज जिजाबाईसह महालाबाहेर येतात. त्यांना पाहून सर्व जण अगदी आश्चर्याने थक्क होतात. लवून मुजरा करतात.)

प्रतापराव : महाराज ? आपण....?

शिवबा : हो ! मीच तो ! आम्ही सांगितलं होतं ना ? जेव्हा तुमचे राजे प्रकट होतील तेव्हा आम्ही तुमच्याजवळ असू. पण प्रतापराव, तुम्ही आमचे सेनापती. निदान तुम्ही तरी आम्हांला ओळखायला हवं होतं. (प्रतापराव ओशाळतात...प्रतापराव, आनंदराव, तेलंगराव, धनाजी, बाळाजी, मोरोपंत यांच्यावरून महाराज प्रेमाने व कृतज्ञतेने नजर फिरवतात. प्रतापरावांच्या खांद्यावर हात ठेवत) तुमचे अनंत उपकार आमच्या राज्यावर आहेत. आम्ही शत्रुघरी सापडलो. कैद झालो. अनेक मास लोटले तरी राज्याची घडी एवढीही विघडू दिली नाहीत. एवढंच नव्हे तर आम्ही नसताना आमचं कार्य चालू ठेवलंत, हे तुमचे उपकार कधी फिटायचे नाहीत. मोरोपंत, धनाजी, तुमची एवढी ताकद असली तर राज्य उभारणीला माझीही गरज लागणार नाही.

(महाराज आपले अश्रूंनी भरलेले डोळे पुसतात.)

धनाजी : महाराज, बाळराजे कुठं आहेत ?

शिवाजी : नको तो प्रश्न विचारलात ! (डोळे मिटून) बाळराजांचा काळ झाला. बाळराजे आम्हांस सोडून गेले. (जिजाबाईकडे पाहून) मासाहेब !

जिजाबाई : (टाहो फोडून) बाळराजे ! मला टाकून कसे गेलात ? कुणी परवानगी दिली ?

शिवाजी : (जिजाबाईंना समजावत) मासाहेब, आमचं जरा ऐका.

जिजाबाई : (महाराजांचा हात झिडकारत) काय राजे, नको ते ऐकलं ! आणखीन काय ऐकू ? थोरामोठ्यांच्या राजकारणात हकनाक माझं पोर घालवलंत ! राजे, निदान त्या सईला दिलेल्या वचनाची तरी आठवण ठेवायची होती !

शिवाजी : मासाहेब, जरा ऐका ! थोडं देवघरात चला.

जिजाबाई : देवघरात ? आता कोण आहे तिथं तर देवघरात जाऊ ? अरे, माझा बाळकृष्ण गेला ! त्या रित्या गाभाऱ्यासमोर कशाला जाऊ मी ? (महाराज बळेच त्यांचा हात धरून देवघरात नेतात.)

शिवाजी : मासाहेब, जरा ऐका ! मासाहेब, आम्ही तुम्हांला नंतर सांगणारच होतो. पण नाइलाजानं आताच सांगावं लागतं. चिंता नका करू. तुमचे बाळराजे सुखरूप आहेत !

जिजाबाई : (आश्चर्याने व आनंदाने) शिवबा !

शिवाजी : या जगदंबेशपथ ! मार्ग धोक्याचा म्हणून त्यांना मथुरेत ठेवलं आहे. पण जी बातमी आता उठली, तीच कायम टिकणं हिताचं आहे. आणि बाळराजे शत्रुमुलखातून घरी येईपर्यंत तुम्हीसुद्धा तीत सामील झालं पाहिजे.

जिजाबाई : मी ? राजे !

शिवाजी : ऐका मासाहेब ! जोवर तुमचे बाळराजे तुम्हांला भेटत नाहीत, तोवर आम्ही आमच्या वचनाला बद्ध आहोत. बाळराजांच्या मृत्यूची बातमी आपोआप दिल्लीला जाईल. शोध थांबेल आणि बाळराजे सुरक्षित घरी येतील; तोवर आमच्याही जिवाला स्वस्थता लाभणार नाही.

जिजाबाई : शिवबा, तुझ्या असल्या राजकारणात साध्या माणसाची आतडी तुटतात रे ! (महाराजांना मिठी मारून) शिवबा ! शिवबा !

उपाधी–पदवी, अनुष्ठान–देवासाठी करायची एक विशिष्ट पूजा, हकनाक–विनाकारण, उगीचच, कारण नसताना, कृतज्ञ–उपकारांची जाणीव ठेवणारी व्यक्ती.

(बाल भारती)

१०.

## माझ्या गावची स्थिती

माझे गाव भिवडी. तालुका पुरंधर, जिल्हा पुणे. पंचायत समितीचा मी सभासद आहे. त्या नात्याने रोजगार हमी योजनेची मला माहिती आहे.

मी समाजवादासाठी गेली कित्येक वर्षे आपल्यापरी खटपट करीत आहे. धडपडत आहे. सर्वांना कामाची हमी याचा अर्थ दलितवर्गीय आणि भूमिहीन यांना कामाची हमी असा मी करतो. इतरांना त्या मानाने बरे दिवस असतात. ही योजना यशस्वी झाली आणि दुबळ्या वर्गांना चांगले दिवस आले तर चांगलेच होईल. ग्रामीण भागातल्या दुबळ्यांचा आवाजही क्षीण असतो, आणि ते विखुरलेले असतात, त्यामुळे त्यांच्या कैवाऱ्यांनाच त्यांच्या वतीने हे काम करावे लागते. या वर्गाचा मी स्वतःला साथी मानतो व त्यांच्या भल्यासाठी धडपडतो. तर आमच्याच भिवडी गावची गोष्ट घेऊ. दोन हजारांची वस्ती आहे. त्यातले चारशे स्त्री-पुरुष असे आहेत की ज्यांना खरोखरी रोजगाराची हमी देणे आवश्यक आहे. त्यांच्या पैकी निम्मे हरिजन आणि भूमिहीन आहेत, त्यांना अधूनमधून कुठे तरी काही तरी काम मिळत असते आणि प्राण आणि कुडी ते एकत्र ठेवू शकतात.

काम मिळाले तर पुरुषाला सरासरी तीन रुपये आणि बाईला दीड रुपया मिळतो. या दिवसांत विहिरी, बांधबंदिस्ती अशी इथे तिथे काही कामे चालू असतात.

रोजगार हमी योजनेत आमच्याकडे नाव नोंदणी सुरू झाली तेव्हा सर्वांनी नावे नोंदवली. शासनामार्फत सतत काम मिळेल अशी आशा आणि कामासाठी याच्या-त्याच्यापुढे तोंड वेंगाडावे लागण्याची पाळी येणार नाही अशी आशा त्यांना वाटते.

आमच्या पंचायतीला प्रश्न पडला आहे की या सर्व लोकांना कुठे, कसे, आणि किती दिवस काम देता येईल? गावचा शेतसारा वर्षाचा सोळाशे रुपये आहे. तो सगळाच्या सगळा मिळाला तरी एक बाईला आणि एक पुरुषाला वर्षभर काम देता येईल. त्यातून कोणत्या कामाची उभारणी होणार? प्रश्न रोजगार कशातून द्यायचा आणि काम कशाचे द्यायचे? आमच्या गावाचा एक अडीच मैलांचा जोड रस्ता करायचा आहे. त्याच्यावर १०० माणसांना पंधरा दिवस काम देता येण्या-सारखे आहे. पण त्याला मजुरीसाठी ४५०० रुपये द्यावे लागतील. शिवाय त्या रस्त्यात नाले-ओढे येतात. त्यांच्या बंदोबस्तासाठी ८-९ हजार रुपये लाग-तील. ते मिळाले तर काम पूर्ण होऊ शकेल. त्याबाबत अद्याप काहीच समजले नाही.

आमच्या गावात किमान चार महिने शंभर माणसांना रोजगार देणे ही अगदी निकडीची गरज आहे. असा रोजगार न मिळाला तर त्यांची उपासमारच होणार आहे. तलाठी, ग्रामसेवक आणि शिक्षकांनी पाहणी-नोंदणीचे काम केले आहे. कामांची यादी मात्र अद्याप उपलब्ध नाही. एक मे ला योजना लागू व्हायची आहे, पण गावाच्या महसुला-तून पूर्ण करता येईल असे सर्वांना उपयोगी पडणारे कोणतेच काम नजरेसमोर नाही. पाझर तलाव हे एकच असे काम दिसते की ज्याचा उपयोग शेतीचे उत्पादन व रोजगार वाढवण्यासाठी होईल; आणि ज्याच्यावर अनेकांना काम देता येईल. आणि प्रत्येक ठिकाणी करता येईल असे हे काम आहे. पण गावाच्या निव्वळ महसुलात ही कामे पूर्ण करता येतील, ही शक्यता नाही.

— गोपाळराव गोविंदराव गायकवाड

## ११. राष्ट्रीय सभेची वाटचाल

**राष्ट्रीय सभेच्या मागण्या :** सन १८८५ साली राष्ट्रीय सभा स्थापन झाली हे आपण पाहिले. संबंध राष्ट्राला एका राष्ट्रीयत्वाच्या धाग्याने एकत्र आणण्याचे कार्य या राष्ट्रीय सभेने केले. इंग्रजांची येथील सत्ता एकतंत्री, एकसूत्री व राष्ट्रव्यापी होती. अशा पोलादी सत्तेविरुद्ध आपल्या हक्कांसाठी झगडणारी संघटना राष्ट्रव्यापी होणे जरूर होते. सुरुवातीच्या काळात राष्ट्रीय सभेने कायदयाच्या चौकटीचा जास्तीत जास्त उपयोग करून लोकांना राज्यकारभारात हक्क मिळावेत म्हणून खटपट केली. हळूहळू जनतेच्या हाती सर्व राज्यकारभार यावा अशाच रोखाने जणू या संघटनेची वाटचाल होत होती. भारतमंत्र्यांचे इंडिया कौन्सिल रद्द करण्यात यावे, हिंदी राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठी शाही कमिशन नेमण्यात यावे, हिंदी सनदी नोकरांची परीक्षा (आय. सी. एस.) इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत एकाच वेळी घ्यावी, राज्यकारभारात हिंदी लोकांना वाढत्या प्रमाणात सहभागी करून घ्यावे, इत्यादी ठराव राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनात पास झाले.

**सरकारी स्नेह आता आटू लागला :** भारतात राष्ट्रीय सभा स्थापन व्हावी ह्या ह्यूमच्या खटपटीस त्यावेळचा गव्हर्नर जनरल लॉर्ड डफरिन याने आशीर्वाद दिला होता. पण या राष्ट्रीय सभेस समाजाचा मिळणारा वाढता पाठिंबा तसेच राष्ट्रीय सभेच्या चळवळीतून लोकांना आलेला हुरूप पाहून इंग्रज सत्ताधाऱ्यांच्या धोरणात पुढे फरक पडला. येथील राष्ट्रीय चळवळीच्या वाढत्या प्रवाहाला अटकाव व्हावा म्हणून इंग्रज सरकारने अडवणुकीचे धोरण स्वीकारले. सन १८८८ साली राष्ट्रीय सभेचे तिसरे अधिवेशन अलाहाबाद येथे भरावयाचे ठरले होते. हे अधिवेशन भरण्यासाठी तेथे जागा मिळू नये अशी खटपट तेथील इंग्रज अधिकाऱ्यांनी केली. हेतू हा की हे अधिवेशन भरूच नये.

सन १८८९ साली सरकारतर्फे एक परिपत्रकही निघाले की, "सरकारी नोकरांनी राष्ट्रीय सभेत भाग घेता कामा नये." तेव्हापासून न्या. रानडे यांनी देशातील सामाजिक प्रश्नांचा विचार करण्यासाठी कॉंग्रेसच्या अधिवेशनास जोडूनच सामाजिक परिषद घेण्यास सुरुवात केली. सरकारी नियमामुळे कॉंग्रेसच्या अधिवेशनात प्रत्यक्ष भाग घेता आला नाही तरी तेथील विचारविनिमयात अनौपचारिकरीत्या भाग घेण्यासाठी सरकारी नोकरांना संधी मिळावी म्हणून ही योजना होती. सन १८९१ साली सरकारने वृत्तपत्रांवरील निर्बंध अधिक कडक केले.

संघटित होऊ लागलेल्या राष्ट्रीय सभेवर अशा प्रकारे एका बाजूने सरकारने राग धरला आणि थोडीफार दडपशाहीही सुरू केली, तर दुसऱ्या बाजूने हिंदी लोकांमध्ये फूट पाडून संघटना दुर्बल करण्याचेही प्रयत्न चालवले.

**फूट पाडण्याचे प्रयत्न :** हिंदुस्थानातील हिंदू आणि मुसलमान या दोन प्रमुख धार्मिक गटांत परस्परांबद्दल कटुता निर्माण करण्याचे प्रयत्न सरकारने सुरू केले. सन १८८८ साली सीमाप्रांताचे गव्हर्नर सर ऑकलंड कॉलव्हिन यांनी हिंदु-मुसलमानांत दुहीचे बीज पेरण्यास प्रारंभ केला. यानंतरही अगदी अखेरपर्यंत

ब्रिटिशांचे हे धोरण कायम राहिले. पुढे सन १९०९ मध्ये मोर्ले-मिंटो-सुधारणांन्वये मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ देऊन या दोन्ही जमातींत भेदभाव कायमचे रुजतील अशी व्यवस्था केली. राखीव जागांच्या प्रमाणाबाबतीतही भेदभाव करण्यात आले.

राष्ट्रीय सभेची चळवळ जसजशी वाढू लागली तसतशी इंग्रजांनी 'फोडा व राज्य करा' ही नीती आणखी वाढवली. हिंदुधर्मातील जातीजातींत वैमनस्य वाढेल अशा खटपटीही त्यांनी केल्या.

**एक जुना वाद** : सन १८८० नंतरच्या काळात विशेषतः महाराष्ट्रात 'आधी राजकीय सुधारणा की समाजसुधारणा' हा वाद सुरू झाला होता. त्यातील मर्म नेमके काय होते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. स्वातंत्र्य मिळाले की समाज आपोआप सुधारेल असे एका पक्षाला वाटत होते, तर समाज सुधारल्याशिवाय स्वातंत्र्य मिळवूनही काही उपयोग नाही अशी दुसऱ्या पक्षाची विचारसरणी होती.

नेमस्त लोक सुधारणांचे पुरस्कर्ते होते. आगरकर हे सुधारकांचे अग्रणी. आधी आपण सुधारले पाहिजे, आपले घर सुधारले पाहिजे असे ते म्हणत. तर टिळक म्हणत, "हे घरच माझे नाही ! ते अगोदर ताब्यात घेऊ या, मग आपण हव्या त्या सुधारणा करू." अर्थात जहाल आणि मवाळ हे स्वभावभेद असले तरी दोन्ही पक्षांत प्रामाणिक, स्वार्थत्यागी व कळकळीचे नेते होते. केवळ पोट भरण्यासाठी सरकारच्या नोकरीत आयुष्य न घालवता देशसेवा करावी म्हणून काही देशभक्तांनी सार्वजनिक सेवेस आरंभ केला. न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना करण्यात टिळकांनी चिपळूणकरांना मदत केली. 'केसरी' हे वृत्तपत्र सुरू करून त्यांनी लोकजागृतीचे कार्य हाती घेतले. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली. या देशभक्तांनी शिक्षणाच्या रूपाने देशसेवेचा महान संप्रदाय उभारला. शिक्षण देऊन समाजाला शहाणे करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. आधुनिक विज्ञान, रसायनशास्त्र, शास्त्रीय शोध यांचे शिक्षण मुलांनी घ्यावे असे त्यांचे ध्येय होते. मात्र हे शिक्षण राष्ट्रीय



गोपाळ कृष्ण गोखले



वृत्तीने दिले पाहिजे, आपला स्वाभिमान खच्ची होईल अशा पद्धतीने देता कामा नये, हा त्यांचा आग्रह होता. सन १८८५ ते १९०५ या वीस वर्षांच्या काळात लोकांत राजकीय जागृती व संघटना वाढत होती. तर दुसऱ्या बाजूस सरकारचे भेदनीती वाढवण्याचे प्रयत्नही वाढत होते, दडपशाही उग्र बनत होती. हिंदी कारभारयंत्रणेतील बहुतेक महत्त्वाच्या जागा इंग्रज

लोकांनाच मिळत होत्या. सरकार भरीव सुधारणेच्या दृष्टीने पाऊल टाकत नव्हते.

**जहाल व मवाळ पुढाऱ्यांचे गट :** पिळवणुकीच्या वेदना रयतेला असह्य होऊ लागल्या की मामुली हक्कांचे दान करायचे, ही इंग्रजांची रीतच होती. लॉर्ड लॅन्सडाउन (सन १८८८ ते १८९४) व्हाइसरॉय असताना सन १८९२ मध्ये हिंदी कायदेमंडळाचा कायदा पास झाला. कायदेमंडळासाठी निवडणुकीचा हक्क या कायद्यामुळे मिळाला. नव्याने होणाऱ्या निवडणुकीला टिळक उभे राहिले व निवडून आले. त्यानंतर नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्यासारख्या कळकळीच्या व अभ्यासू देशभक्ताला कायदेमंडळात जाण्याची संधी मिळाली. अंदाजपत्रकावर चर्चा करायचा हिंदी लोकांना मिळालेला हक्क गोखले मोठ्या समर्थपणे वापरीत. अंदाजपत्रकावरील त्यांच्या भाषणांत सरकारच्या स्वार्थी धोरणाचे वाभाडे काढलेले असत. गोखल्यांची ती भाषणे आजही अभ्यसनीय आहेत. अर्थात सरकारच्या धोरणामध्ये त्यामुळे फारसा बदल झाला नाही. लोकजागृतीस मात्र या भाषणांची फार मदत झाली. पहिल्या राष्ट्रीय सभेने भारतमंत्र्यांचे इंडिया कौन्सिल रद्द करण्याची व हिंदी कायदे-मंडळाच्या निवडणुकीचे तत्व आणण्याची मागणी केली होती. ती आपण पुरवली असे इंग्रज सरकारला सांगता येऊ लागले. सन १९०५ मध्ये राष्ट्रीय सभेत जहाल आणि मवाळ असे दोन गट पडले. मेथा, गोखले हे नेमस्तपक्षाचे म्हणजे मवाळांचे नेते होते. सरकारला आपण आपली गाऱ्हाणी साधार पटवून देऊ शकलो तर सरकार आपणांला निराश करणार नाही असे मवाळ गटाला प्रामाणिकपणे वाटे. जहालांचे नेतृत्व टिळकांकडे होते. अर्जविनंत्या अगर भाषणे करून इंग्रजी सत्ता हटणार नाही असे या पक्षाचे ठाम मत होते. चळवळीचे चटके बसल्याशिवाय इंग्रजी सत्ता वितळणे अशक्य असे जहाल म्हणत.

**दोन पंथांतील फरक :** जहाल आणि मवाळ यांच्यामधील मतभेद ध्येयाबद्दल नसून ध्येय मिळवण्याच्या मार्गाबद्दल होता. टिळक आणि त्यांचे जहाल अनुयायी यांना असे निश्चित वाटत होते की, राष्ट्रीय चळवळीत शेतकरी आणि सामान्य जनता यांचा समावेश झाल्याशिवाय तिला तेज आणि सामर्थ्य येणार नाही. राष्ट्रीय सभेत त्यावेळी हा वर्ग मोठा नव्हता. सन १८८९ साली केन नावाचा पार्लमेंटचा एक सभासद राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनास हजर होता. त्याने लिहिले आहे :

"माझ्या सभोवार बसलेले चार-पाचशे लोक हे एकजात वकील, डॉक्टर, प्रसिद्ध लेखक अगर तंत्रज्ञ आहेत."

म्हणजे काँग्रेस ही मुख्यतः सुशिक्षितांची संस्था होती. ही स्थिती टिळकांना पालटायची होती. राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ पुढे न्यायची तर संख्येस फार महत्व आहे असे ते मानीत. सन १८८१ साली त्यांनी 'केसरी' हे वृत्तपत्र काढले तेही अशा हेतूनेच. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीस भारतात वृत्तपत्रे निघू लागली होती. पण वृत्तपत्रांचा वाचकवर्ग मर्यादित होता. त्यांचा खप मुख्यतः शहरातील शिकलेल्या मंडळीमध्ये असे. या मंडळीमध्येच थोडीफार राजकीय जागृती होती. टिळकांची वृत्तपत्राबद्दलची कल्पना भिन्न होती. 'केसरी' खेडोपाडी जावा, तिथल्या शिक्षितांनी चौकाचौकातून सामान्य लोकांना व शेतकऱ्यांना वाचून दाखवावा, त्यांना आपल्या

हक्कांची आणि कर्तव्याची कल्पना यावी, असे टिळकांचे विचार होते व ते त्यांच्या हयातीत त्यांनी खरे करून दाखवले. सन १८९६ च्या दुष्काळात टिळकांनी ठाणे जिल्ह्यात दौरा केला. दुष्काळात सापडलेल्या रयतेला जास्तीत जास्त संघटित करण्याचा, त्यांच्यावरील अन्यायाची दाद लावण्याचा 'केसरी'ने खूप प्रयत्न केला. सामान्य माणूस जागृत व्हावा ही टिळकांना तळमळ होती.

सन १८९६ सालच्या दुष्काळात टिळकांनी सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांना घेऊन खूप काम केले. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली. राष्ट्रीय चळवळीचे लोण बहुजनसमाजापर्यंत पोहोचवणारे टिळक हे भारताचे पहिले नेते होते. त्यांचे एक इंग्रजी टीकाकार चिरोलसाहेब यांनी त्यांना 'हिंदी असंतोषाचे जनक' असे म्हटले आहे. टिळकांच्या या वर्णनातच त्यांचे खरे मोठेपण आहे. टिळकांनी जनतेस जागृत केले आणि इंग्रजी सत्तेविरुद्ध तीव्र असंतोष निर्माण केला. सन १८९७ साली पुण्यास



**लो. टिळक : लोकजागृतीच्या कार्यात**

प्लेगच्या निमित्ताने इंग्रजी सोल्जरांनी भयंकर धुडगूस घातला. त्यायोगे लोक अतिशय चिडले. चाफेकर नावाच्या एका शूर तरुणाने प्लेग बंदोबस्ताचा अधिकारी रँड याचा खून केला. याचा सूड म्हणून सरकारने प्रचंड दडपशाहीला सुरुवात केली. तेव्हा टिळकांनी 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' हा जळजळीत अग्रलेख लिहिला. निर्भयतेचा हा नवीन साक्षात्कार होता. भारतातील तरुण वर्ग टिळकांना राष्ट्रपुरुष मानू लागला. सन १८९८ साली टिळकांना सरकारने १॥ वर्षाची शिक्षा ठोठावली. याचा परिणाम उलट असा झाला की सर्वसामान्य लोक चळवळीत अधिक प्रमाणात येऊ लागले. नवे नवे कार्यकर्ते कणखरपणे चळवळीत भाग घेऊ लागले.

(बाल भारती)

# १२. विदूषक

मंगेश पाडगांवकर

## देऊळ

बगळ्याहून शुभ्र कपडे,
शब्दांत संस्कृतीचा धूप,
साधा वेष, उच्च विचार,
काळे पैसे खिशांत खूप.

कालच आणल्या मुलीनें
काश्मीरहून उंची साड्या;
या वर्षीं मुलानें
घेतल्या दोनच नव्या गाड्या.

साधी रहाणी, उच्च विचार
असें घरांत बाळकडू;
जगांतला अधर्म बघून
याला येतें टचकन रडूं.

भूदानाला सहज दिली
शंभर एकर नापीक जमीन :
तरी तिकीट मिळालें नाहीं :
निवडणुकीचें तंत्रच हीन.

काळे पैसे वाढत होते,
नाहीं झालें पुण्य क्षीण,
जगे फक्त द्राक्षांवर,
सफरचंदं दोनतीन.

मधाहून वाणी गोड :
कधींसुद्धां कोपला नाहीं;
प्रार्थना केल्यावांचून
एकदांही झोंपला नाहीं.

एक दिवस चार लाख
शाळेला दान दिले;
लाखों खर्चून नाक्यावर
रामाचें देऊळ बांधलें.

माझी आजी दंतहीन
वाती वळून देवळांत जाई,
म्हणे : "असा पुण्यवान
इसम कधीं झाला नाही."

मुंबई
३१·१२·६०

( मं. पाडगावकर : विदूषक )

# १३ गावरहाटी

वि. म. दांडेकर व म. भा. जगताप

## मृग

मृग निघाले आणि शेतीच्या कामाची गडबड सुरू झाली. मृग निघतांच हळदीची लागण झाली. त्यानंतर तीन दिवसांनीं तिला आंबवणी म्हणजे लागणीनंतरचें पहिलें पाणी आणि पुन: तीन चार दिवसांनीं चिंबवणी म्हणजे दुसरें पाणी द्यावें लागतें. मृग निघाले तरी पावसास म्हणावी तशी सुरवात झाली नाहीं. त्यामुळें हळदीची आंबवणी आणि चिंबवणी मोटेच्या पाण्यानेंच करावी लागली. मृगाचा दुसरा आठवडा तर अगदींच कोरडा गेला. त्यामुळें कांहीं शेतकऱ्यांनीं आपले उसालाहि मोटेनें पाणी देण्यास सुरवात केली आहे. कांहींजण पाऊस आज येईल, उद्यां येईल या आशेवर मोटेनें पाणी पाजण्याचें टाळीत आहेत. उसाची लागण उन्हाळ्यांत होत असल्यानें, तसेंच खोडवाहि उन्हाळ्यांतच फुटीला लागत असल्यानें पावसास सुरवात होईपर्यंत उसास विहिरीचेंच पाणी द्यावें लागतें. पुढेंहि दिवाळीनंतर पाटास पाणी कमी पडूं लागलें तर मोटेनें पाणी धरावें लागतें. त्यामुळें विहिरीचे आधाराशिवाय सहसा कोणी ऊस करीत नाहीं. परंतु यंदा गुळास भाव चांगला असल्यानें कांहीं शेतकऱ्यांनीं विहिरीचा आधार नसतांहि केवळ पाऊस व पाटाचे पाण्यानें भिजून निघेल या आशेवर नवीन उसाची, जराशी उशिरानें लागण केली आहे. ते लोक पावसाची वाट पहात आहेत.

नवीन लागणीचे उसांत भाजीपाला करतात. त्यांपैकीं दुसे आतां खाण्यास आले आहेत. बाकीची भाजी अजून खाण्यास झालेली नाहीं. आंबे उतरणें, पिकवणें आणि विक्रीस नेणें अजून चालू आहे. नवबौद्धांपैकीं कांहींजण आंब्याचा व्यापार करतात. ते बहुधा झाडावरील आंबे पाहून झाडच उक्तें ठरवून घेतात. आंबा थोडा निघाल्यास भोगांवचे स्टँडवर नेऊन किरकोळीनें विकतात. आंबा जास्त निघाल्यास गाडी भरून पिंपळगांवच्या बाजारास नेतात.

जिरायतांतील पेरण्या खरीफाचे एक दोन पाऊस झाल्याशिवाय होत नाहीत. त्यांना अजून अवकाश आहे. परंतु मृग निघतांच शेतकरी जिरायती रानेंहि पेरणीस तयार करूं लागले आहेत. बहुतेकांनीं आपलीं शेणखतें गांवठाणांतील उकिरड्यांतून रानांत नेऊन कोणी ढिगल्या करून तर कोणी एक एक गाडीचा ढीग करून टाकलीं आहेत. कांहींनीं खतें विसकटून त्यावर कुळवाच्या पाळ्या देण्यास सुरवात केली आहे. परंतु बहुतेकांचीं खतें विसकटावयाचीं आहेत.

खरीफांतील मुख्य जिरायती पिकें म्हणजे बाजरी व भुइमूग. भुइमुगाचे बियाकरतां कणगीमध्यें लिंपणांत ठेवलेल्या शेंगा काढून, त्या फोडून त्याचे दाणे तयार करून ठेवण्यास शेतकऱ्यांच्या बायांनीं सुरवात केली आहे. आज भुइमुगांत चार प्रकारचे भुइमूग दिसून येतात. त्यांतील मुख्य म्हणजे पसऱ्या भुइमूग. याच्या शेंगा मोठ्या ढोवळ्या व दाणेहि मोठे

असतात. एकांबेंच्या शिवारांत मुख्यतः पसऱ्या भुइमुगाचीच लागण आहे. दुसरा प्रकार उपट्या भुइमूग. याचे दाणे लहान व लाल आहेत. तिसरी एक जपानी म्हणूनहि जात आहे. तिचे दाणे लहान व पांढरे असतात. तेलाचे दृष्टीनें उपट्या व जपानी दोन्ही जाती पसऱ्यापेक्षां चांगल्या समजतात. तसेंच त्या पसऱ्यापेक्षां लवकरहि तयार होतात. परंतु या दोन्ही जातींचा प्रसार अजून जास्त झालेला नाहीं. चवथी जात म्हणजे जुनी गांवठी भुइमुगाची. ह्या जातीला तयार होण्यास पसऱ्या भुइमुगापेक्षांहि जवळ जवळ महिनाभर जास्त वेळ लागतो. तिच्यांत तेलाचें प्रमाणहि अगदीं कमी आहे. त्यामुळें ती आतां जवळ जवळ नाहींशी होत चालली आहे. आज ती विक्रीकरतां कोणी करीत नाहीं. परंतु तिच्यांत तेलाचा अंश कमी असल्यानेंच ती खाण्यास चांगली समजतात. आणि केवळ घरीं खाण्याकरतां म्हणून कांहीं लोक तिची लागण करतात.

भुइमुगाच्या शेंगा फोडून त्याचे दाणे नीट करण्याबरोबर कणगींत शिल्लक असलेली ज्वारी काढून तिला ऊन देण्यांतहि बाया गुंतलेल्या आहेत. ज्वारीला वैशाखाचीं एक दोन उन्हें द्यावींत असा शेतकऱ्यांचा नियम आहे. म्हणजे पुढें ज्वारी किडत नाहीं.

खरीफांतील आणखी एक महत्त्वाचें पीक म्हणजे बटाट्याचें. एकांबें गांवांत बटाट्याची लागण नव्यानेंच सुरू झालेली आहे. आज खरीफ बटाट्याखालीं सुमारें पन्नास एकर क्षेत्र आहे. बटाट्याचें बेणें पुणें जिल्ह्यांतून पुणें, खेड, जुन्नर, मंचर, नारायणगांव, आळंदी इत्यादि ठिकाणांहून येतें. एकांबें गांवीं बटाटे करणाऱ्या शेतकऱ्यांपैकीं कांहीं स्वतः खेड, मंचर भागांत जाऊन तेथील शेतकऱ्यांकडून बेणें खरेदी करून घेऊन येतात. बाकीचे पुण्याहून दलालाकडून आणतात. दर एकरीं पांचसहा पोतीं बटाट्याचें बेणें लागतें. परवाच तुकाराम श्रीपती पवार यांनीं पुण्याहून दहा पोतीं बेणें आणलें आहे. पुण्यास बेण्याचा भाव बंगाली मणास साडेसोळा रुपये होता. त्यामुळें पोत्यास एकेचाळीस रुपये बसले आहेत. हीं पोतीं पुण्याहून भोगांवापर्यंत मालमोटारीनें आणलीं. त्याचें भाडें दर पोत्यास सव्वा रुपया पडलें. पोतीं भोगांवाहून एकांबेंपर्यंत स्वतःचे बैलगाडीनें नेलीं.

बटाट्याला लागणीबरोबरच भुइमुगाची पेंड घालावी लागते. त्याचें प्रमाण एक पोतें बेण्यास एक पोतें पेंड असें ठरून गेलें आहे. आपल्या बटाट्याकरतां दहा पोतीं भुइमुगाची पेंड तुकाराम श्रीपती पवारांनीं दोन महिन्यांपूर्वींच आणून ठेवली आहे. त्यावेळीं पेंडीचा भाव बंगाली मणास बारा रुपये होता. पोत्यांत दोन मण पेंड बसते. त्यामुळें पेंडीच्या पोत्यास चोवीस रुपये पडले. त्यावर बारदान, वाहतूक इत्यादि धरून गांवांत येईपर्यंत पेंड सव्वीस रुपये पोत्यानें पडली आहे. पेंड आणून गांवांत जयहिंद गिरणीच्या हॉलरवर भरडून घेतली आहे. त्याचे पोत्यामागें आठ आणे द्यावे लागतात. अशा रीतीनें तुकाराम श्रीपती दहा पोतीं बटाटे लावण्याच्या तयारींत आहेत.

बाकीचे शेतकरी बटाट्याचें बेणें व पेंड एकदमच घेऊन येण्याचे हिशेबानें बाहेर पडले आहेत. आणि कांहीं पाऊस येतो कीं नाहीं याची वाट पहात थांबले आहेत. पावसास सुरुवात झाली म्हणजे बेणें व पेंड आणण्यासाठीं ते बाहेर पडतील.

अशा रीतीनें शिवारांत कामाची गडबड सुरू झाली असली तरी अजून सारे लोक लग्नाच्या हंगामांतून बाहेर पडलेले नाहींत. गेल्या आठपंधरा दिवसांतहि गांवांत कांहीं लग्नें झालीं. पूर्वी म्हणजे दहापंधरा वर्षांपूर्वी मुलीला देज देत असत. आतां मुलाला सोन्याची आंगठी, घड्याळ, सायकल, या ना त्या रूपानें देज द्यावा लागतो. त्यामुळें गरीब मुलींच्या बापांची परिस्थिति फार अवघड झाली आहे. गेल्या आठवड्यांत रामा पांडू खामकर यांच्या मुलीचें लग्न झालें. रामा पांडू खामकरांना गांवांत अगदीं थोडी जमीन आहे. त्यामुळें ते आसवली गांवी एका शेतकऱ्याकडे सालदार म्हणून कामाला राहिले आहेत. तेथें त्यांना जेवण, कपडे करून सालाचे दोनशें रुपये मिळतात. त्यांनीं आपली मुलगी परवा फलटण तालुक्यांत विसापूर गांवीं दिली. नवरा मुलगा पोस्टमन म्हणून नोकरींत आहे. मुलगा नोकरदार, त्यामुळें त्याचा भाव अधिक. रामा पांडू खामकरांनीं नवऱ्या मुलास एक तोळ्याची आंगठी व शंभर रुपयांचा बस्ता केला. त्याखेरीज चारशें रुपये अन्नखर्च व शंभरसव्वाशें रुपये इतर खर्च असें साडेसातशें रुपयांत गरिबाचें लग्न झालें आहे. या लग्नाकरतां रामा पांडूनी आठशें रुपयांचें कर्ज काढलें आहे. त्याचें व्याज कमींत कमी बारा टक्क्यांनीं धरलें तरी रामा पांडू व्याज किती देणार आणि मुद्दल केव्हां फेडणार ?

उन्हाळ्याची सुट्टी संपून कोर्टें सुरू झालीं आणि कोर्टाच्या तारखा सुरू झाल्या. गेल्या आठवड्यांत रेडा प्रकरणाबाबतच्या फौजदारीची तारीख होती. भैरवदेवाच्या इनाम जमिनीचे प्रकरणांत आपली बाजू कायदेशीर असली तरी गांवाचे वहिवाटीस बरून नाहीं, याची गुलाबराव पाटलांना जाणीव आहे. त्यामुळें शक्य त्या उपायांनीं जीं जोडतां येतील तीं माणसें बाजूस जोडावींत आणि आपणास विरोध करणाऱ्या मंडळीस या ना त्या प्रकरणांत, जमेल तर फौजदारींत गुंतवावें असें त्यांचें धोरण असतें. या धोरणानुसारच ही फौजदारी चालू झाली आहे.

गांवांत महारवाड्यालगत श्रीमहालक्ष्मीआईचें देऊळ आहे. महालक्ष्मीला केलेले नवस फेडण्याकरितां एकादा लहानसा रेडा देवीच्या नांवानें मोकळा सोडून देण्याची फार पूर्वीपासूनची पद्धत आहे. हा मोकळा सोडलेला रेडा गांवाचे शिवारांत फिरून चरत असे. तो मोठा झाला म्हणजे त्याचा पिकांना उपद्रव होई. परंतु त्याचे गळ्याला दावें लावावयाचें नसे की तो विकूनहि टाकतां येत नसे. देवीचा रेडा विकला तर गांवाला त्रास होतो असें समजतात. त्यामुळें त्यांतून सुटका म्हणून रेडेजत्रा करीत, म्हणजे देवीला रेड्याचा बळी देऊन गांवचे महार त्याचें जेवण करीत.

रेडेजत्रा आषाढांत होत असे. त्याकरतां गांवचे महार आसपासच्या महारवाड्यांनाहि आमंत्रणें देत. आणि जेवणासाठीं गांवांतून धान्य गोळा करीत. जत्रेच्या वेळी रेड्याचे माथ्यावर शेंदूर लावून सर्व गांवाला वेढा

बसेल अशा रीतीनें त्याची मिरवणूक काढीत. रेड्याला दोन दोन माणसांनीं दोन्ही बाजूला दाव्यानें धरलेलें असे. पुढें वाजंत्री वाजत गाजत ही मिरवणूक निघे. गांवाला वेढा दिल्यानंतर मिरवणूक श्रीमहालक्ष्मीचे देवळापाशीं येई. त्यानंतर रेड्याला धरून वाजत गाजत श्रीमहालक्ष्मीचे देवळाभोवतीं धावत धावत दहा वीस प्रदक्षिणा घालीत. रेडा दमला म्हणजे त्याला देवी-पुढें उभा करून त्याचा बळी देत. त्यावेळीं रेड्याचे मानेवर कुऱ्हाड चालविण्याचा मान पवार व खामकर यांचेपैकीं मुकादम समजल्या जाणाऱ्या घराकडे असे. त्यानें कुऱ्हाड चालविल्यानंतर महार मंडळी तो कापून त्याचें जेवण करीत. रेड्याचें शिर देवीपुढल्या पटांगणांत पुरीत असत. अशा तऱ्हेची रेडे जत्रा एकांबें गांवीं १९३६ सालीं झाली होती असें म्हणतात. त्यानंतर रेडे जत्रा झालेली नाहीं. परंतु दसऱ्याचे दिवशीं श्रीमहालक्ष्मी-आईचे देवळासमोरील पटांगणांत जेथें रेड्यांचीं शिरें पुरलेलीं आहेत, त्या जागेवर बाजरीचीं कणसें आणि कारळ्याचीं फुलें वाहण्याची प्रथा अजूनहि आहे.

रेडे जत्रा बंद झाली तरी देवीचे नांवानें नवसाचा रेडा सोडून देण्याची प्रथा अजून बंद झालेली नाहीं. सुमारें दहा बारा वर्षांपूर्वीं गुलाबराव पाट-लांचे आईनें असाच एक रेडा देवीचे नांवानें सोडला होता. पुढें तो मोठा होऊन पिकांत शिरूं लागला. गेल्या दिवाळींत ह्या रेड्यानें चौणू नारू पवार यांचे शेतांत शिरून पिकाची नासधूस केली म्हणून त्यांनीं रेडा धरून कोंडवाड्यांत घातला. तेव्हां कांहीं दिवसांनीं गांवानें सर्वांच्या विचारानें ग्रामपंचायतीच्या कोंडवाड्याचा दंड भरून रेडा सोडविला. परंतु तो आतां विकून टाकावा असें ठरलें. त्याकरतां पवार आळीच्या पुढारी मंड-ळींची बैठक झाली. श्रीपतराव पाटील, गणपतराव नाना भागवत, काशी-नाथ हरी पवार इत्यादि मंडळी जमली होती. त्यांत असें ठरलें कीं काशीनाथ हरी पवार यांनीं अजणूजच्या बाजारांत नेऊन रेडा विकावा. गांवातर्फे कोंडवाडा-दंड नारायण विनायक खामकर यांनीं भरला होता. तो भागवून राहील ती रक्कम पवार व खामकर आळींत निम्मेनीम वांटून घ्यावी. पवार आळीला येणाऱ्या पैशांपैकीं निम्मे काशीनाथ हरी पवार यास द्यावेत असें ठरलें. परंतु त्याच सुमारास गणपतराव नाना भागवत यांचेकडे पाहुणे म्हणून दोन कोकणी शेतकरी आले होते. त्यांनीं रेडा घेण्याचें ठरविलें. त्यामुळें अजणूजच्या बाजारास जाण्याचें कारण राहिलें नाहीं. रेडा कोकणी शेतकऱ्यांस विकून टाकावा म्हणून काशीनाथ हरी पवार, रामा हनुमंता पवार, केसू रामा पवार, तुकाराम श्रीपती पवार, ज्ञानेश्वर पाटील इत्यादि पवार आळीच्या मंडळींना बोलावून घेतलें. यांतील कांहीं मंडळी आली, कांहीं उशिरानें आली, कांहीं आलीच नाहींत. ही बैठक नारायण विनायक खामकर यांचे वाड्यांत जमली होती. नारायण खामकर समिती पक्षाचे म्हणून कांग्रेस पक्षाचे कोणीच आलें नाहीं. जमलेल्या मंड-ळींनीं पंचाण्णव रुपयांस रेडा देण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें पावती करून पैसे घेऊन रेडा कोकणी लोकांस देऊन टाकला. आलेले पैसे निम्मे पवारांत व निम्मे खामकरांत वांटून घेतले. ही सहा महिन्यांपूर्वींची हकीकत आहे.

एवढें होतांच कांग्रेस पक्षाचे ज्ञानेश्वर पाटील, गुलाबराव पाटील व कांहीं मंडळींनीं सात आठ मैलांवर अहिरें येथील पोलीस ठाण्यावर जाऊन,

समिती पक्षाच्या कांहीं लोकांनीं गांवाचा रेडा विनाधिकार विकला म्हणून वर्दी दिली. तावडतोब अहिल्याचे हवालदार श्री. पठाण गांवीं आले. आणि त्यांनीं पावती व रेडा जप्त करून रेडा विकणाऱ्या मंडळीवर फौजदारी केली. जप्त केलेला रेडा गांवचे पोलीस पाटलांचे ताब्यांत देण्यांत आला. तो दोन महिने चावडीसमोर बांधून ठेवला होता. गांवचे महार आळीपाळीनें राखण बसत. घरोघर मागून आणून त्याला वैरण घालीत. व पाणी पाजीत. शेवटीं महार कंटाळले व पोलीस पाटीलहि कंटाळले. तेव्हां रेडा खरेदी घेणाऱ्या कोकणी माणसाचे ताब्यांत सरकारमार्फत देण्यांत आला. परंतु फौजदारी केली होती ती चालूच राहिली. काशीनाथ हरी पवार इत्यादि तेरा जणांना आरोपी केलें आहे. त्यांना समन्सें आलीं आणि प्रकरण तालुक्याचे कोर्टांत सुरू झालें. तें अजूनहि चालू आहे. दर महिन्याला तारीख पडते आणि कांहीतरी निमित्तानें पुन: पुढील महिन्यावर जातें.

गांवांतील दुफळीची झळ आजपावेतों लग्नकार्याला लागलेली नव्हती. परंतु आतां ती लग्नकार्यांतहि शिरूं लागली आहे. मागील आठवड्यांत काशीनाथ हरी पवार यांच्या मुलीचें लग्न होतें. मुलगी पिंपळगांवीं दिली आहे. लग्न एकांवें गांवीं झालें. काशीनाथ हरी पवारांचें घर पवार आळीला माळावरील वाड्यांत आहे. श्रीपतराव पाटलांचें घरहि त्याच वाड्यांत आहे. परंतु काशीनाथ हरी पवारांनीं मुलीच्या लग्नाचें आमंत्रण श्रीपतराव पाटलांना दिलें नाहीं. कारण श्रीपतराव पाटलांचा मुलगा राजाराम पाटील रेडा प्रकरणांत फिर्याद करणाऱ्या मंडळींत सामील आहे. त्याच वाड्यांतील गेनू धर्मू पवार, चौणू नारू पवार इत्यादींनाहि आमंत्रणें दिलीं नाहींत. इतके दिवस गांवांत कांहींहि प्रकरणें झालीं तरी लग्नकार्यानिमित्त पवार आळींत एकोपा होता. आतां हें प्रकरण लग्न-कार्यांतहि शिरल्यासारखें झालें आहे.

लग्नसराई संपत आली तरी अजून त्या निमित्तानें आलेले मुंबईचे पाहुणे हललेले नाहीत. त्यांच्या जेवणाखाण्यांत घरच्या बायका गुंतलेल्या आहेत.

शाळा सुरू होऊन वर्ग बदलले आहेत. जुन्या पुस्तकांची खरेदी-विक्री चालू आहे. यंदापासून पांचवी ते सातवी फी घेणें बंद झाले आहे. अभ्यासास अजून म्हणावी तशी सुरुवात झालेली नाहीं. कोणाची बदली कोठें झाली, हा शिक्षकांमधील चर्चेचा विषय असतो. उन्हाळ्यांत चालू झालेला गोट्यांचा खेळ आतां कमी पडूं लागला आहे. त्या ऐवजीं लहान मुलें आंब्याच्या कोयांनीं लगोचा खेळू लागलीं आहेत. शाळेसमोरील मोकळ्या जागेत त्यांचा डाव पडलेला असतो. संध्याकाळीं मोठीं मुलें चावडीसमोर किंवा पाराजवळ आट्यापाट्या खेळतात.

# १४. पूर्वरंग

पु. ल. देशपांडे

टोकियोच्या झगझगत्या विमानतळाबाहेर पडून आम्ही रस्त्याला लागलो आणि रस्त्यातल्या खड्ड्यांनी असे काही गचके द्यायला सुरवात केली की आपण टोकियो नावाच्या जगप्रसिद्ध शहरात जात नसून पेठ नाक्यावरून बैलगाडीतून इस्लामपूरला जायला निघालो आहोत असे वाटायला लागले. रस्त्यातले दिवे मिणमिणत होते. त्या प्रकाशात बाजूची बुटकी घरं अत्यंत भिकार वाटत होती. असंख्य ठिकाणी रस्ते खोदून ठेवले होते. त्यामुळे डायव्हर्शन्स होती. रस्ते उकरायचा मुंबई मुन्सिपाल्टीचा रोग टोकिओच्या नगरपालिकेलाही लागलेला दिसला. टोकियोच्या प्रथम दर्शनाने जडलेल्या प्रेमाला हे द्वितीय दर्शन धक्के देत होते. प्रथम दर्शनी प्रेमावर द्वितीय दर्शन हाच उपाय आहे म्हणणाऱ्या माझ्या एका अविवाहित मित्राचे मला स्मरण झाले. तेवढ्यात पावसाची भुरभुर सुरू झाली. थंडीचा कडाका होताच. आम्ही मारे जपानचा 'चेरी ब्लॉसम'चा मोसम आहे असे वाचून जपानी वसंतशोभा पहायला आलो होतो. परुळेकर धीर देत होते; पण विश्वास बसत नव्हता.

सुरवातीचा अर्धापाऊण तास असा विवंचनेतच गेला. पूर्वीच्या जपानी मालाच्या दर्शनी भपक्याचा गुण ह्या जपानी शहरालादेखील आहे की काय अशी धास्ती वाटू लागली. परुळेकरांची मोटार हमरस्त्याला लागली. पॅरीसमधल्या आयफेल टॉवरपेक्षा वीतभर अधिक उंच असलेल्या टोकियो टॉवरजवळून वाट काढीत आम्ही हा हा म्हणता टोकियोतल्या जगप्रसिद्ध 'गिंझा'मध्ये प्रवेश केला. लंडनची पिकॅडिली, पॅरिसचे पिगाल, न्यू यॉर्कचा टाइम स्क्वेअर आणि टोकियोमधला हा गिंझा ! जिवाची मुंबई करायची ही स्थाने. गिंझा झगमगत होता, निऑन साइन्सनी धुमाकूळ घातला होता. सिनेमा, नाटके, निशागारे सुटत होती. रस्ते गजबजले होते. परुळेकरांनी आमच्या दाइ-इची हॉटेलच्या प्रवेशद्वारात गाडी उभी केली. सुमारे दीडएक हजार खोल्या असलेली ती दाइ-इची हॉटेलची भव्य इमारत पाहून 'जपानी लोक बैठ्या लाकडी घरात राहतात' हा शाळेत घोकलेला भूगोल फार जुना झाला हे उमगले. आमची खोली आठव्या मजल्यावर होती.

छोटीशीच खोली पण आत शिरल्याबरोबर "वा!" असा उद्गार निघाला. होती पाश्चात्त्य थाटाची. पण त्या रात्रीसुद्धा एका कोपऱ्यातल्या फुलदाणीत सुंदर फुले होती. भिंतीवर जपानी पद्धतीने काढलेले निसर्गदृश्य होते. कॉटजवळ सपाता होत्या. त्यांच्या तोंडावर पारदर्शक कागदाची पट्टी लावली होती. आणि त्या पट्टीवर ह्या सपाता जंतुनाशक द्रव्याने स्वच्छ केल्या आहेत असे छापले होते. वॉश बेसिन, पाणी पिण्याचे ग्लासेस, शौचाचे कुंड ह्या सर्वांच्यावर अशी पट्टी आडवी चिकटवलेली होती. त्यामुळे ती पट्टी फाडल्याशिवाय त्या वस्तू कुणा इतराला आधीच वापरून ठेवणे अशक्य होते.

मध्यरात्र केव्हाच उलटून गेली होती. दुसऱ्या दिवशी लवकर उठून निक्कोला जायचे होते. रविवार होता. त्यामुळे परुळेकर आपल्या गाडीतून आम्हांला निक्कोला नेणार होते. नेपल्स पहावे आणि मग मरावे म्हणतात तशी 'निक्को पाहिल्याशिवाय केक्को म्हणू नये' अशी एक जपानी म्हण आहे. 'केक्को' म्हणजे सुंदर. तेव्हा जपानमधल्या कुठल्याही गोष्टीला सुंदर म्हणण्यापूर्वी आधी निक्को पाहून टाका असा परुळेकरांनी सल्ला दिला होता. साधारणतः मुंबई-पुणे एवढ्या अंतराचा प्रवास आहे. परंतु जपानी रस्त्यातले खड्डे परुळेकरांना पाठ असल्यामुळे पहाटे निघून दिवसा उजेडी परतायचे असे ठरले होते. रात्री केव्हा झोप लागली कोण जाणे. पहाटे उशालगतचा टेलिफोन खणखणायला लागला आणि जाग आली. अत्यंत मधुर आवाजात कुणी अज्ञात जपानी ललना 'मोशमोशी' — 'मोशमोशी' करायला लागली. ही मोशमोशीची भानगड मला कळेना. शेवटी मीही मोशमोशी केले. जपानीत 'हॅलो हॅलो'ला मोशमोशी म्हणतात. अर्थात जपानी पोरीचा मोशमोशीचा स्वर इतका गोड आणि आर्जवी असतो की त्या चालीवर मराठी नरड्याला जाताच येणे शक्य नाही. पॅरिसमधल्या पोरींचा 'मेर्सी मेर्सी बुकू' म्हणण्याचा



ढंग गळ्यात उतरविणे जितके मुष्किल तितकेच हे मोशमोशी! त्या मोशमोशीच्या आवाजाची धनीण सांगत होती की 'मीस्तल पालुरीकर 'वाँ तु तॉ —' मला बराच वेळ हे पालुरीकर प्रकरण कळेना. 'वाँ तु तॉ' म्हणजे 'वाँट्स टु टॉक' हे समजले. तेवढ्यात परुळेकरांचाच आवाज आला. "उठलात काय?" मी हुश्श केले! त्यांनी मोशमोशीविषयीचे माझे शिक्षण केले. "नाश्ता करून तयार रहा — मी आलोच" असा त्यांनी निरोप दिला.

दाइ-इची हॉटेल संपूर्ण पाश्चात्य पद्धतीचे हॉटेल आहे. आम्ही पोशाख करून नाश्त्याच्या शोधात निघालो. हॉटेलमधल्या सेविका टुणटुणटुणटुण करीत मधमाशांसारख्या कामाला लागल्या होत्या. लिफ्ट चालवणाऱ्या मुलीने कमरेत वाकून आम्हांला 'गुड् मॉर्निंग' केले. ह्या जपानी मुजऱ्याच्या व्यायामाने माझा कटिभाग हत्तीच्या वळणावरून महिन्याभरात सिंहाच्या वळणावर जाईल असा सुखद विचार मला सहज चाटून गेला. फुलाफुलांचे किमोनो घातलेल्या जपानी स्त्रिया आणि चिमुकले-छकुले जपानी पुरुष ओळख नसूनही अभिवादन करीत होते. आम्ही न्याहारीची सोय कुठे आहे हा प्रश्न इंग्रजीतून विचारून पाहिला. जपानी पुरुष एकजात पाश्चात्त्य वेषात नटले होते. परंतु इंग्रजीचा स्पर्श नव्हता. त्यामुळे आमच्या प्रश्नाला उत्तरादाखल नुसतेच एक हास्य मिळे.

जपानी बायका हसून वर गोड लाजत. हे सारे ठीक होते, पण त्या महाप्रचंड हॉटेलात चहाचा कप कुठे मिळतो ते कळेना. शेवटी पूछताछ विभागात गेलो. तेथेही सगळे मोहक स्त्रीराज्य. शेवटी इंग्रजी जाणणारी एक सुकांत चंद्रानना पातली. तिने दुसऱ्या एका पोरीशी जपानी किलबिल केली आणि तिच्या मागून आम्ही चहापानगृहात गेलो. जपानीत चहाला 'चा' म्हणतात. दुधाचा आणि बिनदुधाचा ह्याला अनुक्रमे 'ओचा' आणि 'कोचा' म्हणतात. महिनाभर जपानांत राहूनही 'ओचा' म्हणजे दुधाचा की 'कोचा' म्हणजे दुधाचा हे योग्य वेळी मला कधीही आठवले नाही. त्यामुळे जपानी चहाने दर वेळी माझा कोचाच केला! नुसतेच 'टी' म्हणावे तर तो जपानी हिरव्या पातीचा चहात्मक काढा येत असे. हा काढा जपानी लोक पाण्यासारखा पितात. चहा मात्र भलताच महाग. चहादाणी, दूधसाखर अलग वगैरे लाड नाहीत. कपभर चहा म्हणजे फक्त कपभर. आणि त्याला चांगले रुपयाच्या हिशेबात जपानी येन टिकवावे लागत. एक मात्र सुख

होते. जपानात टिप हे प्रकरण नाही. हॉटेलातून बोर्ड असतात. ' आमच्या सेवकांना भरपूर पगार मिळतो. त्यांना कृपा करून टिप देऊ नये. ' आणि सेवकही टिप घेणे हा कमीपणा मानतात. टॅक्सीवालेसुद्धा टिप घेत नाहीत. आणि स्वखुषीने सामान उचलून घरापर्यंत आणतात. जगातल्या इतर सर्व देशांत टिपचा ताप आहे. नवख्या प्रवासी लोकांना तर किती टिप द्यावी हे कळत नाही. कमी द्यावी तर अपमान आणि अधिक द्यावी तर फसवणूक! पॅरिसमध्ये तर सार्वजनिक लघुशंकागृहात तिथल्या त्या लुच्च्या परिचारिका आपणच आधी बशीत शंभर शंभर फ्रँक टाकून ठेवतात. म्हणजे नवख्याला वाटावे की किमान शंभर फ्रँक हा इथला शिरस्ता आहे. एक लघुशंका रुपयारुपयाला पडायची! माणसे माणसांना कुठल्या अडचणीत पकडून बनवाबनवी करतील सांगता येत नाही. ह्या बक्षिसाचा घृणास्पद अनुभव आपल्या रुग्णालयातून येतो. आजारी असताना ज्यांचे तोंडही दिसले नाही अशी सेवकमंडळी बरे होऊन परतायच्या दिवशी दुतर्फा गार्ड ऑफ ऑनर देत बक्षिशीसाठी उभी असतात. उद्धट नर्सेस आणि त्यांहूनही बेपर्वा वॉर्ड बॉईज यांना बक्षिशी देण्याऐवजी दंड करावा असे वाटत असते. पण त्यांच्या हातावर छड्या मारण्याऐवजी पैसे टिकवावे लागतात. सांगूनसवरून अधिक पैसे घेतल्याचे दुःख नसते, पण बनवाबनवी करून एक नवा पैसा उपटला तरी ते डाचते. इथे अहंकार दुखावतो. आपण फसतो आहो ही जाणीव टोचते. जपानात मात्र ' अतिथिदेवो भव ' हा अनुभव जागोजागी आला. देशाची आंतरराष्ट्रीय इभ्रत ही शिष्टमंडळाच्या भाषणांच्या फुग्यातून वाढत नाही — सामान्यांच्या वागण्यातून वाढते. वास्तविक दाइ-इची हॉटेलातला नाश्ता भलता महाग होता. पण त्या किंमतीची आगाऊ कल्पना येत होती.




त्यावर अलिखित बक्षिसाची उकळाउकळी नव्हती. त्यातून

परिचारिका इतक्या प्रसन्न आणि तरतरीत होत्या की एखादाला वाटावे त्यांना वर्षाचा बोनस आजच पहाटे मिळाला आहे. नाश्ता वाढणारे हॉटेलच्या मालकाचा वाढदिवस असल्यासारखे वाढत होते आणि खाणारे आयुष्यात इतका चांगला नाश्ता आजच खातो आहोत अशा आनंदात खात होते. आमच्याकडे म्हणजे गल्लेवाला आपल्या सिंहासनावरून ओरडून सांगणार, ' पोऱ्या, त्या कोपऱ्यातल्या चष्मेवाल्याला काय पाहिजे बघ — साल्यो, नोकऱ्या करता की हजामती ? ' मग पोऱ्या गावातली सगळी हॉटेले सोडून आमच्या राशीला कुठे आलात असा भाव चेहऱ्यावर आणीत " काय हवाय " म्हणून नाक फेंदारून विचारतो. इथे ही जपानी माणसे कशी आनंदात वावरत होती. फुलदाणीत बागेतली ताजी फुले ठेवावी तसे त्या किमोनोतल्या जपानी स्त्रियांचे प्रफुल्ल चेहरे. त्यांनी पहाटे उठून हे इतके सौंदर्यप्रसाधन केव्हा उरकले होते कोण जाणे ! लग्नाला निघाल्यासारखे सुरेख पोषाख घालून सगळे स्त्रीपुरुष जमले होते. कुठे त्रासलेला, चिडलेला एकही चेहरा नव्हता. त्या दिवशी सकाळीच काय पण त्यानंतर जपान सोडीपर्यंत मला कुठेच असला चेहरा दिसला नाही. मोठ्या हसऱ्या लोकांचा देश आहे हा ! इथली लहान मुले दुडदुडताना आपटली तर त्यांना हसायला शिकवतात म्हणे !

# १५. कोंडिबा गायकवाड

## व्यंकटेश माडगूळकर

माझं आजोळ हे एक अती डामरट गाव आहे. आख्ख्या माणदेशात प्रसिद्ध आहे. गाव गायकवाडांचं आहे. इतरांपेक्षा त्यांचा भरणा अधिक आहे आणि ही गायकवाड मंडळी मोठी बलदंड, उफराट्या काळजाची आहेत. रांगडी आणि असंस्कृत आहेत. 'जीव घेईन', 'कुऱ्हाडीनं तोडीन' या धमक्या तिथल्या पोराबाळांच्या तोंडी आहेत. दरसाल तिथं एखाद-दुसरा खून होतो आणि काठ्याकुऱ्हाडींच्या हाणामाऱ्या रोज.

आमचा वाटेकरी कोंडिबा गायकवाड त्यांतलाच. मिशीवर पालथी मूठ फिरवीत तो कुणा वाटेल त्याला दम भरतो –

" अरं, गायकवाडाचं बीज हाय. डोळं काढून हातांत ठेवीन !"

कुणाचा तुच्छतापूर्वक उल्लेख करायचा असला म्हणजे म्हणतो –

" त्या गरिबाचा काय दम हाय् ! फराळ्यावरी जाईल !" कुणी म्हणालं, " अरे कोंडिबा, त्यो अंमलदार तुझ्यावर बिथरलाय् !" म्हणजे उत्तर देतो, " अरं जा ! असलं अंमलदार कोंडिबाच्या घराच्या पायरीला धोंडं असत्यात, पाय देऊन वर जात असतो !" बस ! कोंडिबापुढं सगळी दुनिया क्षुद्र आहे, गरीब आहे. त्याला वाकविणारा वीर अजम् दुनियेत नाही.

सहा महिन्यांपूर्वी मी खंड आणण्यासाठी कोंडिबाकडे गेलो.

तो आपल्या घराच्या जोत्यावर बसून तुटलेला आसूड नीट करीत होता उघडाच. आपली काळी कातडी उन्हात तापवीत बसला होता. एखाद्या भाजलेल्या रेड्यासारखा. सांध्यांत गाठाळलेल्या जाड बोटांनी आसूड नीट करताना त्याच्या दंडांवरच्या बेडक्या मागंपुढं हालत होत्या. गळ्यात पेटी, रुंद छाताडावर केसांचं जाळं, पिढऱ्यांचे गोळेही तसेच, वरवंट्यासारखे कठीण. कोंडिबा अंगापिडानं भलताच थोराड, उग्र.

माझ्याकडे बघितल्यावर आपला वाघासारखा जबडा उघडून गुरगुरला,

" या. मला बघाय् आला काय ?"

त्याचं बोलणं नेहमी असंच राठ. मऊपणा कोंडिबापाशी औषधाला नव्हता.

मी आलो होतो खंड मागण्यापायी. पण तसं एकदम सांगण्याची सोय नव्हती, म्हणून म्हणालो, " होय. आलो सहज. म्हटलं बघावं –"

कोंडिबाचा डावा हात सुजला होता. त्याला फडकं गुंडाळलं होतं, पंजालासुद्धा सूज होती. म्हणून मी विचारलं, " हाताला काय झालं कोंडिबा ?"

" काय न्हाई, वाईस मार लागलाय !"

" कशाचा ?"

" काठ्यांचा. तुमच्या रानापायी चाललीया की झंगाझंगी. डोस्की फुटत्याती रोज. माजी गुरं त्याच्या रानात शिरली म्हणून संतू आन् त्याची दोन पोरं अंगावर आली. वाचावाची झाली. त्यांनी काठ्या हानल्या. टकुऱ्याला लागत्याल म्हणून हात वर केला. समद्या काठ्या हातावर पडल्या ह्या !"

कोंडिबाला गावाशेजारी असं चांगलंसं रान नव्हतं, म्हणून आज कित्येक वर्षं तो आमचा मळा खंडानं करीत होता. त्याच्यावर त्याचा चांगला गुजराणा होत होता. संतू नावाचा त्याला एक मोठा भाऊ होता. त्याची आणि कोंडिबाची तेढ होती. दोघे एकमेकांचे वैरी होते. संतूनं आम्हांला कैक वेळा सांगितलं की, " कोंडया देतोय् त्यापरीस पंचवीस-पन्नास मी आगाव् देतो. त्याच्याकडून काढून मळा मला लावा." याउलट, कोंडिबा नेहमी म्हणायचा, " दुसरं कोण ही जमीन करतंय बघू दे. बांधाच्या आत त्यानं पाऊल टाकलं की, त्याचा मुडदा पाडलाच म्हणून समजावं. मग फासावर का जायाचं होईना !" इरेला पडून संतूनं आमच्या बांधाला असलेली दुसऱ्याची जमीन खंडानं केली आणि मग रोज लट्ठालट्ठी होऊ लागली. डोस्की फुटू लागली.

मी म्हणालो, " अजून तुमची तेढ संपली नाही म्हणायची ?"

त्यावर कोंडिबानं अगदी सहज उत्तर दिलं, " दोघांपैकी कुनाचा तरी मुडदा त्या रानात पडल्याबिगार कुटली संपतिया !"

आणि आत बघून त्यानं हळी दिली, " दूध बघ कुटं तरी; आन् वाईसा च्या कर ग. वाटेकरी आल्यात !"

मागच्या खेपेस मी आलो होतो, तेव्हा कोंडिबाकडे एक चांगली म्हैस होती. ती आता कुठं गोठ्यात दिसत नव्हती. क्वचित मळ्यात असेल म्हणून मी विचारलं, "दूध बघण्याची का पाळी कोंडिबा ? म्हैस आटली का काय एवढ्यात ? लवकर आटली म्हणायची !"

वादीला मुरगळे मारता मारता कोंडिबा थांबला. छातीवरचे केस चोळीत हेल काढून बोलला, " म्हैस मेली देवा. आता दुभतं न्हाई घरात !"

" आँ ? मेली कशानं ! चांगली हत्तीसारखी म्हैस, काय झालं एकाएकी ! रोगानं मेली काय ?"

" न्हाई " उगीच हसल्यासारखं करून कोंडिबा म्हणाला, " माझ्या हातनंच मेली. अरवाळी होती वाईशी. एकदा धारच देईना. मस्त खटपट करून थांबलो. कासंला हात घातला की लाथ झाडायची. मला आला काव. त्या सपाट्यात ठोकली लोढण्यानं. बेसुमार ठोकली. आन् कुठं अवलगामी ठोका बसला का काय, कुनाला ठावं. बराडली जोरकस. आवं, गरागरा अंगाभोवती फिरून धाडकन पडली. खाली पडली ती परानच गेला."

कोंडिबानं अगदी सहजगत्या ही हकीकत सांगितली. तो हळहळला नाही की त्याच्या निबरट तोंडावर दिलगिरी दिसली नाही. स्वरात तर नाहीच नाही ! त्याच्या हिशेबी एका जनावराचा प्राण घेणं ही अगदी मामुली गोष्ट असावी !

चार इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर मी मुद्द्याची गोष्ट काढली, " यंदाचा खंड मागण्यासाठी आलो होतो मी, कोंडिबा !"

कुत्रं भुंकण्यासारखा तो मुक्कन हसला. त्याच्या त्या हसण्यात ' कशाचा खंड घेऊन बसलाय राव !' ही भावना अगदी स्पष्ट होती. त्या बोलण्याला बगल देऊन त्यानं विचारलं, " काय धूर काढायचं सामान ?"

त्याला विडी हवी असावी. मी नकार दिला, तेव्हा उठला आणि आत गेला. विडी पेटवून बाहेर आला. एक सणसणीत झुरका मारून, नाकातून धूर सोडत ' हं ' म्हणून त्यानं विडी माझ्यासमोर धरली. मी पुन्हा मान हलवली तेव्हा पुन्हा एक दम मारला. तो चिलमीसारखी धरून विडी ओढत होता

आणि बिडी ओढणं ही एक चैन आहे असा आविर्भाव त्याच्या चेहऱ्यावर होता.

खंडाच्या कामात कोंडिबा सहजासहजी बधणार नाही हे मला ठाऊक होतं. कारण मागेल तेव्हा बिनबोभाट त्यानं तो आजपर्यंत कधीच दिला नव्हता. आपल्या सवडीनुसार तो आस्ते आस्ते रक्कम देई. अगदी सावकाश, सवड होईल तेव्हा.

त्याची बिडी ओढून झाल्यावर नेट धरून मी पुन्हा विचारलं, "मग ? आज पैसे हवेत मला !"

"का, अशी पठाणी कायदा हाय् का ?"

कोंडिबाशी बोलताना जपून, नरमाईनंच बोलायचं. कारण, तो केव्हा बिथरेल याचा नेम नव्हता.

"तसं नव्हे. उगाच तीन-तीनदा, चार-चार कोसांचे हेलपाटे नकोत व्हायला. आणि आम्हांलाही नड आहे थोडी. दिलेस तर बरं."

"का म्हनलं पठाणी कायदा हाय्. असला तर तो कोंडिबापाशी न्हाई चालायचा."

"अरे पण—"

"डोक्यात धोंडा घातला तरी पैका न्हाई मिळायचा. न्हाईच माझ्यापाशी. देऊ कुठनं ? असल्यावर न्हाई म्हणतोय् का ?"

"तसं नको करूस. हेलपाटा नको होऊ देऊस माझा."

"अन्नाच्यान्, लबाड बोलत न्हाई. ईख खाईन म्हनलं तर पैसा न्हाई. बैरनीला बाईना भाव येऊ द्या. इकीन आन् देईन. मी का पैका बुडवतोय् तुमचा ?" कोंडिबाचा स्वर चढला.

"पण मला पाहिजे होते आत्ता. फार नड आहे."

"अरं बा ! तुमी जवा येता तवा असं अडीच कांड्यावरच कसं येता ? सावकार हाय् का मी ? मी का पैका बुडवतोय् ? आन् बुडवायचा असता तर आज आठ वर्स झाली, मळा करतोय् त्याचा खंड कशाला दिला असता, आं ?"

जास्ती बोलण्यात अर्थ नव्हता. कोंडिबाच्या बायकोनं दिलेल्या पितळीभर शेंगा खाऊन मी हात हालवीत माघारी गावी आलो.

त्याच्या दुसऱ्याच दिवशी कोंडिबा तालुक्याच्या कचेरीत आला आणि पाचशे रुपये लाच म्हणून त्यानं फौजदाराला दिले ! कारण अगदी मामुली होतं. त्याच्या आडदांडपणामुळंच त्याला हा भूर्दंड भरावा लागला होता. गावच्या एका महारानं कुठं ओटाभर कणसं कोंडिबाच्या रानातून खुडून नेली, त्याला न विचारता. त्याची चुगली कुणी तरी कोंडिबापाशी केली. या हिरवटानं त्या महाराला बोलावून घरी आणलं, आणि हातात आसूड घेऊन विचारलं,

"सरावल्या, खरं बोल. लुगं चोरलंस का न्हाई ?"

"मरीआईच्यान् न्हाई, तुमच्या रानात पाऊलच न्हाई टाकलं मी !"

"खरं ?"

"तर खोटं सांगतुया व्हय् जी ! मी न्हाई चोरलं लुगं !"

"तसा सांगायचा न्हाईस. आत्ता तुला बोलायला लावतो बघ !"

कोंडिबा उठला. आसूड काढून पुढं झाला आणि धावण्याची पाठ उघडी

करून त्यानं त्याला झोडपले. हुरडा झोडपल्यासारखा झोडपला. त्याच्या काळ्या पाठीच्या चिंध्या केल्या ! महार गुरासारखा ओरडला. तडफडला. बेशुद्ध झाला. आणि मग कोंडिबानं हात आखडता घेतला.

संध्याकाळी ते महार जे तिरमिरीनं उठलं ते थेट गेलं तालुक्याला. फौजदारापुढं पाठ उघडी करून म्हणालं, " सरकार, हेचा न्याव करा. गरिबाची कड घ्या. " फौजदारांनी तावडतोब शिपाई पाठवले आणि कोंडिबाला धरून आणले. कासला पटका आणि मलमली अंगरखा घालून तो झोकात आला. कचेरीत फौजदार टेबलाशी बसले होते. पहाऱ्यावरचा शिपाई बंदूक धरून ताठ उभा राहिला होता. महार कोपऱ्यात उकिडवा बसून राहिला होता.

आत पाऊल टाकताच कोंडिबा त्याच्याकडे पाहून बोलला, " लेका, सरावऱ्या, चार रट्टे हानले तर हतंपतूर आलास. आन् जीव घेतला असता तर कुठं गेला असतास वरं ? "

फौजदार, पहाऱ्यावरचा शिपाई आणि थापण्या, कोंडिबाच्या या बोलण्यानं अगदी थंड झाले ! फौजदाराकडं वळून कोंडिबा पुढं बोलला, " खरं का न्हाई व सायेब ? असल्या फालतू कामासाठी कुनी हतंपातूर येईल का ? आं ? आता तुमी झालं तरी मला फासावर चढवताय् का ? बसवाल वरीस दीड वरीस तुरुंगात आन् द्याल सोडून. "

कोंडिबा असं बोलला आणि फौजदाराला एका बाजूला घेऊन त्यानं त्याची मूठ दावली. महाराला न्याय मिळाला नाही. आपसात तडजोड झाली. खटला मिटला. कोंडिबा सुटला. काहीही न होता मोकळा झाला. ही बातमी आमच्यापर्यंत पोचली. आणि एकदा त्याच्यावर 'कडी ' करायची म्हणून मी म्हणालो, " कोंडिबा, डोक्यात धोंडा घातल्यानंतर घरात पैका नव्हता आणि लगेच दुसऱ्या दिवशी फौजदाराची मूठ दावायला आला कोठून ?" मला वाटतं, या गौप्यस्फोटामुळं कोंडिबा ओशाळेल. पण तो मुर्दाडपणानं बोलला, " तसं काना-कोपरा झाडून निघायचं की काय तरी गोपाचशे. येळ आल्यावर का करायचं ?"

संतूची आणि कोंडिबाची तेढ भलतीच वाढली. रोज हाणामाऱ्या होऊ लागल्या. टाळकी फुटू लागली. वर्षभर हा घोळ चालला होता. अखेर कोंडिबा कावला. त्याचं मस्तक फिरलं. संतूला आडवा करण्यासाठी तो टपून राहिला. संतू तयारीत होता. त्याची जवान पोरं त्याच्या मागं नेहमी असायची. तोही फरशी कुऱ्हाड घेतल्याशिवाय एकटा-दुकटा बाहेर पडत नसे. समोरासमोर लढत झाली तर तो उणा पडला नसता. कोंडिबाबरोबर त्यानं दोन हात केले असते, बरोबरी झाली असती. म्हणून कोंडिबा वाट बघत होता. बेसावध असताना संतूला दगा करण्याचा त्याचा डाव होता.

अखेर वेळ आली. उनाची गुरं राखायला गेलेला संतू गाफीलपणे फरशी उशाला घेऊन लिंबाच्या सावलीत झोपला. गार वाऱ्यानं त्याचा डोळा लागला. कुठून तरी ते कोंडिबानं पाहिलं. सावट होऊ न देता तो हळूहळू गेला आणि लिंबाच्या खोडाआड लपून पाहू लागला.

तोंडावर पटक्याचा पदर घेऊन संतू निवांत झोपला होता. त्याची गुरंढोरं सावकाश हिंडत होती. आजूबाजूला माणूस नव्हतं. ऊन झळ्या मारीत होतं.

जीव घ्यायला कोंडिबापाशी काही हत्यार नव्हतं. त्यानं आजूबाजूला

पाहिलं. संतूच्या उशाला कुऱ्हाड होती; पण ती काढून घेताना तो जागा झाला असता. हत्यारापायी असली संधी फुकट जात होती.

पाय न वाजवता जाऊन रानात पडलेला एक भला मोठा धोंडा घेऊन कोंडिबा आला. संतूच्या उशाशी येऊन उभा राहिला. आणि ओठावर दात रोवून त्यानं भला मोठा श्वास घेतला आणि डोक्याच्यावर नेऊन तो धोंडा संतूच्या डोक्यात घातला ! संतू जागच्या जागी ठार झाला.

—मग कोंडिबा घरी गेला नाही, काही नाही. तडक तालुक्याच्या कचेरी-वर गेला आणि अम्मलदाराला म्हणाला, "मी संत्याच्या डोक्यात धोंडा घालून परान घेतला. काय मला फासावर चढवायचं असेल ते चढवा."

त्याला पुढं चौकशीसाठी जिल्ह्याला न्यायचं होतं.

त्या दिवशी मी मुद्दाम मोटारपाशी गेलो. त्याची बायकापोरंही आली होती.

चार हत्यारबंदी शिपायांनी त्याला मोटारपाशी आणले. हातात हात-कड्या होत्या. दंडाला काढण्या होत्या. अंगावरचे कपडे मळले होते. आणि दाढीही वाढली होती. वाघाला दरवेशी नेतो, तसे शिपाई त्याला चालवीत होते.

मी दिसल्यावर कोंडिबा हसला. हातकड्या घातलेले हात वर करून म्हणाला, "राम राम ! जाऊन येतो—"

त्याला त्या स्थितीत पाहून बायकापोरं रडू लागली. त्यांना वाटलं, हा आता कशाचा माघारी येतोय्. तो चालला. परत न यायच्या वाटेनं चालला.

"कारभारी—" असा हंबरडा फोडून त्याच्या बायकोनं डोळ्यांना पदर लावला. पोरंही ओरडू लागली. एकच कालवा झाला.

कोंडिबानं आपली खोंडागत गर्दन फिरवली आणि बायकोला डाफरलं, "गप, रडायला का झालं ? अवंदा पीक चांगलं हाय्. मळ्यात जुंदळ्याचं डांबार लागलेय्. खंडी दीड खंडी दाणं येत्याल—"

आता या कोंडिबाच्या काळजाला काय म्हणावं ?

# १६. जातिवाद आणि वर्गवाद

**नलिनी पंडित**

**महाराष्ट्रीय समाजजीवन**

महाराष्ट्रीय वर्गव्यवस्थेचा विचार करताना निरनिराळ्या गटांची जातीय पार्श्वभूमी ध्यानात घेतली तर काही गोष्टी ठळकपणे नजरेत भरतात. येथील वरिष्ठवर्ग म्हणजे व्यापारी–कारखानदारांचा वर्ग हा बव्हंशी परप्रांतातून येथें येऊन स्थायिक झालेल्या लोकांचा आहे ; व महाराष्ट्रातील इतर जातींच्या मानाने यांचे उत्पन्न व राहणीचे मान उच्च दर्जाचे आहे. मुंबई शहरातील व्यापार व उद्योगधंदे भारताच्या राजकारणात आघाडीवर असणाऱ्या पारशी, मारवाडी, व गुजराती उद्योगपतींच्या मालकीचे आहेत हे जगजाहीर आहे. पण महाराष्ट्रातील इतर व्यापारी शहरातही त्यांचे वर्चस्व कमी नाही. मुंबई, पुणे, कोल्हापूर या तीन शहरांची आतापर्यंत औद्योगिक पाहणी करण्यात आली आहे. तिच्यामधून वरील विधानाला भरपूर पुरावा मिळतो. मुंबई शहरातील पाहणीत फक्त ३ टक्के लोकसंख्या नमुन्यादाखल घेण्यात आली होती. व्यवसायानुसार तिची वर्गवारी लावण्यात आली. तेव्हा १९,०२५ पैकी फक्त ३५ लोक मोठ्या उद्योगधंद्यांचे मालक असल्याचे आढळून आले. या ३५ पैकी फक्त तीन मराठी भाषी होते. व्यवस्थापक वर्गात सामील होणाऱ्या २१७ लोकांमध्ये फक्त ४१ महाराष्ट्रीय होते. आयातनिर्यातीचा किंवा घाऊक व्यापार करणाऱ्या ३६५ व्यापाऱ्यांपैकी फक्त १९ ची मातृभाषा मराठी होती. मध्यम दर्जाच्या एकूण ७०७ व्यापाऱ्यांपैकी फक्त ५५ मराठी भाषी होते. मुंबई शहराच्या लोकसंख्येपैकी जवळजवळ चव्वेचाळीस टक्के लोकसंख्या मराठी भाषिकांची आहे हे ध्यानात घेतले तर महाराष्ट्रीयांचे या बाबतीतील मागासलेपण सहज कळून येईल. खुद्द पुणे शहरात मोठी दुकाने व कारखाने यांवर मालकी असणाऱ्या दर ८२ कुटुंबांपैकी ३२ म्हणजे ⅓ हून अधिक कुटुंबे महाराष्ट्रीयेतरांची होती. मध्यम दर्जाच्या दुकानदारांतही परप्रांतीयांचा भरणा बराच आहे. व्यापारउदीमामुळे या लोकांचे उत्पन्न साहजिकच मराठी लोकांहून अधिक आहे. मुंबई शहरातील पाहणीत ज्या मराठी कुटुंबांचा समावेश करण्यात आला होता त्यापैकी ५० टक्के कुटुंबांचे उत्पन्न महिना १५० रुपयांहून कमी होते. तर गुजराती व सिंधी लोकांत ज्यांचे मासिक उत्पन्न १५० हून कमी आहे अशी कुटुंबे अनुक्रमे २६ व १८ टक्के होती. महिना ५०० रुपयांहून अधिक उत्पन्न असलेली मराठी कुटुंबे फक्त ४.९ टक्के आहेत. गुजराती व सिंधी कुटुंबांत हे प्रमाण अनुक्रमे १७.३ व २५.२ टक्के आहे. पुणे शहराच्या अहवालात निरनिराळ्या जातींतील कुटुंबांचे सरासरी वार्षिक उत्पन्न देण्यात आलेले आहे. त्यांत शीख, पंजाबी, गुजराती, मारवाडी इत्यादी जमातींतील कुटुंबांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १६०० रुपयांहून अधिक असल्याचे आढळून आले. महाराष्ट्रीय समाजात काही पुढारलेल्या जातीच इतके सरासरी उत्पन्न मिळवू शकतात. ब्राह्मणेतर व दलित जमातींतील बहुसंख्य

कुटुंबे १२०० रुपयांहून कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या वर्गात आढळतात. मुंबई-पुण्यासारख्या शहरांत उद्योगधंद्यांमध्ये अग्रस्थानी असलेला गुजराती व मारवाडी कारखानदारांचा हा वर्ग म्हणजे भारतीय राजकारणातील सर्वात प्रभावी शक्ती आहे. महाराष्ट्रीय समाजजीवनाचा विचार करताना या वर्गाचे हितसंबंध व धोरण नजरेआड करून चालणार नाही.

कोणत्याही समाजातील श्रीमंत व सुखवस्तू लोकांबद्दल तेथील सर्वसामान्य कष्टाळू जनतेला थोडीफार असूया वाटणे स्वाभाविक आहे. मात्र वरिष्ठ वर्गाच्या कर्तृत्वाबद्दलचा अभिमान आणि त्याच्या नेतृत्वाबद्दलचा विश्वास ही या असूयेत कित्येकदा मिसळलेली असतात. सामाजिक व सांस्कृतिक जीवनात निरनिराळ्या वर्गातील व्यक्तींना एकमेकांशी हरघडी सहकार्य करावे लागते. अशा वेळी वरिष्ठ वर्गातील व्यक्तींचे धोरण उदारतेचे व सहिष्णुतेचे असेल तर त्यामुळे आर्थिक कलहातून आलेली कटुता पुष्कळच कमी होते. हा वरिष्ठ-वर्ग जर का परप्रांतीय असेल तर मात्र तेथील प्रादेशिक जीवनापासून तो पूर्णपणे अलिप्त राहू शकतो. शिक्षण, कला, साहित्य, धार्मिक उत्सव व सभा-संमेलने या दृष्टीने त्याचा प्रादेशिक समाजाशी संबंध येत नाही. लोकांच्या भावना त्याला समजत नाहीत. या अलिप्तपणामुळे स्वतःवरील सामाजिक जबाबदारीची त्याला जाणीव होणे कठीण असते. साहजिकच त्याच्याबद्दल बहुसंख्य लोकांच्या मनात दुजाभाव निर्माण होतो. अशा वेळी हा वरिष्ठ-वर्ग ज्या प्रांतातून आला असेल त्या प्रांतातील लोकांच्या प्रादेशिक जाणिवेचा फायदा घेऊन त्यांची सहानुभूती संपादन करण्याचा तो प्रयत्न करतो. त्या-मधून दोन वर्गांमधील कलहाला प्रांतवादाचे स्वरूप प्राप्त होते. आर्थिक कलहात हस्तक्षेप करण्यासाठी मध्यवर्ती सरकारवर दडपण आणणे हाच या लोकसंपर्काचा हेतू असतो. मात्र संघराज्यात प्रादेशिक स्वायत्ततेचे तत्त्व मान्य झालेले असल्यामुळे प्रत्येक बाबतीत संघसरकारवर अवलंबून राहून भागत नाही. म्हणून प्रादेशिक राजकीय जीवनावर वर्चस्व मिळविण्यासाठी त्या त्या समाजातील सामर्थ्यशाली घटकांशी सलोखा राखावा लागतो. अशा वेळी प्रादेशिक समाजात फूट पाडण्यास जातीयतेचा उपयोग करून घेतला जातो.

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर व पूर्वेकडील अकोला, नागपूर इत्यादी शहरांत अलीकडील काळात महाराष्ट्रीयांच्या मालकीच्या अनेक छोट्या गिरण्या व कारखाने निघाले आहेत. सुखवस्तू शेतकरी सहकारी साखर कारखाने काढीत आहेत. संस्थानिकांच्या छत्राखाली तीस-चाळीस वर्षांपूर्वी ज्यांनी उद्योगधंद्याच्या क्षेत्रात पदार्पण केले ते महाराष्ट्रीय कारखान-दार अखिल भारतीय क्षेत्रात नाव कमावून राहिले आहेत. औद्योगिक क्षेत्रां-तील साहस, योजकता, कल्पकता हीच तर आधुनिक काळात औद्योगिक प्रगतीची प्रेरक शक्ती आहे. भांडवलदारी युगात खाजगी नफ्याच्या गाड्याला ती जुंपली जाते. पण मूठभर लोकांच्या क्षुद्र स्वार्थाऐवजी सामुदायिक कल्याणासाठी या गुणांचा उपयोग व्हावयाचा असेल, तर खाजगी हित-संबंधाचे बुरुज भक्कम होऊ नयेत म्हणून वेळीच खबरदारी घ्यावयास पाहिजे.

महाराष्ट्रांत पूर्वापार स्थायिक झालेल्या जमातींचे विवेचनाच्या सोयी-साठी आर्थिक व शैक्षणिक प्रगतीनुसार ब्राह्मण, प्रभू इत्यादी पुढारलेल्या जाती,

मराठा, माळी, आगरी, भंडारी इत्यादी उदयोन्मुख ब्राह्मणेतर जाती आणि अस्पृश्य व इतर मागासलेल्या जमाती असे तीन विभाग पाडावे लागतील. पेशवाईच्या अखेरीस समाजातील राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक सत्ता ब्राह्मणांच्या हातांत स्थिरावली होती. इंग्रजी राज्यांत ब्राह्मणांची राजकीय सत्ता जरी संपुष्टात आली तरी त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक श्रेष्ठत्वाला तावडतोब धक्का लागला नाही. जुन्या काळात शासन–यंत्रणेत उच्चवर्णीयांचाच भरणा होता. म्हणून नव्या राजवटीनही वेगवेगळ्या खात्यांतून त्यांचीच प्रथम वर्णी लागली. शिक्षणाची व कार्यालयीन कामकाजाची त्यांना परंपरा होती. म्हणून इंग्रजी शिक्षणाबद्दल त्यांनीच प्रथम उत्सुकता दाखविली. जमीनमहसूल, न्याय, शिक्षण इत्यादी खात्यांतील दुय्यम दर्जाच्या नोकऱ्यांवर त्यांच्या नेमणुका झाल्या. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस पाश्चात्त्य विद्येच्या प्रकाशात प्राच्य विद्येचे येथे पुनरुज्जीवन झाले. तेव्हा लेखक, प्रकाशक, इतिहास व प्राच्यविद्या यांचे संशोधक म्हणून अनेक उच्चवर्णीय पुढे आले. अद्यापही सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात उच्चवर्णीयच अग्रेसर आहेत. कायद्याच्या अभ्यासामुळे सनदशीर राजकारणाचे तंत्र त्यांनाच प्रथम अवगत झाले. राजकीय स्वातंत्र्याचे त्यांनाच आकर्षण वाटले. आणि पुढारी व स्वयंसेवक या दोन्ही नात्यांनी अनेक वर्षे त्यांनी राजकीय कार्याची धुरा वाहिली. पहिल्या महायुद्धानंतर जी चार-दोन महाराष्ट्रीय घराणी आधुनिक तंत्रावर चाललेल्या औद्योगिक व्यवसायांकडे वळली ती वरिष्ठ जातींतीलच होती. ब्राह्मणेतर जातीत जसजशी राजकीय जागृती झाली, तसतशी राजकीय क्षेत्रातील उच्च पदे विभूषित करण्याची ब्राह्मणांची संधी कमी होत गेली. आज या जातीतील महत्त्वाकांक्षी तरुण तंत्रविद्येची आराधना करीत आहेत. वकील, डॉक्टर इत्यादी व्यावसायिक पेशाचे लोक व पाश्चात्यविद्याविभूषित तंत्रज्ञ यांच्यामध्ये पुढारलेल्या जातींचीच संख्या जास्त आहे.

ब्राह्मण, प्रभू इत्यादी पुढारलेल्या जातींना इतर जातींच्या मानाने आर्थिक व सांस्कृतिक उत्कर्षाची संधी अधिक असली तरी सर्वच उच्चवर्णीय वरिष्ठ वर्गात आहेत असे समजण्याचे कारण नाही. समाजाचे आर्थिक जीवन जसजसे बहुरंगी होते, तसतशी बुद्धीचे कौशल्य लागणाऱ्या व्यवसायांतही अधिकाधिक श्रमविभागणी होते. वरिष्ठ दर्जाच्या नोकऱ्यांसाठी किंवा व्यवसायासाठी लागणारे शिक्षण घेणे सर्वांनाच परवडत नाही. त्यामुळे बहुसंख्य बुद्धिजीवी लोकांना शिक्षक, कारकून किंवा कनिष्ठ दर्जाचे अधिकारी म्हणून काम करावे लागते व कनिष्ठ मध्यम वर्गातच त्यांचा समावेश होतो. आपल्याकडील उच्चवर्णीयांना शारीरिक श्रमाचे वावडे असल्याने कसबी कामाकडे ते सहसा वळत नाहीत. म्हणून शिक्षणाच्या प्रसाराबरोबर कारकुनांची संख्या वाढत जाते आणि इतर व्यवसायांच्या मानाने त्यांचे उत्पन्न कमी राहाते. ठराविक पगारात कुटुंबाच्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करताना त्यांची फार ओढाताण होते. एकंदर राष्ट्रीय उत्पन्न गेल्या पंधरा वर्षांत जरी थोडेफार वाढले असले तरी या कनिष्ठ मध्यम वर्गाची परिस्थिती मात्र दिवसेंदिवस खालावत चाललेली आहे.

### ब्राह्मणेतर

महाराष्ट्रातील बहुसंख्य लोक मराठा, कुणबी, माळी, भंडारी, आगरी, कोळी, इत्यादी ब्राह्मणेतर जातींचे आहेत. साहजिकच समाजातील वाढत्या श्रमविभागणीबरोबर निरनिराळ्या आर्थिक गटांत ते विभागले जात आहेत. पूर्वीपासून पाटीलकीची व देशमुखीची वतने भोगणाऱ्या ब्राह्मणेतरांचा खेड्यांतील वरिष्ठ वर्गातच समावेश केला पाहिजे. खेड्यांतील बरेचसे उच्च-वर्णीय आता शहरात स्थायिक झाल्याने खेड्यातील सत्ता ब्राह्मणेतर जातीतील वरिष्ठ वर्गाच्या हातांत केंद्रित होत आहे. मात्र वरिष्ठ वर्गात केव्हाही समा-जातील अत्यंत थोडे लोकच असणार. तेव्हा बहुसंख्य ब्राह्मणेतर मध्यम शेतकरी किंवा कामगार या दोन मोठ्या वर्गांत आढळले तर त्यांत काहीच आश्चर्य नाही. शेतीची परिस्थिती खालावली की, मध्यम शेतकऱ्यांतील कांही लोक जमिनीला पारखे होऊन शेतमजुरीवर उपजीविका करतात. शहरांत औद्यो-गिक कामगारांप्रमाणे व्यापारी व छोटे कारखानदार यांच्यामध्येही ब्राह्मणेतर जातींचे लोक आहेत. कऱ्हाड–सातारा, किंवा खानदेश-वऱ्हाड या भागात छोटेछोटे कारखाने काढण्यात माळी, मराठा, लेवा पाटील या जातींचे लोक पुढाकार घेत आहेत. महाराष्ट्राचे राजकीय पुढारीपण सध्या या लोकांच्या हातात आहे. मध्ययुगामध्ये या जातींना शिक्षणाची परंपरा नव्हती. म्हणून आधुनिक शिक्षणाचे मोल त्यांना लवकर कळले नाही. त्यामुळे सांस्कृतिक क्षेत्रात या जातींचे लोक बराच काळ उच्चवर्णीयांच्या मागे राहिले. अद्यापही ज्या व्यवसायात प्रवेश मिळविण्यासाठी उच्च शिक्षणाची किंवा तंत्रनैपुण्याची गरज लागते त्यामध्ये ब्राह्मणेतर जातींचे लोक कमी आहेत. मात्र शिक्षणाबद्दल नुकतीच त्यांच्या मनात आस्था उत्पन्न होऊ लागली आहे. तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालये काढण्यात येत असून शिक्षणाचा प्रसार वेगाने होत आहे. आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रांत उच्चवर्णीयांशी चाललेली या जातींची स्पर्धा पुढील काळात वाढत जाणार यात मुळीच शंका नाही.

### मागासलेल्या जमाती

अस्पृश्य व इतर मागासलेल्या जमाती मध्ययुगीन समाजव्यवस्थेत सर्वांत खालच्या थरावर होत्या. आजही शिक्षण, सत्ता, संपत्ती इत्यादी बाबतीत त्या इतर जातींच्या मानाने बऱ्याच मागे राहिल्या आहेत. खेड्यां-तील लहान शेतकरी व भूमिहीन शेतमजूर बहुधा ह्या जातींचे असतात. शहरांतही विनकसबाची व अल्पमजुरीची कामे त्यांच्याच वाट्याला येतात. शिक्षण व व्यवसाय यांजवरील परंपरागत निर्बंध गेल्या शतकात जरी दूर झाले, तरी वरिष्ठ जातींच्या दुराग्रहामुळे अस्पृश्यांना बराच काळपर्यंत शाळांतून प्रवेश मिळाला नाही. व्यापार किंवा स्वतंत्र व्यवसाय करण्यास त्यांना अस्पृश्यतेमुळे अडथळा येत होता. शहरांतील कारखान्यांमधून त्यांना कसबाची व देखरेखीची कामे देण्यास इतर जातींचा विरोध होता. म्हणून अस्पृश्य जातींतून पांढरपेशा मध्यमवर्ग निर्माण होण्यास बराच काळ लोटावा लागला. अस्पृश्यांमध्ये महार ही जात संख्येने फार मोठी होती. लढाऊ बाण्याची व मर्दुमकीची तिला परंपरा होती. पेशव्यांच्या लष्करात महारांची स्वतंत्र पथके होती. ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात महार लोक सुभेदार, सुभेदार मेजर

ह्या हुद्द्यापर्यंत चढले. त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सक्तीने शिक्षण घ्यावयास लावले. अस्पृश्य सैनिकांची अशी काही कुटुंबे शिक्षणाने, राहणीने व मानमान्यतेमुळे समाजाच्या वरच्या थरात आली. लॉर्ड किचनेर हिंदुस्थानचे सरसेनापती झाल्यावर अस्पृश्यांची रिक्रूटभरती त्यांनी बंद केली व सैन्यातील अस्पृश्य अधिकाऱ्यांना त्यांनी सक्तीने सेवानिवृत्त व्हावयास लावले. त्यामुळे अस्पृश्यांना उपलब्ध असलेली उत्कर्षाची एकुलती एक पाऊलवाट बंद झाली. परंतु उच्च राहणीची काही काळ सवय झाल्यामुळे त्यांच्यांतील महत्त्वाकांक्षेचा स्फुलिंग प्रज्वलित झाला होता. प्रतिकूल परिस्थितीतही तो टिकून राहिला. शिक्षणासाठी कष्ट व हाल सोसण्याची त्यांची तयारी होती. कोल्हापूरचे श्रीशाहूछत्रपती आणि बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांनी अनेक अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिक्षणात मदत केली. या संस्थानिकांच्या औदार्याने व स्वतःच्या कर्तृत्वाने शिक्षण घेऊन जे थोडेफार अस्पृश्य तरुण पुढे आले त्यांनीच महाराष्ट्रात दलित समाजाच्या आत्मोद्धाराच्या चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

महाराष्ट्राच्या २६ जिल्ह्यांत मिळून एकूण २२ ते २३ लक्ष लोक जंगलांतील आदिवासी जमातींचे आहेत. जंगलांत व डोंगरदऱ्यांत राहणारे आदिवासी आधुनिक काळापर्यंत सुधारलेल्या समाजापासून दूर राहून स्वतःचे स्वतंत्र सामाजिक जीवन जगत होते. पण इंग्रजी राज्यात आपल्या अर्थव्यवस्थेत जे स्थित्यंतर घडून आले त्यामुळे त्यांचे परंपरागत सामाजिक जीवन उध्वस्त झाले. जंगलांतील नैसर्गिक साधनसामुग्रीवर उपजीविका करणारे आदिवासी आधुनिक जंगलविषयक कायद्यांमुळे आपल्या परंपरागत हक्कांना वंचित झाले. त्यांनी लागवडीखाली आणलेल्या जमिनींना नवीन धारापद्धती लागू करण्यात आल्यावर सावकार व व्यापारी यांनी त्यांच्या जमिनीवर तावा मिळविला. सरकारकडून दारूचा मक्ता घेतलेल्या गुत्तेदारांनी आपल्या स्वार्थाखातर त्यांच्या व्यसनाधीनतेला उत्तेजन दिले. महाराष्ट्रातील बहुतेक आदिवासी आज छोटे शेतकरी, कुळे किंवा शेतमजूर म्हणून काम करताना दिसतात.

महाराष्ट्रातील वर्ग आणि जाती यांचे परस्पर संबंध तपासून पाहिले की एक गोष्ट सिद्ध होईल. ती म्हणजे कोणतीच जात वर्गदृष्टया आज एकसंध राहिलेली नाही. ब्राह्मण, मराठा किंवा महार अशी कोणतीही जात घेतली तरी निरनिराळ्या आर्थिक गटांत ती विभागली गेली आहे; आणि तिच्यातील निरनिराळ्या कुटुंबांच्या उत्पन्नात, राहणीत व आचारविचारांत खूप अंतर पडलेले आहे. सुरुवातीची अनुकूल परिस्थिती आणि मर्यादित लोकसंख्या यांमुळे शेतमजूर किंवा कामगार या वर्गामध्ये उच्चवर्णीय मनुष्य सहसा दिसून येत नाही. आणि पिढ्यान्‌पिढ्यांचे मागासलेपण एकदम झटकून टाकणे शक्य नसल्यामुळे वरच्या शिखरापर्यंत अस्पृश्य किंवा आदिवासी जमातीतील मनुष्य बहुधा पोहोचू शकत नाही. मधल्या थरांत मात्र सर्व जातींतील व्यक्तींचा समावेश होतो. म्हणून जातिव्यवस्थेने समांतर अशा आडव्या थरांत लोकसंख्येची जी विभागणी केली होती, ती आता तशीच टिकून राहिली आहे असे म्हणता येणार नाही.

मध्ययुगीन समाजव्यवस्थेत प्रत्येक जात सलग व एकरूप होती. एकाच जातीचे लोक बहुधा एकाच व्यवसायात असत. त्यांचे उत्पन्न व राहणीचे मान सारखे होते. आचारविचारांवर जातिसंस्थेचे कडक निर्बंध होते. मराठेशाहीच्या काळात शहरांतील वरिष्ठ जातीत हळूहळू वर्गभेद निर्माण होऊ लागले. परंतु आर्थिक जीवनाचा पाया अत्यंत संकुचित राहिल्याने त्यामधून जातिसंस्थेला हादरे बसले नाहीत. इंग्रजी कायदे आणि सामाजिक सुधारणा यांच्यामुळे गेल्या शंभर वर्षांत रूढीचे निर्बंध सैल झाले व खाणेपिणे, पोषाख, राहणी याबाबतीत व्यक्तीला थोडेफार स्वातंत्र्य मिळाले. त्याबरोबर वरिष्ठांचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती प्रत्येक जातीत उत्पन्न झाली. उद्योगधंद्यांच्या वाढीबरोबर व्यवसायाचे क्षेत्रही हळूहळू विस्तृत होत होते. त्यामुळे महत्त्वाकांक्षी तरुणांना नवे व्यवसाय मिळविणे सोपे गेले. नव्या वर्गात गेल्यावर त्या त्या वर्गांतील वरिष्ठ जातीचे आचारविचार त्यांनी स्वीकारले. म्हणून ब्राह्मण कारखानदार व ब्राह्मण कारकून, मराठा कॉन्ट्रॅक्टर व मराठा शेतकरी आणि महार सुभेदार व महार शेतमजूर यांच्यामध्ये शिक्षण, संपत्ती व महत्त्वाकांक्षा या बाबतीत फार मोठे अंतर पडले आहे. ज्या वर्गात ते दाखल होतात त्या वर्गाची मनोवृत्ती व विचारसरणी आत्मसात करण्याची त्यांची धडपड असते. भांडवलशाहीतील वर्गसंबंधांमुळे एकाच जातीतील निरनिराळ्या गटांमध्ये निर्माण झालेला हा हितविरोध ही सामाजिक दृष्ट्या एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे.

# १७. मोठीं माणसं

## लोकमान्य टिळक

### महात्मा गांधी

[ लो. टिळक १९१८ सालीं इंग्लंडला शिष्टमंडळ घेऊन निघाले असतांना त्यांनी लिहिलेला लेख पुढे दिला आहे. मुंबईच्या सौ. अवन्तिकाबाई गोखले यांनी गांधीजींचें जें मराठी चरित्र लिहिलें त्याला प्रस्तावना म्हणून लो. टिळकांनी हा लेख पुणें येथे तारीख १६ मार्च १९१८ रोजीं लिहिला आहे. सध्या हें चरित्र – आणि म्हणून लेख – दुर्मिळ आहे. या चरित्रग्रंथाचें पुनर्मुद्रण भारत सरकार करणार असल्याचें कळतें. या लेखांत गांधीजींच्या माहात्म्याची मूलगामी मीमांसा लोकमान्यांनी केलेली आहे.]

गेल्या सालीं म्हणजे १९१७ च्या डिसेंबर महिन्यांत कलकत्त्यास कॉंग्रेस सभेस गेलों असतां तेथे सौ. अवंतिकाबाई गोखले ह्यांनी आपण महात्मा गांधींचें चरित्र लिहीत असल्याचें मला कळवलें व त्यास प्रस्तावना लिहिण्यास मला विनंती केली. ही विनंती अर्थातच मला अमान्य करवेना. पण त्या वेळीं हें पुस्तक इतक्या लौकर तयार होईल अशी मला कल्पना नव्हती. विशेषतः मी विलायतेस जाण्यास निघालों असतां, त्या ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याचें काम घाईघाईनें उरकावें लागेल, असें तर मुळींच वाटलें नव्हतें. पण आता तशी स्थिति आल्यामुळे ही प्रस्तावना तरी पुरी करावी लागत आहे. महात्मा गांधींच्या चरित्रास प्रस्तावना लिहिण्यास अधिक चांगली वेळ व फुरसत पाहिजे होती. ती मिळाली नाही याबद्दल मला वाईट वाटतें. तथापि 'अकरणान्मंदकरणं श्रेयः' ह्या न्यायानें मी तें काम करीत आहें. या ग्रंथाचे वाचक वरील हकीगत लक्षांत आणून त्याबद्दल मला माफी करतील अशी आशा आहे.

महात्मा गांधी यांचें नांव हिंदुस्थानांत कोणास माहिती नाही असें नाही. अर्थात् त्यांच्याबद्दल थोडीबहुत माहिती करून घेण्याची इच्छाहि सर्व लोकांस झालेली आहे असें म्हटलें तरी चालेल. परंतु ही इच्छा पूर्ण होण्यास मराठी भाषेत आजपर्यंत कोणताच ग्रंथ झालेला नव्हता. ती उणीव सौ. अवंतिकाबाई यांनी प्रस्तुतचा सोपा ग्रंथ लिहून भरून काढली याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करितों. सौ. अवंतिका-

बाई म्हणतात त्याप्रमाणे महात्मा गांधी यांचें चरित्र अद्याप वाढत वाढत आहे. आणि ह्याच विषयावर नवा ग्रंथ लिहिणारास दरवर्षी नवीन माहिती मिळण्यासारखी आहे. म्हणून हल्लीच्या ग्रंथाने पुढील लेखकास कोणत्याहि प्रकारची अडचण न येतां, उलट त्या कार्याची प्रस्तावना करून, ह्या कट्ट्या देशभक्ताच्या चरित्राची महाराष्ट्र-वाचकांस ओळख करून देण्याची कामगिरी बजावल्याचें श्रेय सौ. अवंतिकाबाईस मिळणार आहे. सौ. अवंतिकाबाई ह्या हल्ली चंपारण्यांत महात्मा गांधी ह्यांस मदत करण्यासाठी व त्यांच्या हाताखाली राहून काम करण्यासाठी गेलेल्या आहेत. तेव्हा केवळ पुस्तकावरूनच नव्हे, तर प्रत्यक्ष अवलोकनानेहि त्यांच्या चरित्रनायकाचे विचार, आचार, स्वभाव, राहणी, अनेक विषयावरील त्यांचीं मतें, त्यांच्या कुटुंबांतील माणसांशीं किंवा इतरांशीं त्यांचें वर्तन, यांचा त्यांना पुरा परिचय झालेला आहे. ग्रंथ लिहिण्याच्या कामीं ह्या प्रत्यक्ष अवलोकनाचा पुष्कळ उपयोग झालेला आहे, असें वाचकांस सहज दिसून येईल.

महात्मा गांधी यांचें चरित्र बोधप्रद आणि अनुकरणीय कां व्हावें याचीं कारणें शोधून काढण्यास, माझ्या मतें, फारसे परिश्रम नको आहेत. गांधी हे ज्याप्रमाणे विलायतेहून बॅरिस्टरची परीक्षा पास होऊन आलेले आहेत, त्याचप्रमाणे बॅरिस्टर झालेले पुष्कळ लोक आहेत. त्यांचे वडील दिवाणगिरीच्या कामावर होते तसेहि पुष्कळांचे असतील. किंवा ह्यांचा स्वभाव जरा साधा व सरळ आहे तसा इतरांचाहि असेल. त्यांत कांहीं विशेष नाहीं. इंग्रजी विद्येचा ह्या देशांत प्रचार झाल्यापासून पुष्कळ निष्णात लोक हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयांतून बाहेर पडलेले आहेत. जगाचा इतिहास किंवा भूगोल सांगोपांग माहीत असणें अथवा एखाद्या शास्त्रीय विषयावरील माहिती बिनचूक सांगणें, हीं कामें केवळ बुद्धिगम्य असल्यामुळे तीं आमच्यापैकीं पुष्कळ बुद्धिमान लोकांनी गेल्या शे-दीडशे वर्षांत उत्तम रीतीनें करून दाखवलीं आहेत. तसेच पाश्चात्त्य विचार, पाश्चात्त्य सामाजिक पद्धति, पाश्चात्त्य समजुती किंवा समाजरचना इत्यादि गोष्टींबद्दलहि बौद्धिक किंवा तार्किक विचार करण्यांत आमच्या सुशिक्षितवर्गानें आपली बुद्धिमत्ता चांगल्या प्रकारें व्यक्त केली आहे. परंतु शील किंवा चारित्र्य, ज्यामुळे या कर्ममय भूमींत मनुष्याची सभोवतालच्या वस्तुस्थितीवर सत्ता चालू शकते आणि ज्यामुळे

निरनिराळ्या गोष्टींबद्दल केलेल्या प्रयत्नांस सिद्धि होण्याचा संभव उत्पन्न होतो तें शील व चारित्र्य ज्या उदाहरणावरून आपल्या प्रत्यक्ष निदर्शनास येईल अशी चरित्रें आमच्याकडे फारच कमी दृष्टोत्पत्तीस येतात. गांधींच्या चरित्राचें जें कांहीं वैशिष्ट्य आहे तें हेंच होय. त्यांच्या सामाजिक धार्मिक, राजकीय किंवा इतर मतांपैकीं कांहीं मतें कितीएकांस कदाचित् पसंत होणार नाहींत, विद्वत्तेने त्यांना मागे टाकणारे दुसरे पुष्कळ गृहस्थ असतील, पण शील, चारित्र्याची जी महती वर सांगितली त्या दृष्टीने विचार केला असतां महात्मा गांधी यांचें चरित्र खरोखरच सामान्य मनुष्यास आदर्शभूत होण्यासारखें आहे. ह्याबद्दल कांहीं मतभेद असेल किंवा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. आणि म्हणूनच मराठी भाषेत झालेल्या त्यांच्या प्रस्तुतच्या चरित्राचा महाराष्ट्रांतील लोकांनी नीट अभ्यास करावा अशी आमची त्यांस शिफारस आहे.

हिंदुस्थानांतील लोक, मग ते हिंदुस्थानांत राहणारे असोत किंवा इंग्रजी साम्राज्याच्या इतर भागांत राहणारे असोत, चोहोंकडे विपन्न स्थितींत आहेत याबद्दल कांहीं शंका नाहीं. तसेंच ही विपन्नावस्था कां आली, पूर्वीच्या स्थितींत कोणतें अंतर पडलें, हें अंतर न पडण्यास काय केलें पाहिजे, इत्यादि गोष्टींची पुष्कळ चर्चा झाली असल्यामुळे त्याबद्दल या लहानशा प्रस्तावनेंत आम्ही कांहीं लिहूं इच्छीत नाहीं. किंबहुना महात्मा गांधी यांच्या चरित्रापासून जो बोध घ्यावयाचा त्याचा हा महत्त्वाचा भाग नाहीं अशी आमची समजूत आहे. व्यक्तीच्या संसारांत काय किंवा देशाच्या संसारांत काय, परिस्थिति ही प्रायः पूर्वपिढीच्या किंवा पूर्वकालीन कर्मांच्या परिपाकाने निर्माण झालेली असते. ही स्थिति वाईट असल्यास त्याचा दोष त्या स्थितींत राहणाऱ्या मनुष्याकडे देतां येत नाहीं हें खरें आहे. पण ती जर वाईट असेल तर तिच्या कारणांचा योग्य ऊहापोह करून व ती दूर करण्यास कोणते उपाय केले पाहिजेत, ह्याचा शक्य तितका खोल विचारांतीं निर्णय करून, तो निर्णय अमलांत आणण्याचें काम म्हणजे अर्थात् ती स्थिति सुधारण्याचें काम, जर सदर स्थितींत सापडलेला पुरुष, विशेषतः देशांतील कर्ता पुरुष करणार नाहीं, तर मात्र तो आपल्या कर्तव्यास जागला नाहीं असें म्हणावें लागेल. कारण परिस्थिति उत्पन्न होण्यास जरी आपण कारणीभूत नसलों, तरी ती सुधारण्यास आपल्या हातून शक्य तेवढे प्रयत्न करणें, हें प्रत्येक

मनुष्याचें व्यक्तिदृष्ट्या आणि सार्वजनिकदृष्ट्या कर्तव्य आहे, पवित्र कर्तव्य आहे, असा शास्त्राचा आणि धर्माचाहि सिद्धान्त आहे. ज्या योगाने जगाचें धारणपोषण होतें त्याला धर्म असें म्हणतात. आणि जगाचें धारणपोषण म्हटलें म्हणजे त्यांत सद्यःकालीन परिस्थिति सुधारून ज्यायोगें ती परिस्थिति वरच्या पायरीला जाऊन अखेर पूर्णावस्थेला पोंचेल त्या त्या सर्व गोष्टी करणें, करविणें, स्वतः करणें आणि लोकांकडून करविणें याचा प्राधान्येंकरून समावेश होतो. आपला जन्म कोणत्याहि देशांत झालेला असो, तो केवळ त्या देशांतील अन्न खाऊन आमरणान्त आपल्या बायका-मुलांसह चैनींत राहण्यासाठीं नाहीं, यापेक्षा कांहीं तरी उच्चतर ध्येय सिद्ध करण्यासाठीं आहे, ही गोष्ट शास्त्रकार आणि धर्मकार या दोहोंसहि पूर्णपणे मान्य आहे. या उच्चतर ध्येयाची मर्यादा इतकी श्रेष्ठ आहे कीं, मनुष्य या मार्गाने जातां जातां अखेर त्याला ह्या जगाचें पालनपोषण करणाऱ्या परमेश्वराचें तादात्म्य प्राप्त होतें, म्हणजे तो देवपणा पावतो, असें शास्त्रांतून वर्णन आहे. परंतु शास्त्र आणि धर्म या दोहोंच्याहि आज्ञा जरी अशा प्रकारच्या आहेत, तरी ह्या ध्येयांकडे आमच्या देशांतील लोकांचें जितकें लक्ष लागावें तितकें लागलें नव्हतें, असें मोठ्या दुःखाने म्हणावें लागतें. एरवीं सध्याची परिस्थितीच उत्पन्न झाली नसती. पण पूर्वकालीं ह्या गोष्टींकडे देशांतील कर्त्या पुरुषांचें जावें तितकें लक्ष गेलें नाहीं म्हणून प्रस्तुतकालीं आम्हींहि तो मार्ग स्वीकारूं नये असें होत नाहीं. देशाच्या उन्नतीसाठीं जे कांहीं प्रयत्न करावयाचे त्याला कालाची कांहीं विशिष्ट मर्यादा असते असें नाहीं. पूर्वी कोणी असे प्रयत्न केले नसले तर पुढच्या लोकांनी असे करूं नयेत असेंहि नाहीं. आज केले नाहींत तर उद्या करूं नयेत असें नाहीं. अशा तऱ्हेचे प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे आणि ही कर्तव्य-जागृति ज्याच्या ज्याच्या मनांत ज्या ज्या क्षणीं होईल, त्या त्या क्षणीं त्याने हें आपलें कर्तव्य बजावण्यास, निरलसपणें स्वार्थत्याग करून आणि आपणांवर किंवा आपल्या कुटुंबावर संकटें येणार किंवा येतील याची पर्वा न करतां परमेश्वरावर भरवसा ठेवून, निष्काम बुद्धीनं लागलें पाहिजे, हा ह्यांतील सारभूत सिद्धान्त आहे. म. गांधींच्या चरित्रावरून जो कांहीं बोध घ्यावयाचा, त्यांपैकीं मुख्य बोध हा होय.

अलीकडे दुसरी एक अशी समजूत होत चालली आहे कीं,

हिंदुस्थान देशाची स्थिति सुधारण्यास प्रथमतः हिंदी समाजाची स्थिति सुधारली पाहिजे आणि ही सुधारेल तेव्हा मग पुढे राजकीय गोष्टींचा विचार करण्याची वेळ येईल. महात्मा गांधी यांच्या चरित्रावरून वरील मत किती अयथार्थ आहे हें वाचकांस सहज कळून येणार आहे. देशांतील सर्व कांही सुधारणा घडवून आणण्यास 'सर्वारंभास्तण्डुलाः प्रस्थमूलाः' या न्यायाने त्या देशांतील सत्ता, पूर्ण नाही तरी बऱ्याच अंशाने, देशांतील कर्त्या आणि विचारी पुरुषांच्या हातांत असावी लागते. सत्तेशिवाय शहाणपण फुकट जातें इतकेंच नव्हे, तर कर्तृत्वहि निर्माल्यवत् होतें. म्हणून देशाची स्थिति सुधारण्याचे जे प्रयत्न करावयाचे ते विशेषेंकरून प्रथमतः ह्या सर्व सुधारणांना अवश्य लागणाऱ्या मूलभूत बाबतींतच झाले पाहिजेत. महात्मा गांधींचें असें मत नसतें, तर ते राजकीय सुधारणेंत बिलकूल पडले नसते. आफ्रिकेंतील वसाहतींत गेलेल्या हिंदी मजुरांच्या कल्याणार्थ त्यांनी जे प्रयत्न केले ते केवळ सामाजिक होते असें नाहीं. आफ्रिकेंतील जुलमी राज्यव्यवस्थेमुळेच तेथील हिंदी मजुरांवर हा प्रसंग ओढवला होता असें म्हटलें तरी चालेल. ह्याचा गांधी यांच्या मनावर स्वभावतांच असा परिणाम झाला की, राज्यव्यवस्थेंत सुधारणा झाल्या खेरीज आफ्रिकेंतील हिंदी लोकांची स्थिति सुधारावयाची नाहीं. इंग्रजी साम्राज्याचे जर आम्ही भागीदार आहों, तर ह्या साम्राज्यांत गोऱ्या प्रजेस जे हक्क आहेत तेच हिंदी प्रजेसहि असले पाहिजेत, हें न्यायदृष्ट्या अगदी उघड आहे. पण गोऱ्या लोकांच्या आज ज्या वसाहती झालेल्या आहेत त्या वसाहतवाल्यांनी केवळ आपल्याच फायद्याकरिता केल्या अशी स्वार्थमूलक समजूत असल्यामुळे साम्राज्याच्या इतर भागांतील लोकांस समबुद्धीने वागविण्यास ते तयार नाहीत. तथापि बाहेरच्या देशांतील लोक त्यांस अगदी नको आहेत असेंहि नाहीं. कारण वसाहतींत नवीन किंवा खनिज द्रव्यें मुबलक असून ह्या संपत्तीचा पूर्ण उपयोग करण्यास वसाहत वाल्याजवळ पुरेसें मनुष्यबळ नाहीं. हजार-पांचशे किंवा दोन-चार हजार गोरे वसाहतवाले दोहोंच्याऐवजीं चार-चार हातांनी जरी काम करूं लागले किंवा सहस्र बाहूंच्या शक्तीचीं कितीहि यंत्रें त्यांनी उपयोगांत आणिलीं, तरी वसाहतींतल्या मुलुखापासून द्रव्यदृष्ट्या जितका फायदा होणें शक्य होतें किंवा आहे, त्याच्या शतांश देखील फायदा ह्या वसाहतवाल्यांस होणार नाहीं. तेव्हा आफ्रिकेंत मागे निग्रो लोकांस ज्याप्रमाणें ते

वागवीत, त्याचप्रमाणे हिंदुस्थानांतील काळ्या लोकांस मजूर म्हणून तेथे नेऊन केवळ पशूप्रमाणे त्यांस वागविण्याची आणि त्यांच्या उद्योगावर आपण समृद्ध होण्याची वसाहतवाल्यांनी कल्पना काढली. आमच्या हिंदुस्थानांतील नोकरशाही वसाहतवाल्यांच्या बांधवांचीच असल्यामुळे वसाहतींतील हिंदी मजुरांच्या शोचनीय स्थितीकडे हिंदुस्थान सरकारचें लक्ष गेलें नाही.

ही शोचनीय स्थिति हिंदुस्थानांतील पुढारी लोकांच्या लक्षांत येऊन गेल्यास पुष्कळ वर्षें झालीं. पण गांधींसारखे पुरुष येईपर्यंत तिचें अल्प देखील निवारण झालें नाही. समजलें होतें पण उमजलें नव्हतें आणि उमजलें तरी करवत नव्हतें, असा प्रकार होता. या कुचंब्यांतून लोकांना बाहेर काढून गांधींनी आपल्या उदाहरणाने सुधारणेचा मार्ग दाखविला, असें त्यांच्या चरित्रावरून कोणासहि कळून येईल. आफ्रिकेंतील हिन्दी लोकांस त्यांच्या विपन्नावस्थेंतून सोडविण्यास गांधी यांनी काय केलें याचेंहि जरा सूक्ष्म रीतीने अवलोकन केलें पाहिजे. एखाद्या ठिकाणची राज्यव्यवस्था अन्यायाची असली, तरी ती सुधारण्याचा प्रयत्न करणें हा कांहीं न्यायदृष्ट्या राजद्रोह होऊं शकत नाही. ह्याला राजद्रोह म्हणणें हें, राज्यकर्त्यांस न्याय नको, नीति नको, अन्यायाचा प्रतिकार करावयास नको, आपल्या प्रजेस समतेचे हक्क द्यावयास नकोत, असें म्हणण्यासारखें आहे. आम्ही असें समजतों की, प्रजेचें कल्याण हेंच राज्यसत्तेचें खरें ध्येय व सामर्थ्य आहे. हा सिद्धान्त एकदा पत्करला म्हणजे मग ज्या ठिकाणीं अन्याय आहे तेथे त्याचा प्रतिकार करून तो दूर करणें म्हणजे एक प्रकारें राज्यसत्तेच्या ध्येयाची अंमलबजावणी करण्यास मदत करणें होय, असा त्यापासून सहजच दुसरा सिद्धान्त निघतो. पण पूर्वसंचितामुळे आलेले दुराग्रह अगर स्वार्थबुद्धि यामुळे प्रजाजनांपैकीं कांहीं विशिष्ट व्यक्ति, जाति किंवा वर्ग कधी कधी इतके पछाडले जातात की, त्यांनाहि न्यायाचीं तत्त्वें दिसेनाशीं होतात; अर्थात अशा लोकांचा इतर लोकांवर एक प्रकारें जुलूम होऊं शकतो. अशा वेळीं राज्यकर्त्यांनी त्यांत एकदम हात घालून अन्यायाच्या गोष्टी बंद केल्यास ह्या दुराग्रही व स्वार्थी, पण परंपरागत वजनानें प्रतिष्ठित बनलेल्या वर्गास दुखवावें लागतें व त्यामुळे शांततेची चालत आलेली घडी विस्कळीत होते. यास्तव अशा प्रकारच्या

स्थितींत ज्यांच्यावर जुलूम होतो त्यांच्याकडून निकराचे प्रयत्न झाल्याखेरीज राज्यकर्ते प्रायः त्यांत मन घालीत नाहीत. सारांश, चालतें मूल ज्याप्रमाणे कोणीहि कडेवर घेत नाही. ठेच लागून पडलें तर गोष्ट निराळी, अशांतला प्रकारें राजकीय बाबतींतहि घडून येतो. जोंपर्यंत राज्यकारभार चालण्यांत कांहीं अडथळा येत नाही, तोंपर्यंत राज्याचीं सूत्रें चालविणाऱ्या लोकांनी तरी तिकडे काय म्हणून लक्ष द्यावें? मनुष्यस्वभावच असा आहे की, चालत्या गोष्टींत विनाकारण कोणी ढवळाढवळ करूं इच्छीत नाही. त्यापासून दुष्परिणाम होतात असें प्रत्यक्ष अनुभवाला येईल; इतकेंच नाही तर त्यामुळे अडेल, तेव्हाच कोणीहि मुत्सद्दी मनुष्य त्यांत सुधारणा करण्यास प्रवृत्त होत असतो, एरवी नाही. अर्थात् प्रजेच्या दुःखाची किंवा गाऱ्हाण्यांची किंवा त्यावर होणाऱ्या जुलुमांची स्थिति अशा मजलेपर्यंत आणून ठेवणें आणि शेवटीं राज्यकर्त्यांकडूनच ती सुधारणा घडवून आणणें हें प्रत्येक देशभक्तानें हरएक प्रसंगीं कर्तव्य आहे आणि हें कर्तव्य गांधी यांनी उत्तम प्रकारें बजावलें त्यामुळेच ते सर्व लोकांच्या स्तुतीस व आदरास पात्र झालेले आहेत.

परंतु गांधीच्या ह्या अडवणुकीच्या मार्गाचें खरें रहस्य सांगण्यास आणखीहि दोन शब्द सांगितले पाहिजेत. देशांत शांतता राखण्यासाठी जे कायदे केलेले असतात, त्यांत राज्यकर्त्या अंमलदारांशीं दांडगाई करणें अगर त्यांचा हुकूम तोडून बंड करणें ह्या गोष्टी कितीहि सद्बुद्धीने केलेल्या असल्या तरी स्वभावतःच बेकायदेशीर मानल्या जातात. अशा वेळीं ज्या देशभक्तास आपली इच्छित सुधारणा कायदेशीर रीतीने अमलांत आणावयाची असेल त्याच्या मार्गांत अनेक अडचणी उत्पन्न होतात. मन जळत असतें, सुधारणा करण्याची उत्कट इच्छा असते, कायद्याच्या मर्यादेचें उल्लंघन करणें गैरशिस्त होय, अशी खात्री असते; पण उपाय नाही. गांधी यांनी स्वीकारलेला निःशस्त्र प्रतिकारचा, अडवणुकीचा किंवा त्यांच्या भाषेत बोलावयाचे तर सत्याग्रहाचा मार्ग अशा प्रकारच्या अडचणींतच त्यांस सुचलेला असून त्यांनी अनेक अडचणी सोसून त्या मार्गाचा अवलंब केल्यामुळे तो आता शास्त्रपूत झाला आहे. हा मार्ग सर्व प्रसंगीं, सर्व काळीं अवलंबिण्यासारखा असला तरी तो हरएक प्रसंगीं उपयोगांत आणावाच किंवा नाही अगर सर्व प्रसंगीं तितकाच फलद्रूप

होईल किंवा नाही हें निश्चित सांगणें कठीण आहे. तथापि त्या मार्गाची योग्यता मोठी आहे, हें सर्वांस कबूल करावें लागेल. राजाने केलेल्या कायद्याप्रमाणे सर्व प्रजेने वागावें म्हणूनच प्रत्येक कायद्याच्या मागे तो उल्लंघन करणारास शासन सांगितलेलें असतें. हें शासन प्रायः अशा प्रकारचें असतें कीं, त्यामुळें मनुष्यमात्राची प्रवृत्ति नीतीने वागण्याकडे व्हावी. नीतीचा मार्ग सुखाचा, समाधानाचा, आणि त्या मार्गाने जाण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तींत जर स्वार्थामुळे थोडी चलबिचल होण्याचा संभव असला, तर हें कायद्याचें शासन ती चल-बिचल काढून टाकून मनुष्याची सन्मार्गाकडे असलेली स्वाभा-विक निष्ठा दृढ करण्यास कारणीभूत होतें. पण त्याच्या उलट स्थितींत, म्हणजे जेव्हा कायद्याने ठरविलेली मर्यादा धर्ममूलक अगर न्यायमूलक नसून केवळ कायद्यांत सांगितलेल्या शासनामुळेच ती अमलांत यावी असा प्रचलित कायद्यांचा परिणाम होऊं लागतो, तेव्हा कायद्याने दिलेलें शासन भोगून धर्मतत्त्वावरची किंवा न्यायतत्त्वाची आपली सत्यनिष्ठा कसो-टीला लावावी अथवा कृत्रिम कायद्यांतील शासनाच्या भीतीने ईश्वरनिर्मित न्यायतत्त्वाचा अव्हेर करण्यास प्रवृत्त व्हावें, असा शहाण्यासुरत्या मनुष्याच्या डोळ्यापुढेहि एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. सत्यनिष्ठ माणसें कायद्याचा कृत्रिम निर्बंध पाळणें युक्त नाहीं असें सांगतात; पण हें सांगणें अमलांत येण्यास सत्यावरील निष्ठा इतकी तीव्र असावी लागते कीं, स्वतःच्या किंवा आपल्या बायकामुलांच्या सुखासुखाचा, बलाबलतेचा विचारहि मनांत न आणतां मनुष्य आपलें कर्तव्य करण्यास झटदिशी प्रवृत्त होईल. ज्याला मानसिक धैर्य, खरी सत्यनिष्ठा किंवा सात्त्विक-शील आणि दानत म्हणतात तें हेंच होय. हा गुण केवळ विद्वत्तेने येत नाहीं, केवळ चांगल्या कुलांत उत्पन्न झाल्याने येत नाहीं, केवळ बुद्धिमत्तेनेहि येत नाहीं. खरें आत्मबल हेंच होय. आणि म्हणून उपनिषदांतील ' नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन ' हें तत्त्व नीट लक्षांत ठेवलें पाहिजे.

पण अशा प्रकारचें आत्मबल नुसत्या विद्वत्तेने अगर बुद्धि-मत्तेने प्राप्त होण्यासारखें नसून तें नैसर्गिकच पाहिजे, हा सिद्धान्त जरी खरा असला तरी, निश्चयी मनुष्यास हा गुण, गीतेंत म्हटल्याप्रमाणे, अभ्यास आणि वैराग्य यांच्या योगाने, क्रमाक्रमाने नेहमीच प्राप्त होण्यासारखा असतो. हेंहि विसरतां कामा नये. थोर व उदार पुरुषांचीं चरित्रें शील-चरित्र-वर्धनास उपयोगी पडतात, यांतील बीज हेंच होय.

# १८. दलितांचे बाबा

प्रल्हाद केशव अत्रे

## महात्मा आंबेडकर

महात्मा फुले, महात्मा कबीर आणि महात्मा बुद्ध ह्या तीन महात्म्यांचे महान् शिष्य महात्मा आंबेडकर ह्यांच्या महानिर्वाणाला आज एक वर्ष पूर्ण झालें. खरोखरच, भारत हा मोठा दुर्दैवी देश आहे. अगोदर येथें महापुरुष शतकाशतकांतून एखादाच जन्माला येतो. आणि तो जन्माला आला तरी ह्या देशांतले कोट्यवधि मूर्ख लोक त्याचें मोठेपण त्याच्या ह्यातींत मुळीं ओळखतच नाहींत. सगळ्या महापुरुषांचा इतिहास अगदीं सारखा आहे. खिस्त, बुद्ध, कबीर, ज्ञानेश्वर, तुकाराम, गांधी या सर्वांचा त्यांच्या देशबांधवांनीं अमानुष छळ केलेला आहे. पण आंबेडकर हा ह्या जगांत एकच असा 'महात्मा' होऊन गेला कीं, यमयातनेच्या ज्या भयंकर अग्निदिव्यांतून त्याला सारा जन्म जावें लागलें, तसें जगांतल्या दुसऱ्या कोणाहि महापुरुषाला जावें लागलें नसेल! ह्या पृथ्वीतलावर एकट्या भारताखेरीज 'अस्पृश्य' समजलीं जाणारीं अगोदर माणसेंच नाहींत. आणि समाजाचा कसलाहि अपराध केला नसतां अस्पृश्यतेची राक्षसी शिक्षा शतकानुशतकें भोगीत असलेल्या अशा दुर्दैवी समाजांत एकहि महापुरुष आतांपर्यंत कधीं जन्माला आलेला नाहीं. जगांतल्या इतर महापुरुषांचा समाजानें कितीहि छळ केला असला तरी त्यांच्या छळाचा प्रारंभ कांहीं त्यांच्या जन्मापासून झाला नसेल. पण आंबेडकरांना आईच्या स्तनांतील दूध प्राशन करण्याच्या अगोदर हालअपेष्टेच्या हालाहलाचा प्याला तोंडाला लावावा लागला. सारा समाज ज्याला शिवायलाच मुळीं तयार नाहीं, असली विटंबना जगांतल्या कोणा महापुरुषाला कधीं सहन करावी लागली आहे काय? साऱ्या समाजानें ज्याला जन्मापासून लाथाडलें, प्रेमाचा हात साऱ्या आयुष्यांत एकदां देखील ज्याच्या पाठीवरून समाजानें कधीं फिरविला नाहीं, ज्याच्या विद्वत्तेबद्दल किंवा कर्तृत्वाबद्दल कौतुकानें एक अक्षरसुद्धां समाजानें उच्चारलें नाहीं, उलट ज्याच्या डोक्यावर राष्ट्रद्रोही, इंग्रजांचा हस्तक, हिंदुधर्माचा शत्रु, अशा एकाहून एक भयंकर शिव्यांची आग समाजानें एकसारखी उधळली, त्यानें त्या समाजाच्या रागालोभाची पर्वा तर कधीं केली नाहींच; उलट त्या समाजाविरुद्ध सतत पंचवीस वर्षें बंडाचा झेंडा उभारून देशाच्या राजकीय आणि सार्वजनिक जीवनांतलें परमोच्च स्थान पटकावलें, असा अलौकिक गुणांचा व सामर्थ्याचा पुरुष जगाच्या इतिहासांत कोठें होऊन गेला आहे काय? आम्हाला तरी माहीत नाहीं. दीडशें वर्षांत या देशांत प्रस्थापित झालेली इंग्रजांची सत्ता उलथून टाकण्यासाठीं ज्यांनीं ज्यांनीं आपलें सर्वस्व पणाला लावलें त्यांचीं त्यांचीं नावें देशाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांमध्यें लिहिलीं जातील. पण धार्मिक आणि सामाजिक पारतंत्र्याच्या नरकांत पांच हजार वर्षें सडत पडलेल्या सात कोटी गुलामांना स्वतंत्र करण्यासाठीं तळहातावर शिर घेऊन जो नरवीर साऱ्या देशाशीं आयुष्यभर एकटा लढला, त्याचें नांव देखील कदाचित् ह्या

देशाच्या इतिहासांत लिहिलें जाणार नाहीं. ही ह्या महापुरुषाच्या जीवनाची सर्वांत मोठी शोककथा ठरणार आहे. परकीयांशीं जो लढतो तो 'देशभक्त' ठरतो आणि स्वकीयांशीं जो लढतो तो 'देशद्रोही' ठरतो असा ह्या देशामधल्या राजकीय नीतिशास्त्राचा सिद्धांत आहे! आणि आंबेडकरांचें दुर्दैव असें कीं, ह्या देशामधल्या ह्या शतकांतल्या सर्वांत मोठ्या पुरुषाशीं म्हणजे महात्मा गांधींशीं आणि देशामधील सर्वांत बलाढ्य राजकीय संस्था जी काँग्रेस तिच्याशीं त्यांना जन्मभर झगडावें लागलें. महात्मा गांधींना किंवा काँग्रेसला ज्यांनीं ज्यांनीं विरोध केला ती ती मंडळी ह्या देशाच्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनांतून सपशेल उठली. त्यांची नांवनिशाणी देखील मागें राहिली नाहीं. आंबेडकरांना हें माहीत का नव्हतें? पण त्यांनीं जाणूनबुजून हा धोका पत्करला. त्यांना तो धोका पत्करण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. 'ब्रिटिशांचे हस्तक' आणि 'देशद्रोही' हे जे भयंकर आहेर टीकाकारांकडून त्यांनीं मिळविले त्याचें कारण गांधी आणि काँग्रेस हे देशाच्या स्वातंत्र्यासाठीं ब्रिटिशांशीं ज्या वेळीं झगडत होते त्याच वेळीं सात कोटी अस्पृश्यांच्या स्वातंत्र्यासाठीं आंबेडकरांना गांधींशीं आणि काँग्रेसशीं झगडावें लागलें. आंबेडकर जर ब्रिटिशांचे हस्तक आणि देशद्रोही असते तर त्यांना उघडपणें ब्रिटिश सरकारची नोकरी पत्करून परमोच्च सन्मानाचें पद मिळवितां आलें असतें. त्यांच्यासारख्या अलौकिक बुद्धीच्या आणि विद्वत्तेच्या माणसाला ब्रिटिशांच्या राज्यांत दुष्प्राप्य असें काय होतें? बरें, काँग्रेसमध्यें प्रवेश करून महात्मा गांधींची कृपा संपादन करण्याचें त्यांनीं मनांत आणलें असतें तर तीहि गोष्ट त्यांना कांहीं अवघड नव्हती. काँग्रेसमध्यें त्यांनीं पंडित नेहरूंच्या बरोबरीनें सारे सन्मान मिळविले असते. पण ब्रिटिशांचीं सेवावस्त्रें त्यांनीं अंगावर धारण केलीं नाहींत किंवा काँग्रेसच्या 'देशभक्ती'चा गणवेशहि त्यांनीं अंगावर चढविला नाहीं! सात कोटी अस्पृश्यांच्या उद्धारासाठीं सर्व सुखांचा, सन्मानाचा आणि लोकप्रियतेचा त्याग करून सर्वांगावर कांटेरी वस्त्रें चढविलीं आणि आपलें जीवन रक्तबंबाळ करून घेतलें. अस्पृश्यता निवारण्याचे म. गांधींचे आणि काँग्रेसचे मार्ग त्यांना सर्वस्वी अमान्य होते. अस्पृश्यांकडे पहाण्याची स्पृश्य समाजाची दृष्टि बदलली आणि त्याचें हृदयपरिवर्तन झालें तरच देशांतील अस्पृश्यता जाईल, ही महात्माजींची भूमिका होती. आंबेडकरांना स्पृश्य समाजाची दया, सहानुभूति आणि भीक नको होती. अस्पृश्यता कायद्यानें गेली पाहिजे आणि अस्पृश्यांना कायद्यानें संरक्षण मिळालें पाहिजे असा आंबेडकरांचा आग्रह होता. आंबेडकरांनीं अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला राजकीय स्वरूप देऊन तिच्यांत आमूलाग्र क्रांति घडवून आणली. ही त्यांची कामगिरी अभूतपूर्व आहे. पांच हजार वर्षे अस्पृश्य लोक जनावरांपेक्षां हीन जिणें जगत होते. मेलेल्या मुडद्याचें मांस खाऊन आणि समाजाच्या घाणीचे उकिरडे उपसून त्यांचीं मनें आणि शरिरें सडून गेलीं होतीं. ह्या सात कोटी मुडद्यांना जागें करून त्यांच्यामध्यें तेजाची आणि स्वाभिमानाची ज्योत ज्यांनीं पेटविली आणि आपल्या हक्काचा लढा लढण्यासाठीं जुल्मी समाजाविरुद्ध हातांत बंडाचा झेंडा घेऊन त्यांना उभें केलें ते आंबेडकर सात कोटी दलितांना परमेश्वरासारखे वाटत असले तर त्यांत आश्चर्य काय? जो हिंदु समाज आपल्याला आत्मीयतेनें, सहानुभूतीनें, प्रेमानें आणि माणुसकीनें वागवीत नाहीं त्या समाजामध्यें आपण निष्कारण राहाण्यांत काय अर्थ आहे हा विचार वीस वर्षांपासून आंबेडकरांच्या डोक्यांत खेळत होता. त्यांची धर्मांतराची घोषणा त्यांतूनच निर्माण झाली. धर्मांतराचा त्यांनीं ऐहिक आणि आध्यात्मिक अशा

दोन्ही दृष्टींनीं विचार केला. हिंदुधर्मात व्यक्तीला प्राधान्य नाहीं, विचारस्वातंत्र्य नाहीं. त्यामुळें सर्वच हिंदु बौद्धिक गुलामगिरींत सांपडलेले असले तरी त्या गुलामगिरीच्या हालाहलाचा अर्क फक्त अस्पृश्यांच्या वांट्याला आलेला आहे. जातिभेद आणि अस्पृश्यता ही हिंदुधर्माची शिकवण आहे. हिंदुधर्मात राहून जातिभेद नष्ट करूं असें म्हणणें म्हणजे विषाचें अमृत करूं असें म्हणण्यासारखें आहे. जोंपर्यंत जातिभेद आहेत तोंपर्यंत अस्पृश्यता ही राहणारच. म्हणून धर्मांतरावांचून अस्पृश्यांना दुसरा मार्ग नाहीं असा आंबेडकरांचा युक्तिवाद होता. धर्मांतराचा विचार वैफल्याच्या भावनेमधून निर्माण झाला अशी अनेक लोक आंबेडकरांच्यावर टीका करतात. पण ही टीका खरी नाहीं. आंबेडकरांचा पिंड हा धर्मनिष्ठाचा पिंड आहे. ते नेहमीं म्हणत असत, 'ज्या मनुष्याचा देवावर विश्वास नाहीं, धर्मावर विश्वास नाहीं, त्या मनुष्यावर मी तरी विश्वास ठेवणार नाहीं!' वीस वर्षांपूर्वी धर्मांतराची घोषणा करतांना ते म्हणाले, 'माझ्या धर्मांतराच्या मुळाशीं आध्यात्मिक भावनेशिवाय दुसरी कोणतीहि भावना नाहीं.' सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास केल्यानंतर बुद्धाचा धर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे अशी त्यांची खात्री झाली म्हणूनच त्यांनीं तो धर्म स्वीकारण्याचें ठरविलें. ते म्हणाले, 'बुद्धाचा धर्म हा खरा मानवी धर्म आहे. मानवाच्या संपूर्ण विकासासाठीं तो निर्माण केलेला आहे. तो प्रत्येक आधुनिक आणि बुद्धिवादी माणसाला पटण्यासारखा आहे. बुद्धाची शिकवण अगदीं साधी आणि सोपी आहे. त्या धर्मामध्यें मनुष्याला पूर्ण वैचारिक स्वातंत्र्य दिलेलें आहे. मानवतेला आणि सदसद्विवेकबुद्धीला ज्या गोष्टी पटतील त्याच त्या धर्मानें ग्राह्य मानलेल्या आहेत.' म. गांधींनीं अस्पृश्यांना 'हरिजन' बनवून ते अस्पृश्यांच्या दयेचा आणि सहानुभूतीचा विषय बनवले. पण आंबेडकरांनीं लक्षावधि अस्पृश्यांना 'बुद्धजन' बनवून त्यांच्या मुक्तीचा आणि आत्मोद्धाराचा चिरंतन दीपस्तंभ त्यांच्यासमोर बांधून ठेवला. भारताला स्वातंत्र्य प्राप्त होतांच कॉंग्रेस पक्षाशीं आपले पूर्वीचे सर्व मतभेद विसरून ते मध्यवर्ति सरकारांत प्रविष्ट झाले आणि स्वतंत्र भारताची घटना बनविण्याची सर्व जबाबदारी त्यांनीं पत्करली. ते हिंदुसमाजाचे द्वेष्टे असते तर 'हिंदु कोड बिल' आणून त्यांनीं हिंदुसमाजांत आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्याचा कधींच प्रयत्न केला नसता. पण त्यांच्या त्या महान् क्रांतिकार्याला प्रतिगामी कॉंग्रेसनें सुरुंग लावल्यामुळें त्यांना मोठ्या दुःखानें आणि निराशेनें मध्यवर्ति सरकारमधून बाहेर पडावें लागलें. हिंदुधर्म आणि हिंदुसमाज सुधारण्याचा त्यांचा तो अखेरचा प्रयत्न होता. तो अयशस्वी झाल्यानंतर त्यांना भगवान् बुद्धाला शरण जाण्यावांचून दुसरें गत्यंतरच उरलें नाहीं. मरणाआधीं दोन महिन्यांपूर्वी बुद्धधर्माची दीक्षा घेतांना ते म्हणाले, 'माझ्या या धर्मांतरानें भारतीय इतिहासाच्या आणि संस्कृतीच्या परंपरेला धक्का न लागेल ... च मी काळजी घेतलेली आहे.' बौद्ध धर्म हा सर्वस्वी भारतीय धर्म आहे. म्हणून आंबेडकरांनीं आणि त्यांच्या लक्षावधि अनुयायांनीं बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यामुळें हिंदुसमाजाला दुःख किंवा वैषम्य वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. भगवान् बुद्ध हा भारताचा नव्हे, जगाचा उद्धारकर्ता आहे. पंचवीसशें वर्षांची

त्यांची जयंती साऱ्या राष्ट्रानें गेल्या वर्षी साजरी केलेली आहे. स्वतंत्र भारताचें राज्ययंत्रही आज भगवान् बुद्धाच्याच नांवानें चालतें. त्याचें धर्मचक्र आज आमच्या राष्ट्रध्वजावर आलेलें आहे. सम्राट अशोकाची सिंहमुद्रा आमची राष्ट्रमुद्रा झाली आहे. बुद्धाचें पंचशील हा विश्वशांति प्रस्थापित करण्याचा एकमेव मार्ग आम्ही आतां स्वीकारलेला आहे. आज जगापुढें दोनच मार्ग आहेत. एक बुद्धाचा आणि दुसरा युद्धाचा! राजकारणांत भारतवर्ष जर आज बुद्धाचा अनुयायी झालेला आहे तर धर्मकारणांत त्याचें अनुयायित्व आंबेडकर आणि त्यांचे कोट्यवधि बांधव ह्यांनीं पत्करलें तर त्याबद्दल दुःख मानण्याचें काय कारण आहे ? जिवंतपणीं आंबेडकर जेवढे मोठे होते त्याच्या शतपटीनें आज मृत्यूनंतर मोठे झाले आहेत. भारतांत आजपर्यंत पुष्कळ महापुरुष मरण पावले असतील पण ज्यांच्या मृत्यूनें कोट्यवधि नेत्रांतून अश्रूंच्या धारा वाहल्या असें महान् मरण आंबेडकरांवांचून कोणाच्याहि वांट्याला आलेलें नाहीं. आंबेडकर हे केवळ सात कोटी अस्पृश्यांचे कल्याणकर्ते नव्हते तर पंचवीस कोटी स्पृश्यांचे ते उद्धारकर्ते होते. विभूतिपूजा आणि ढोंग ह्यानें साऱ्या हिंदुसमाजाचा अधःपात झालेला होता. म्हणून त्या विभूतिपूजेवर आणि ढोंगावर घणाचे घाव घालून त्या खोट्या मूर्ती आंबेडकरांनीं फोडून टाकल्या आणि 'बुद्धीची नि मानवतेची पूजा करा' अशी देशाला शिकवणूक दिली. 'मी मूर्तिपूजक नाहीं. मी मूर्तिभंजक आहें. गांधी मला आवडत नाहींत कारण भारतावर माझें अधिक प्रेम आहे.' ह्या त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण वाणींत त्यांच्या अमर जीवनाचें रहस्य सांठविलेलें आहे. भारताच्या धार्मिक, सामाजिक आणि राजकीय जीवनांत क्रांति घडवून आणण्यासाठीं सारा जन्म ज्यांनीं जुलूम, असत्य आणि ढोंग ह्यांच्याशीं निकरानें झुंज दिली अशा लोकोत्तर धैर्याच्या, वज्रकठोर छातीच्या आणि कुसुमकोमल हृदयाच्या महात्मा आंबेडकरांच्या चरणीं महाराष्ट्राच्या वतीनें आमचीं अनंत लोटांगणें असोत.

मराठा : ६-१२-१९५७

# १९. लोकहितवादींचीं शतपत्रें

पत्र नं० ८५ ९ डिसेंबर १८४९

## ज्ञान हाच पराक्रम

सांप्रत काळीं हिंदु लोक गरीब आहेत व अज्ञानी आहेत, एतद्विषयी मी सिद्धांत लिहितों की, संपदा आणि ज्ञान हीं दोन्ही, जोंपर्यंत यांस आपली स्थिति कळली नाही, तोपर्यंत प्राप्त होणार नाहीत. जरी हा देश उत्तम प्रकारचें उत्पन्न करणारा, व धनधान्यसमृद्धिकर्ता आहे तरी या लोकांस त्याचें फळ नाही.

आता पृथ्वीवर दुसरे अनेक देश आहेत. त्यांची अवस्थाही फार वाईट आहे. रयत लोक इकडल्यापेक्षा तेथे दरिद्री आहेत; परंतु हें उदाहरण या देशास उपयोगी नाहीं. कारण की, हा देश पूर्वी कसा होता व हल्ली कसा आहे, तें पाहून विचार केला पाहिजे. किती एक लोक असे आहेत की, मुसलमानांचे राज्यास नांव ठेवीत नाहीत; परंतु इंग्रजांचें राज्य विशेषें करून दरिद्रास कारण समजतात. व त्यांस कांही नवीन शहाणपणाची युक्ति सांगितली, तर ऐकत नाहीत आणि म्हणतात की, आम्हांस आजपर्यंत या युक्ति कोठे होत्या? आजपर्यंत आम्ही दुःखी नव्हतों; आता मात्र झालों ते इंग्रजांमुळे झालों. यास्तव या युक्तीने आमचें दरिद्र जाणार नाही, इंग्रज जातील तर मात्र जाईल. असें समजून युक्तीस बहुत लोक अगदी मानीत नाहीत. फक्त हें राज्य वाईट, असें म्हणून संध्याकाळपासून उजाडेपर्यंत, आणि उजाडल्यापासून सारा दिवसभर जप करितात.

या प्रकारचे लोक आम्ही नित्य पहातों. तेव्हा अशा लोकांची समजूत पाडणें हें सर्वाहून अवघड आहे. परंतु पहा की, असा विचार करीत बसणें मूर्खपणाचें आहे. उद्योगास झटणें हा शहाणपणा आहे. दरिद्र आहे खरें, व तें पदोपदीं वृद्धिंगत होत चाललें आहे. द्रव्याचें साधन कमी होत चाललें आहे; परंतु **अशा जपाने उपाय होणार नाही**. जर विद्या व ज्ञान येणेकरून आपलें दरिद्र कमी केलें, तरच होईल. **ज्ञान जेथे आहे तेथे सर्व पराक्रम आहे**. परंतु हिंदु लोकांमध्ये एकमत असेल, तर या गोष्टी घडतील. आपलेपासून आपली कंठाळ एकादा घेऊन गेला तर जाग्यावर बसून शिव्या दिल्या तर कंठाळ येईल की काय? यास्तव जे नेणारे आहेत, ते परत देण्यास अनुकूल करण्याचे जे प्रयत्न असतील, ते करावे. ते तरी शहाणपणाखेरीज कसे सापडतील? यास्तव शहाणपण मुख्य पाहिजे. त्याचे योगाने दरिद्र कमी होईल.

**या देशांतील लोकांनी विलायतेस जावें, तेथे वस्ती करावी, विद्या शिकावी, जे श्रीमान् आहेत, त्यांणी या कामांत द्रव्य खर्चावें, तिकडील ज्ञानाची वृद्धि करावी. तिकडील कलाकौशल्य इकडे आणावें; आपल्या दुष्ट चाली सोडाव्या, हेंच शहाणपण आहे.** या शहाणपणानें या लोकांस समर्थता येईल. आणि समर्थतेनंतर दरिद्र जाईल. मुख्य ज्ञानापासून सर्व पराक्रम आहेत. कधी कधी ज्ञानाबरोबर लागलेच पराक्रम दृष्टोत्पत्तीस येत नाहीत. कारण की, किती एक मूर्ख असून, अधि-

कार पावतात, तेव्हा त्यास अधिकार कसा मिळाला ? हा प्रश्न बहुतेक हिंदु लोक करितात; परंतु हा केवळ पोरकट प्रश्न आहे. पराक्रमाची रीति अशी आहे की, जो कोणी घरांत प्रमुख शहाणा असतो, तो बहुत द्रव्य संपादन करतो. नंतर त्याचे विभाग पश्चात् किंवा केव्हा तरी होतात, तेव्हा त्यातील एक विभाग अयोग्य पुरुषाच्या हातीं लागतो, म्हणून कोणी जर असें म्हटलें की, हें सर्व मूर्खपणाने संपादन केलें आहे, तर ही गोष्ट सत्य नाही.

कारण की वाटणीत ही चूक आहे; परंतु संपादनांत मूर्खपणा नाही. मिळविणाराने शहाणपणानेच मिळविलें आहे. तसें इंग्रज लोकांनी सर्वांनीच पराक्रम केला असें नाही किंवा सर्व शहाणे आहेत, असेंही नाही; परंतु त्याच्यांतून जे शहाणे निघाले, त्यांणी पुढारी होऊन कवाईत व युद्धविद्या काढिली आणि पुढे हिंदुस्थानांत आलें. त्यांत जे शहाणे पुरुष एलफिन्स्तन-साहेबाप्रमाणें किंवा हेस्टिंगसाहेबाप्रमाणे झाले, त्यांणी पराक्रम केला, आणि जातेसमयीं आपले लोकांचे हातीं अधिकार दिला, आणि सांगितलें की, तुम्ही आता याचा वहिवाट करा. त्या वहिवाटीवर कोर्ट डैरेक्टर व गवरनरादिक आहेत. ते त्या पराक्रमाचे फळाचे लोकांस हिस्से देत आहेत. कोणास जडज, कोणास कलेक्टर नेमतात. त्यांनी एखादा हिस्सा भिडेने मूर्खांस दिला, म्हणून मूर्खपणाने हा पराक्रम मिळविला, असें सिद्ध होत नाही. याजकरिता ही समजूत आमचे लोकांची मुख्य पडली पाहिजे. शहाणपणाशिवाय कांही पराक्रम नाही.

## द्रव्योत्पत्तीचे नवे मार्ग

यास्तव हिंदुस्थानांत असे कोणी लोक प्रमुख होऊन त्यांणी सर्व आपले लोकांस बलवान व शहाणे करून ठेविले पाहिजेत. त्यांस नवीन द्रव्योत्पत्तीचे मार्ग दाखविले पाहिजेत. इंग्रजांनी राज्य बलात्काराने घेतलें. असें असलें तर असो; परन्तु व्यापार तर बलत्काराने घेतला नाही ? त्यातच हे लोक का शहाणे होत नाहीत ? इकडे काच करतां येईल. व तारवे करतां येतील. लोखंडाचा रस करतां येईल. भूमींतला कोळसा सापडेल. कापड करितां येईल. इतक्या गोष्टी समजून आल्या, म्हणजे किती कार्य झालें ? व हे लोक किती बलवान् होतील ? याप्रमाणे प्रथम असेंच होऊं द्या की, सर्व व्यापाराचा माल इकडेच व्हावा, विलायती नको. इंग्रजांस इकडील कच्चा माल खरेदी केल्याशिवाय निर्वाह नाही. यास्तव अशी गोष्ट केल्यानंतर राज्य मात्र त्यांचे हातीं राहील. राहिलें तर काय चिंता आहे ? जो पैसा ते तिकडे नेतील, तो आपण जिन्नस देऊन खरेदी करून परत आणूं, परंतु या गोष्टीस शहाणपणा असून, सर्व लोकांचें काम डोकीवर घेणारे पाहिजेत. असे लोकांचा फार तोटा आहे.

# २०. तरुण तुर्क म्हातारे अर्क

**मधुकर तोरडमल**

**अंक पहिला**

**दृश्य पहिले**

[ कुठल्याशा एका कॉलेजची होस्टेल रूम न. ८५. चार कॉट्सची. टेबल, खुर्च्या वगैरे – नेहमी होस्टेल रूममध्ये असणारे फर्निचर. वर्षाची सुरुवात आहे. रूममधल्या दोन कॉट्स बंड्या पाठक आणि प्यारेलाल या दोन कॉलेजच्या 'पुराणपुरुषांनी' ताब्यात घेतलेल्या आहेत. प्यारेलाल हनुमानचड्डीत कॉटवर बसून दाढी करतो आहे. बंड्या ट्रंक उपशीत बसलेला आहे. ]

**बंड्या** : प्यारे ( तो दाढीमधे गर्क ) अबे ओ कळकट...

**प्यारे** : हं ?

**बंड्या** : साल्या, आंघोळ वगैरे करणार आहेस काय आज ?

**प्यारे** : का ?

**बंड्या** : दाढी करतो आहेस म्हणून विचारलं.

**प्यारे** : दाढी रोज सकाळी करतो, सुव्वर. इट्स डेली सकाळ. आंघोळ संडे के संडे. इलस्ट्रेटेड वीकली. कपडे धोना दो हप्तेमें एक बार. फॉर्टनाइट्ली फिल्मफेअर. एनी मोअर क्वश्चन्स ?

**बंड्या** : जुन्या घाणेरड्या सवयी काही जात नाहीत तुझ्या. चिकटपट्टी आहेस साल्या. जुनी सवय आणि जुनी परीक्षा दोघींना चिकटून बसतोस घट्ट.

**प्यारे** : सिंपल रीझन. सवय स्त्रीलिंगी, परीक्षा स्त्रीलिंगी. स्त्रीलिंगी काहीही असलं की प्यारे त्याला चिकटून बसतो. एनी मोअर क्वश्चन्स ?

**बंड्या** : उगीच नाही साल्या तुला प्यारे द कळकट म्हणत. एक मैलावरून वास येतो तुझा. वर्गात बाकावर तुझ्या शेजारी बसायलासुद्धा नाराज असतात पोरं. तुझ्या बाकाला गॅसचेंबर म्हणतात सगळे.

**प्यारे** : नेव्हर माइंड. पोरांना मार गोळी. शेजारी पोरांना घेऊन बसायची सवय नाही आपल्याला...पोरी काय म्हणतात ते सांग. प्यारे प्यारे करीत पिंगा घालतात की नाही भोवती ?

**बंड्या** : पोरींचं कौतुक नको सांगूस मला. साल्या आधीच गॅसवर आलेल्या असतात...त्यांना गॅस चेंबर काय आणि गॅस सिलिंडर काय सगळं सेमच असतं.

**प्यारे** : जल गये ना ? बस. जळा, जळा, जळत रहा. किस्मत हमारे साथ है, जलनेवाले जला करे...

**बंड्या** : अरे हम जलनेवाले नहीं...करनेवाले हैं।

**प्यारे** : करो करो मगर खाली बकवाज मत करो। पहिले कुछ कॉन्क्रीट करो।

**बंड्या** : हां हां कॉन्क्रीटच करेंगे आणि मग मांगेंगे...

**प्यारे** : मांगो मांगो...

**बंड्या** : मांगो काय मागतोच आहे. वर्षाच्या सुरुवातीलाच मागतो. ऐकून ठेव प्याऱ्या, हे वर्ष म्हणजे नुसती कत्तलची रात्र नाही केली तर नावाचा बंड्या पाठकच नाही. बापाचं नाव सांगणार नाही आयला. आपण ठरवून आलोय. हे वर्ष म्हणजे दुसरं तिसरं काही नाही. बस गाडा...राडा...आणि गाडा. अरे अशी नुसती शिट्टी वाजवली...( शीळ घालतो ) की शेपट्या हलवीत पोरगी आली पाहिजे समोर. इथे आल्या आल्या शकूनच तसा झालाय आपल्याला.

( पेटीतून एक चिनी बाईचा डोळा मारणारा फोटो काढतो. )

ये देख.

**प्यारे** : काय आहे ते ?

**बंड्या** : देख...बघ बघ कसा मारू डोळा मारते. हाय...

**प्यारे** : अबे उल्लू के पठ्ठे, फालतू हाय हाय मत कर. ती औंडी तुला डोळा नाही मारीत. तिचा डोळा म्हणजे पब्लिक प्रॉपर्टी आहे. हर एक पानाच्या ठेल्यावर टांगलेली असते ती आणि पानाचे दहा पैसे फेकणाऱ्या प्रत्येकाशी आखमिचौली चालू असते तिची.

**बंड्या** : आपल्या बन्सी पानवाल्याकडूनच आणलंय हिला. मागच्या वर्षी-पासून त्याच्यामागे लागलो होतो. मला दे म्हणून. देतो देतो करीत वर्ष घालवलं साल्यानं आणि आत्ता दिली. इथे आलो त्याच दिवशी. म्हटलं चला शुभशकुन झाला. आता एवढ्यासाठी पानाच्या ठेल्यावर जायला नको. माझ्या कॉटसमोरच टांगून ठेवतो. कॉटवर पडलं रे पडलं की हिनं डोळे मारायला सुरुवात केली पाहिजे.

**प्यारे** : साला पक्का भांडवलदार. आइ डोंट लाइक धिस मोनॉपॉली बिझिनेस हां...आइ वॉंट इक्वल डिस्ट्रिब्यूशन ऑफ वेल्थ.

**बंड्या** : आयला उन्हाळ्याच्या सुट्टीत रशियाला जाऊन आलास काय तू ?

**प्यारे** : मी नाही गेलो. रशियाच आलाय इकडे. बंडो वच्चू, आता अशी खाजगी बाई ठेवता येणार नाही तुला. तिच्यावर सीलिंग आणू आम्ही. तिची को-ऑपरेटिव्ह सोसायटी केलीस तर इथे राहू शकेल ती...

**बंड्या** : आयला प्याऱ्या, तुझं नाव बदलायला पाहिजे आता. प्यारेलाल मुंदडाच्या ऐवजी प्यारेलालोव्हिच मुंदडोस्की ऊर्फ कळकटोस्की असं काहीतरी म्हणायला पाहिजे तुला.

**प्यारे** : यस. असल्या इश्कबाजीच्या मामल्यात आपण एकदम तरुण तुर्क. यंग टर्क.

**बंड्या** : म्हणजे यंगोस्की टरकोस्की ! आयला, प्याऱ्या, नशीब आमचं इकॉनॉमिक्समध्ये तुला तीनच्यावर मार्क मिळाला नाही कधी. एक.

नाहीतर असल्या टरक्या बाता मारून अर्थमंत्री झाला असतास तू.

**प्यारे** : चुकतो आहेस. अरे इकॉनॉमिक्समध्ये नापास होतोय सारखा म्हणूनच अर्थमंत्री होण्याचा चान्स जास्त आहे मला. तेव्हा वेळीच सावध हो आणि त्या बाईला रूमच्या मधोमध टांग. जो रूममध्ये येईल त्याला फ्री स्माइल आणि फ्री डोळा, सबको फ्री. फ्री लाइक एअर. एकदम पब्लिक चॅरिटी ट्रस्ट. आणि या रूममधले आपण चौघे पार्टनर्स ट्रस्टी.

**बंड्या** : ओ. के. ओ. के. सध्या तर राहू दे हिला इथे. (चित्र ठेवतो.) आयला कळकट, या दोन कॉट्सवर अजून कुणी आलेलं नाही. आपल्या दोघांची जोडी बेस्ट जमली. उरलेले दोन नग कोण येताहेत कुणाला माहिती ? आयला, काय शकून आहे. नेमकं या पुस्तकाचं नाव काय निघालं बघ... (वाचीत) बर्ड्स ऑफ द सेम फादर.

**प्यारे** : फादर नहीं बे—फेदर.

**बंड्या** : तेच ते फेदर काय आणि फादर काय...आपली गँग चांगली जमणं हा महत्त्वाचा मुद्दा. सालं आख्खं वर्ष कटवायचंय.

(दारावर टकटक होते.)

यस कमिंग...

(जाऊन दरवाजा उघडतो. दारात मुकुंद भागवत उभा. गोरापान, नाजुक, सडपातळ, लाजत मुरकत बोलणारा, नुकताच प्री-डिग्रीला आलेला विद्यार्थी, बावरलेला, बुजलेला.)

**बंड्या** : कोण पाहिजे ?

**कुंदा** : थोडं बाजूला होता का प्लीज.

**बंड्या** : (बाजूला होत) आयला !

**कुंदा** : (सामान घेऊन आत येत) कॉलेज लाइफची सुरुवात आहे माझी ही. प्री-डिग्रीला आलोय. माझं नाव कुंदा भागवत.

**बंड्या** : कुंदा ?

**कुंदा** : हो. म्हणजे किनय मुकुंदाचा शॉर्टफॉर्म आहे. मुकुंदा मला नाही आवडत. तो 'मु' कशाला मधेच फालतू. कुंदा कसं स्वीट वाटतं.

**बंड्या** : हो आणि कुंदा म्हणजे मुद्धा तसा स्वीटच नाही का ?

**कुंदा** : किती छान बोलता हो तुम्ही. मला खूप बरं वाटलं. अहो होस्टेलमधे शिरताना किती घाबरलो मी. काळजाचा थरकाप उडाला नुसता. म्हटलं नव्यानंच हे लाईफ सुरू होणार...कसे पार्टनर मिळतात. कसे वागतात. अगदी पहिल्या रात्री पतीच्या खोलीत शिरताना नव-वधूच्या मनात येत असेल ना तसलं फीलिंग आलं मला या रूममधे शिरताना.

**बंड्या** : आयला !

**कुंदा** : पण तुम्ही एकदम आवडलात मला. अगदी लव्ह ॲट फर्स्ट साइट झालं.

**बंड्या** : मेलो. प्याऱ्या.

**प्यारे** : बोंबलू नकोस. मी तुझ्या आधीच मेलोय.

**कुंदा** : तुम्ही असं काय करताय ? माझं काही चुकलं का ? रूम नंबर ८५ हीच ना ?

**बंड्या** : रूम बरोबर आहे. पण होस्टेल चुकलात.

**कुंदा** : म्हणजे ?

**बंड्या** : अहो लेडीज होस्टेल शेजारीच आहे तिकडे.

**कुंदा** : आता मात्र मुळीच आवडलं नाही हं मला तुमचं बोलणं. लेडीज होस्टेलमध्ये जायला मी काय लेडी आहे ?

**बंड्या** : मला काय विचारताय ?

**कुंदा** : ( त्याच्याकडे जात ) मग तसं का बोललात ? सांगा मी काय लेडी आहे ? ( त्याला धरून ) सांगा–

**बंड्या** : ( वैतागून ) आयला आता मला काय माहिती लेडी आहे की लेडा आहे.

**प्यारे** : हम बताते हैं...हा लेडी नाही. लेडा पण नाही. ये तो लौंडा है लौंडा.

**कुंदा** : फार फार वाईट्ट बोललात हो तुम्ही. तुम्ही माझा असा अपमान करता म्हणून पत्र लिहून मी ह्यांना कळवलं तर स्पेशल विमान करून इथे येतील आणि चांगली कणिक तिंबून काढतील तुमची.

**बंड्या** : आयला ! ह्यांना कळवलं तर ? कोण हे ?

**कुंदा** : तुम्हाला काय करायचंय. ते माझं सीक्रेट आहे. पण एक सांगून ठेवतो माझा अपमान केलात किंवा किंचित्साही त्रास दिलात तर एक दात शिल्लक ठेवणार नाहीत तुमच्या तोंडात.

**बंड्या** : म्हणजे दाताचे डॉक्टर वगैरे आहेत ?

**कुंदा** : हो. आणि हाडांचेसुद्धा आहेत. हाडांचा पार भुगा होऊन जाईल समजलात.

( मुरका मारून वळतो. बाईचं चित्र दिसतं. )

हे चित्र कुणाचं ?

**बंड्या** : बाईचं.

**कुंदा** : ते दिसतंय की. पण इथे कुणी आणलं ?

**बंड्या** : मी. का ?

**कुंदा** : असल्या बाईचं चित्र तुम्ही रूममध्ये ठेवता ?

**बंड्या** : असल्या म्हणजे ?

**कुंदा** : फार चावट बाई आहे ही. आपण तिच्याकडे पाहिलं ना की एक डोळा मुडपते.

**बंड्या** : बाईनं डोळा मुडपलेला तुम्हाला आवडत नाही ?

**कुंदा** : आवडतं. पण मी ते मनातल्या मनात ठेवतो. मला असला फाजील-पणा आवडतो हे कानावर गेलं तर केवढे संतापतील हे...

**बंड्या** : पुन्हा हे !

**कुंदा** : ( हसून ) मी आत्ता सरसं करून आलो हं. अगदी एका मिनिटात ( टॉवेल ब्रश वगैरे घेतोय ). बाथरूम कुठे आहे ?

**बंड्या** : डाव्या बाजूच्या कोपऱ्यात...

( तो 'थँक्यू' म्हणून जातो. )

आयला आपण तर हैराण झालो यार. प्यारे, हे वर्ष काही खरं दिसत नाही आपलं.

**प्यारे** : हां यार. ये कंबख्त लौंडा कहां से आ टपका यहां ?

**बंड्या** : पनोती साली. आली ते आली आणि नेमकी आपल्याच खोल्या-वर येऊन आदळली. आधी एक तू कळकट होतासच आता हा लेडीजकट

आपले साले स्टार्सच भिकार दिसताहेत या वर्षी. मटका लावायची. काही सोय नाही. छ्यः ( बैतागून उठतो. )

**प्यारे** : छोड यार, घे, चार मिनार घे. एक दम मार, डोकं उतरून जाईल.
( सिगरेट बॉक्सवर आपटीत )
अरे दम मारो दम...मिट जाये गम...

**बंड्या** : प्यार्‍या साल्या, आधी मी काय सांगतो ते ऐक. दम मागून मार. हे सालं दळभद्रं आलंय ना आपल्या खोलीत त्याला आत्ताच ठिकाणावर आणला पाहिजे ! एकदा इथली हवा लागली की पुढे याला आकळणं कठीण होणार आहे आपल्याला. काय ?

**प्यारे** : (सिगरेट फुंकीत) बोलते रहो प्यारे.

**बंड्या** : काय ते बोलतंय, काय चालतंय, सरसं करायला काय जातंय. वर आणखी ते ' हे ' आहेतच. आयला गुतडा आहे नुसता. त्याला आत्ताच चापूनचोपून जरबेत ठेवला पाहिजे. काय?

**प्यारे** : ओ. के. आय् ॲम अ गेम फॉर इट.

**बंड्या** : एकदम स्ट्रॉंग ट्रीटमेंट.

**प्यारे** : एक्स्ट्रा स्ट्रॉंग यार. तुम देखते रहो सिर्फ.
( कुंदा गाणं गुणगुणत येतो. दोघं गप्प होतात. कुंदा सामान ठेवू लागतो. प्यारे बंड्याला खुणावतो. बंड्या जाऊन दरवाजा बंद करून घेतो. कुंदाच्या काही लक्षात येत नाही. )

**कुंदा** : चहा घेणार का तुम्ही ? (ते दोघे गप्प) इथे मागवता येतो की कॅन्टीनमध्ये जायला हवं ?

**बंड्या** : (थंडपणे पुढे येत) मुकुंदराव...

**कुंदा** : अहो मुकुंदराव काय म्हणता? मला नाही ते नाव आवडत. सांगितलं ना तुम्हाला. मला कुंदा म्हणा.

**बंड्या** : (त्याच थंडपणानं) मुकुंदराव.

**कुंदा** : पुन्हा तेच! सांगितलं ना कुंदा म्हणा. कुंद म्हणा. किंवा बंगालीतल्या सारखं दा म्हणा, नाही तर नुसतं कु म्हणा किंवा मु म्हणा...

**बंड्या** : (वैतागानं ओरडून) ए आता पुरे ना. एकदा फायनल ऐकून ठेव. असली बायकी नावं आम्हाला आवडत नाहीत. ही मर्दांची खोली आहे ! माझं नाव बघ कसं मर्दासारखं आहे...बंडा. बलवंत. हा प्यारेलाल मुंदडा.

**कुंदा** : हाय...

**बंड्या** : बंडा. मुंदडा. शेवटचा डा कसा दणदणीत मर्दानी वाटतो. तोंडातून डा उच्चारतानासुद्धा कसं पाचुंदा पाचुंदा मिश्या फुटल्यासारखं वाटतं.

• • • • •